साप्ताहिक

# माणूस

२७ एप्रिल ८५/दोन रुपये

## पाच कामगार नेत्यांच्या मुलाखती

# मे दिन

## पारधी

वस्तीवरील
'ग्रामायन' कार्यकर्त्याचा
एक दिवस..



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : चोविसावे
अंक : अठ्ठेचाळीसावा

२७ एप्रिल १९८५
किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
सुरेश नावडकर

## सप्रेम नमस्कार १

एक दिवसाच्या क्रिकेट सामन्यात गोलंदाजांवर षटकांच्या मर्यादेचं बंधन आहे, तसं फलंदाजालाही धावांच्या मर्यादेचं बंधन असावं, असं श्री वि. ग कानिटकर यांनी २० एप्रिल ८५ च्या 'माणूस' च्या अंकात सुचवलं आहे; पण त्यांच्या या सूचनेत थोडी गफलत झालेली दिसते. गोलंदाजाच्या षटकांवर मर्यादा आहे. त्यानं घ्यावयाच्या विकेटस्‌वर नाही. इम्रानखान त्याच्या मर्यादित १० षटकात १० मुद्धा गडी बाद करू शकेल. तेव्हा फलंदाजाच्या धावसंख्येवर बंधन घालण्याऐवजी त्यानं अमुकएक चेंडू खेळावेत तेवढ्यात काय हव्या त्या धावा काढाव्यात, असं बंधन घालावयाचं तर गोष्ट वेगळी. म्हणजेच गोलंदाजाच्या षटकांवर बंधन आहे, तसंच फलंदाजानं खेळावयाच्या चेंडूवर बंधन (अर्थात नवीन नियम करून) घालता येईल.

२१ एप्रिल ८५ — पंढरीनाथ रेगे, पुणे

'माणूस' साप्ताहिकाच्या ६ एप्रिलच्या अंकातील 'मृत समुद्रातील इस्राईलचे कार्य' हा लेख वाचला. याच लेखात गंगा–कावेरी योजनेसबंधी भारतीयांकडून अपेक्षा व्यक्त केली गेली. हा...हंत...हंत.

संपादक महाशय, गंगा–कावेरीच कशाला, प्रत्येक गावच्या गटारीचा जरी नीट कल्पकतेने उपयोग केला तरी आपले दारिद्र्य सातासमुद्रापलिकडे जाणार आहे; पण लक्षात कोण घेतो? दोन अडीचशे वर्षांपूर्वीची परिस्थिती आजही कायमच आहे. इंग्रजांची व्यसने, पोशाख इत्यादी दिखाऊ गोष्टी आम्ही उचलल्या; परंतु त्यांचे राष्ट्रप्रेम, उद्योगी साहसता इत्यादींचा आम्ही अजिबात अभ्यास केला नाही.

भारतात कंपनी राज्य होते. एक गव्हर्नर बदलून दुसरा येत होता. परंतु बदलून जाते वेळी मुळीच खळखळ करीत नसे. या उलट भारतात तो मेल्यावरच सत्तावस्थे उतरतात जरा कोठे सत्तास्थानास धक्का लागण्याचा संभव दिसताच बंडखोरी होते. मग बाळगलेली–बरळलेली सर्व तत्त्वे सहज गुंडाळली जातात. अशा भ्रष्ट तत्त्वहीन समाजाकडून काय होणार? कोणते राष्ट्रकार्य निर्माण होणार?

१४ एप्रिल ८५ — के ना. देशमुख, मु. पो. सगरोळी, जि. नांदेड

# पंजाबमधून हिंडताना

संत लोंगोवाल आदि अकाली नेत्यांच्या सुटकेने पंजाबमधील वातावरण निवळेल अशी अपेक्षा करणाऱ्यांचा अपेक्षाभंग झाला. लोंगोवालांचं जनसंपर्क अभियान संपलं. आता सरकारनं देऊ केलेल्या सवलतींमुळे पंजाब थंड होऊ लागलाय असं वाटणं साहजिक आहे; पण वास्तवात सुवर्णमंदिरातील लष्करी कारवाईने 'दुखावलेली मने' धगधगताहेत. आजही सुवर्णमंदिरातील गोळ्यांनी पाडलेली भगदाडे पाहून लोक हळहळताहेत. स्वतःच्या अंगावरील जखमांप्रमाणे तळमळताहेत. राखेखालचा हा विस्तव वरवर पाहता दिसणं कठीण आहे.

संत लोंगोवालांच्या जनसंपर्क अभियानात हळूहळू वातावरण बनत गेलं. लोकांच्या सुप्त, खदखदणाऱ्या संतापाला वाट मिळू लागली, युवक, भिंद्रानवाले खलिस्तानचा जयजयकार करू लागले. विरोधाची भावना उफाळून आली आणि वातावरण

पुन्हा तापू लागल्याचं पंजाबात फिरताना जाणवलं.

पजाबमध्ये हिंदू-शीख कुटुंबाचे घरोब्याचे संबध आहेत. पती-पत्नी हिंदू-शीख असू शकतात. असे हे सबंध आता पहिल्यासारखे जिव्हाळ्याचे राहिलेले नाहीत हे स्पष्ट जाणवतं. हिंदू-शीख विवाह फरक जाणवण्याइतपत कमी झालेले आहेत. परस्पराच्या मनात एकमेकांबद्दल एक अनामिक अविश्वासाची भावना आहे. एवढंच की तो स्पष्ट बोलली जात नाही आणि हीच फार मोठी वाईट गोष्ट आहे याबद्दल अनेक विचारवंत खत व्यक्त करीत होते.

बाहेरून पंजाबमध्ये जाणाऱ्या माणसाच्या मनात कुठतरी भीती असते. याबाबत 'मॉडर्न प्रॅक्टिकल सायकॉलॉजी' मासिकाचे सपादक खुशवतसिंग कोहली म्हणाले, 'हे खरे आहे. पंजाबबाहेर जाणारा शीख दहादा विचार करतो आणि पंजाबात येणारा बिगरपंजाबीही दहादा विचार करतो. पजाबची समस्या त्यामुळे आता फक्त राजकीय राहिली नसून ती मानसिकही बनलीय. इथला शीख युवक भडक माथ्यानं, मनावर ओझ घेऊन चालला आहे. त्याला आता समजावून घेणं आणि योग्य वेळी राष्ट्रीय प्रवाहाकडे वळविणं अत्यावश्यक आहे

या परिस्थितीमधूनच हिंदू-शीख ऐक्यासाठी कार्य करण्याची गरज निर्माण झाली चंदिगडमध्ये हिंदू-शीख एकता मच स्थापन करण्यात आला आहे. मचाचे अध्यक्ष श्री. ओकारचद सागत होते की, 'सुरुवातीला प्रतिसाद भरपूर मिळाला; पण मध्यतरी आठवडयाच्या बैठकीला येणाऱ्याची सख्या रोडावत गेली होती. हिंदू-शीखातील मानसिक दरी नक्कीच वाढली आहे आणि ती भरून येण्यासाठी बराच काळ व रचनात्मक कार्य करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने हिंदू-शीखाचे एकत्र मेळावे भरविणे, एकमेकाचे धार्मिक सण साजरे करणे, सहभोजन, परस्पराच्या धर्मग्रथाचे एकमेकाच्या घरी पठण करणे, शिखानी देवळात व हिंदूनी गुरुद्वारामध्ये आठवडयातून एक दिवस समूह रूपाने जाणे अशा प्रकारची कार्ये मंच करीत आहे. हा विचार पसरावा म्हणून आता आम्ही शहर व आसपासच्या भागात काही शाखा काढण्याच्या विचारात आहोत.'

एकंदर लष्करी कारवाईबद्दल मात्र बुद्धिजीवी वर्गही नाराज आहे. सर्वसामान्य लोक तर अत्यंत कडवट प्रतिक्रिया व्यक्त करताना आढळतात. अमृतसरच्या खालसा कॉलेजचे सेवानिवृत्त प्राध्यापक म्हणाले, 'एकट्या भिंद्रानवालेसाठी सुवर्णमंदिरावर कारवाई केली याचं दु.ख धार्मिक शिखांना वाटणं स्वाभाविक आहे . पण अजूनही चालू असलेल्या अतिरेक्याच्या कारवाया हे सिद्ध करतात, की सरकारच्या पदरात लष्करी कारवाईचे काहीही फलित पडलेले नाही.'

### भिंद्रानवालेंचा ठसा

पंजाब हिंदू मजदूर सभेचे अध्यक्ष श्री. खुशपालसिंग म्हणाले. '३ जून हा शिखांचे पाचवे गुरू अर्जुनदेव यांचा शहिदी-दिन होता. खेडयापाडयातून हजारो माणसे आली होती. त्यांचा सुवर्णमदिर परिसरात मुक्काम होता ..हाच दिवस सरकारने सूचना न देता का निवडला ?...ती हजारो माणसे मारली गेली....पुढं दिल्ली दगलीच्या वेळी हिंदूस्थान-टाइम्ससारख्या वृत्तपत्रात काही जाहिराती प्रसिद्ध झाल्या की मेजर, कर्नल या सारख्या हुद्यावरील शीख अधिकारी रजेनतर कामावर रूजू होण्यासाठी गाडीत बसले आणि पुन्हा त्याचा पत्ताही लागला नाही. या साऱ्याला जबाबदार कोण? हा अन्याय शिखांवर का?'

फरिदकोटमध्ये एक तरुण शीख गुरुद्वारात सेवादार म्हणून नोकरीस होता. तो बोलताबोलता भावनावश झाला. म्हणाला, आमच्या पथात 'गुरुग्रथ साहेब' हा सर्वश्रेष्ठ असतो. संत भिंद्रानवाले तर गुरुग्रंथसाहेबपेक्षा खालीच होते. भिंद्रानवालेसाठी आमच्या अकालतख्ताला इजा का केली? आणि मग आम्हाला ती सहन झाली नाही तर दोष आम्हाला का?

जलंदरमधील एक व्यापारी शीख युवक म्हणाला, 'दिल्लीत घटना घडली आणि नतर दगल उसळली त्या दोघांच्या कृत्याची शिक्षा आम्हाला काय म्हणून दिली गेली? त्यात आमचा काय दोष होता? . आम्हाला देशद्रोही कशाच्या आधारावर ठरवल जात? ...आणि सरकारनं तसा प्रचार केला की सारी जनता ते खरं मानते याचा अर्थ आम्ही काय समजायचा?...मग तस पाहिलं तर परवाच हेरगिरी प्रकरण पाहा. केवढा मोठा देशद्रोह! मग काय त्याच्या मोजपट्टीने साऱ्या हिंदूंना मापता येईल का?...'

व्यापारासाठी पंजाबबाहेर जावे लागते म्हणून तुम्हाला भीती वाटते का असे विचारले. त्यावर तो म्हणाला, 'कुठं काय घडेल याची खात्री नसते. जीव मुठीत धरूनच जावे लागते. अगदी प्रवासातही कुठं उलट शब्द, बोलणं किंवा चर्चा करणही अयोग्य वाटाव इतकं दडपण असतं.' त्यावर उपाय विचारला तेव्हा तो हसला आणि म्हणाला, 'उपाय एकच. पैसा कमी मिळाला तरी चालेल पण व्यवसाय आता पंजाबपुरताच मर्यादित ठेवण.'

काही ठिकाणी भिंद्रानवालेंबद्दल बोलताना शीख माणसे दबकत होती. माहिती विचारताना प्रथम माहिती विचारणाऱ्याचीच चौकशी करीत होती. भटिंडाच्या सभेनंतर एका चाळीशीच्या माणसाला गाठलं. तो म्हणाला, 'अहो, अकाली दलाजवळ ताकदच नाहीय नेतृत्वच नाहीय. पंजाबचा हा प्रश्न असाच भिजत राहणार आहे अकालीजवळ एकच नेतृत्व चागलं होतं. पण त्यानी त्या माणसाला मानल नाही तेव्हा!'

मी 'कोणत्या माणसाला?' अस विचारलं तेव्हा तो गृहस्थ इकडे-तिकडे पाहात म्हणाला 'अहो, तोच. जे लष्करी कारवाईत सुवर्णमदिरात बळी पडलं ते!'

भटिंड्याचे एक वकील म्हणाले, 'आता भिंद्रानवाले आम्हाला जवळचे वाटतात आणि त्याच्याच तोडीला आम्ही सतवंतसिंग व बेअंतसिंग याना मानतो.'

संत भिंद्रानवाले अजूनही जिवत आहेत, असा सर्वसामान्य शिखांच्यात समज आहे. त्यात सुशिक्षित युवक मोठ्या प्रमाणात आहेत. पोलीस अजूनही सत भिंद्रानवालेंसाठी काही ठिकाणी छापे मारतात, असे अनेक लोक बोलतात. याबद्दल जालदरला सत लोंगोवालाच्या सभेस आलेल्या दोन कॉलेज विद्यार्थ्यांना विचारले. तेव्हा एकजण म्हणाला, 'बस्. आम्ही फक्त सतजीची (भिंद्रानवालेंची) येण्याची वाट पाहात आहोत. आम्हाला धर्मासाठी लढण्याचे प्रेरणा देणारे ते एकमेव स्थान आहे. सतजीनी सुवर्णमदिर लढविले आहे लोंगोवालासारखी मडळी त्याची कधीही बरोबरी करू शकणार नाहीत...'

पृष्ठ ३१ वर

मुंबई, मॅजेस्टिक गप्पा

# गोविंद तळवलकर यांची प्रकट मुलाखत

गेल्या वर्षीप्रमाणेच विलेपार्ले (पूर्व) मुबई येथे लोकमान्य सेवा सघाच्या पटागणात मॅजेस्टिक गप्पाचा कार्यक्रम सुरू झाला. दि. १६ एप्रिल या दिवशी सध्याकाळी सात वाजता महाराष्ट्र टाइम्सचे सपादक श्री. गोविंद तळवलकर याच्या प्रकट मुलाखतीने मॅजेस्टिक गप्पाचा प्रारंभ झाला.

सुप्रसिद्ध नाटककार श्री जयवंत दळवी, प्रा. स. ह. देशपांडे, आणि टाइम्स ऑफ इडियाच्या सदर्भ विभागातील श्री. अरुण टिकेकर यानी श्री. तळवलकर याची मुलाखत घेतली.

सुरवातीला श्री. स ह. देशपाडे यानी श्री. तळवलकरांचा परिचय करून दिला. श्री. तळवलकर हे एक अभिरुचिसंपन्न आणि सुसंस्कृत सपादक असून त्याच्या व्यक्तिमत्त्वात सपादकीय कर्तृत्व आणि विद्वत्ता यांचा संगम झाला असे सांगून देशपाडे यानी श्री. तळवलकराची लेखनवैशिष्टये नेमकेपणाने श्रोत्याना कथन केली. श्री. तळवलकर यांची विद्वत्ता सर्वस्पर्शी आहे. ते सामाजिक, राजकीय, आर्थिक सर्व विषयावर सखोलपणे लिहितात. क्रीडा हा विषय मात्र अपवाद असावा. श्री. तळवलकर याची वैचारिक भूमिका फॅशनेबल नसते. हल्ली विशिष्ट मत माडण्याची पुरोगामी माणसावर जशी काही सक्ती झाली आहे. 'समाजवाद' हा शब्द नमनाला उच्चारल्याशिवाय विचारवंतात स्थान मिळत नाही अशी स्थिती आहे. पण रूढ प्रवाहाच्या विरोधात जाऊन श्री. तळवलकर आपली मते अनेकदा मांडतात. उदा. बेळगाव कर्नाटकात रहायला हरकत नाही असा विचार त्यांनी मांडला होता. मराठवाडा नामातराचा प्रश्न, समाजवाद यावरचे त्यानी माडलेले विचारही रूढ फॅशनप्रमाणे नव्हते.

श्री. तळवलकर हे रुईया कॉलेजचे विद्यार्थी. तेव्हापासून त्याच्यावर रॉयवादाचा प्रभाव होता. व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही यावर त्याचा विश्वास आहे. संपादक हा समाजशिक्षक असेल तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे बारकावे पुढे यावेत या दृष्टीने ही मुलाखत घ्यायची आहे.

**प्रश्न :** जे अग्रलेख गेली सतरा वर्षं तुम्ही लिहिता आहात त्यावरून अस वाटत, तुमच्या हातात काठी आहे. तुम्ही ती नाठाळाला मारण्यासाठी नेहमी वापरता. तर ज्याच्याज्याच्यावर तुम्ही टीका केली त्याच्यापैकी कोणी तुम्हाला दाद दिली का ?

**श्री. तळवलकर :** मी नेहमी हातात काठी धरलेली आहे ही कल्पनाच चुकीची. माझ्या टीकेला काहीनी दाद दिली आहे. यशवंतराव मोहित्यानी दाद दिली होती. वसत बापटांच्या कवितेत 'जांभूळझाड' असा शब्द आहे. मोहिते बोलताना 'बाभूळझाड' असे म्हणाले मी यावर लिहिल तेव्हा मोहिते म्हणाले लेख असाच लिहायला पाहिजे मी जे लिहितो त्यात कधी चूक वाटलं नाही.

एस् एम्. जोशी, ना. ग. गोरे, भिंद्रनवाल्याना भेटून आले यावर एक उपहासात्मक लेख आमच्याकडे प्रसिद्ध झाला. मी लिहिलेला नव्हता. पण एस्. एम् दुखावले गेले. मी माफी मागितली--पाहिजे तर जाहीर माफी मागतो म्हटल; पण ते एस्. एम्. असल्यामुळे तसे म्हणाले नाहीत. बाकी खरं म्हणजे टीका केल्यावर माफी मागावी अशी माणसच हल्ली नाहीत.

**प्रश्न :** शरद पवाराना अनावृत्त पत्र तुम्ही लिहिलं, लक्ष्मणशास्त्रीनी तोडपाटीलकी पुरे करून ग्रथलेखन कराव असं तुम्ही लिहिलंत. त्याच्या प्रतिक्रिया काय झाल्या ?

**श्री. तळवलकर :** शरद पवारांनी तक्रार केली नाही. शास्त्रीबोवाचे पंचाहत्तर किंवा त्याच्या पुढच्या वाढदिवसानिमित्त वाई, सातारा अशा निरनिराळचा ठिकाणी गावागावातून सत्कार चालले होते, ते थाबले. आता ते पुन्हा सुरू झाले आहेत. त्यांनी उगीच कुठेतरी बँकेचं उद्घाटन वगैरे कामात लागू नये असं मला वाटतं.

**प्रश्न :** पदवीधर झाल्यापासून तुम्ही पत्रकारितेत आहात. इतर कुठे नोकरी मिळत नव्हती म्हणून आला की मुद्दाम या क्षेत्रात आलात ?

**श्री. तळवलकर :** मुद्दाम आलो. मला इंग्लिशचा प्राध्यापक व्हायचं होतं. पण परिस्थिती बरी नव्हती. बी. ए. झाल्यावर नोकरी हवी होती. शकरराव देवांच्या 'नवभारत' मध्ये मिळाली. पत्राहत्तर रुपये पगार मिळायचा. तेवढा मला पुरायचा. नंतर 'लोकसत्ते'मध्ये गेलो. तेथे अतर्गत भांडणे वाढली तेव्हा महाजनीनी मला सरकारी पब्लिसिटी डिपार्टमेंटला नोकरी मिळवून दिली. नतर महाजनी लोकसत्तेचे सपादक झाल्यावर मी पुन्हा लोकसत्तेमध्ये आलो. हे एक जिवत क्षेत्र आहे. सगळचा जगातल्या घडामोडीशी इथे सबंध येतो.

**प्रश्न :** पंचाहत्तर रुपये पगारात पुस्तके घेतली की इतर काही ?

**श्री तळवलकर :** पुस्तकंच घेतली असतील. तेव्हा पुस्तकाच्या किंमती फार कमी होत्या. एकदोन रुपयात पुस्तकं मिळायची. एक रुपयात नामदार गोखल्याचा भाषणांचा सग्रह घेतल्याचं मला आठवतं.

**प्रश्न :** वृत्तपत्रसृष्टीत जगाशी संबंध येतो हे खरं; पण रोज लिहिताना कटाळा येत नाही का ?

**श्री. तळवलकर :** आवड असल्यामुळे कटाळा येत नाही महिन्यात एखादा भाकड दिवस असतो; पण अशा वेळी दुसऱ्या लेखावरून, पुस्तकावरून विषय सुचतो.

**प्रश्न :** खेळाची तुमची आवड कोणती ?

**श्री. तळवलकर :** मी क्रिकेट खेळत होतो. पोहत होतो. इतर व्यापात हे हळूहळू कमी झालं क्रिकेटमध्ये लोक वेळ फार घालवतात अस वाटत मला टेनिस बघणं आवडतं. पाच–पाच दिवस क्रिकेटच्या मागं धावणं हे पटतच नाही.

**प्रश्न** : तुम्ही सामाजिक क्षेत्रात जात नाही तर तुमचा समाजाशी सबंध रहाणार कसा ?

**श्री. तळवलकर** : मी सामाजिक क्षेत्रात जातो; पण गाजावाजा करीत नाही. जिथे जायचं तिथं मी जातो. भलत्या ठिकाणी जात नाही. बागला देशचं युद्ध झालं तेव्हा मी पाकिस्तानच्या सरहद्दीवर आणि पाकिस्तानच्या बऱ्याच आत जाऊन आलो. परिसंवाद, परिषदा वगैरे ठिकाणी मी जात नाही.

**प्रश्न** : का ?

**श्री. तळवलकर** : त्यात काही अर्थ वाटत नाही.

**प्रश्न** : आपण माणूसघाणे झालो आहोत असं वाटतं का ? लोकानी भेटायला यावं असं वाटतं का ?

**श्री. तळवलकर** : खूप लोकांनी यावं असं वाटत नाही. माझे थोडे मित्र आहेत. त्याना आवर्जून भेटतो. काय होतं आपला लेख छापला जावा म्हणून लोक येतात. जास्त लोक जमले की आपण त्यात गुतून पडतो. निःपक्षपाती रहाणं कठीण होतं. म्हणून सपर्क नको हेच बरं.

**प्रश्न** : पण यामुळे लोकजीवन समजून घेण्यात अडथळा येत नाही का ? एका सपादकानी तुम्हाला म्हटलं होतं, 'मी तुमच्यासारखा बैठा पत्रकार नाही.'

**श्री. तळवलकर** : हा एक एक निर्णय घ्यायचा असतो. लोकाना समजून घ्यायला निरनिराळ्या सहकाऱ्यांशी सपर्क ठेवला की पुरे असं मला वाटतं.

**प्रश्न** : अग्रलेखांचे विषय तुम्ही स्वतः ठरवता की सहकाऱ्यांची बैठक घेऊन ठरवता ? तुमच्या शैलीवर परदेशी पत्रकाराचा प्रभाव आहे का ?

**श्री. तळतलकर** : विषय मुख्यत. मी ठरवतो. पण आमची सहकाऱ्याची विशिष्ट वेळी बैठक असते. तेव्हा गोखले, मराठे, रणदिवे यांचाही विचार घेतला जातो

**प्रश्न** : अग्रलेख नेहमी तुम्हीच लिहिता की इतर कोणी लिहायचे ?

**श्री. तळवलकर** : बहुतेक मीच लिहितो. क्वचित गोखले लिहायचे. शैलीबद्दल म्हणाल तर माझ्यावर महाजनीच्या शैलीचा प्रभाव आहे. मी रॉयिस्ट आहे. रॉय याच्या विश्लेषण करण्याच्या शैलीचाही माझ्यावर प्रभाव आहे. 'दासबोध' हा सुद्धा माझा आवडता ग्रंथ. लोकमान्याच्या शैलीचा प्रभाव माझ्यावर आहे. याचा अर्थ मी स्वतःला लोकमान्यांच्या बरोबरीचा समजतो असा नाही.

**प्रश्न** : लेखन हे एकंदर फार तापदायक असतं. तुम्हाला काही 'मूड' वगैरे लागतो का ?

**श्री. तळवलकर** : 'मूड'चे चोजले संपादकाला चालत नाहीत. व्यवस्थापक म्हणतील 'इथून जा. आमचा मूड आज वेगळा आहे.'

**प्रश्न** : तुमच्या लेखांमध्ये मालकाची ढवळाढवळ कितपत असते ?

**श्री. तळवलकर** : लेख वाचल्यावर ते तुम्हीच ठरवा. भांडवलदारी मालक सपादकांना रोज फोन करून विषय सागतात अशी सर्वसाधारण समजूत आहे. भांडवलदार हे बदमाष, ते आम्हाला लोकांविरुद्ध लिहायला लावतात अशी कल्पना आहे; पण असं असतं तर हजारो लोकांनी आमची वर्तमानपत्र घेतली असती का ? मला ढवळाढवळीचा अनुभव नाही.

**प्रश्न** : अतुले प्रकरणाची माहिती तुम्ही शौरीना पुरवली. तुम्ही का प्रसिद्ध केली नाही ?

**श्री. तळवलकर** : माझी आणि शौरीची बातमी एकाच वेळी प्रसिद्ध झाली. शौरीचा फोन आला तेव्हा माझ्याकडे जी माहिती होती ती त्याना दिली. त्यात माझा स्वार्थ होता. केवळ मराठी वर्तमानपत्रात बातमी येऊन काही होणार नव्हतं. खरं म्हणजे ही माणसं वर्तमानपत्रामुळे बदलतच नाहीत. पार्लमेंटमध्ये आवाज यायला पाहिजे होता. म्हणून दंडवत्यांशी मी बोललो. मुद्दाम पार्लमेंटमध्ये आवाज उठवण्यासाठी व्यूह रचला होता.

**प्रश्न** : माहिती मिळवण्याची तुमची काही खास यंत्रणा आहे का ?

**श्री. तळवलकर** : कोणतीही खास यंत्रणा नाही. ओळखीतून मिळवायची.

**प्रश्न** : साहित्यसंस्कृती मडळाचे बार्लिगे म्हणाले, संस्कृती मंडळात काम होत नाहीत. कारण इथ तळवलकराची माणस आहेत.

**श्री. तळवलकर** : माझी माणसं तिथं नाहीत. त्याची काम होत नसतील तर त्यांनी राजिनामा द्यावा. कामं होत नाहीत तर रहातात कशाला ?

**प्रश्न** : जागतिक राजकारण आणि जागतिक अर्थकारण यांचे सदर्भ मराठी वृत्तपत्रात कमी येतात त्यामुळे मराठी वाचकाच्या ज्ञानाला, जाणीवांना मर्यादा येतात. तुमचा वृत्तपत्र गट आहे. तुमच्या इग्लिश वृत्तपत्रांची साधनसामग्री तुम्हाला वापरता येत नाही का ? इकॉनॉमिक टाइम्समधला चांगला लेख म. टाइम्समध्ये का येत नाही ? मिराशीवरचा तुमचा लेख टाइम्स ऑफ इडियामध्ये का जात नाही ? असं नसेल तर तुमच्या एकत्र गटाला अर्थ काय ?

**श्री. तळवळकर** : आमची आठ पानं आहेत, त्यात पन्नास टक्के जाहिराती. राहिली चार पान. त्यात महाराष्ट्राच्या प्रश्नाना महत्त्व द्यावं लागतं. जागतिक राजकारणासाठी 'आयफेल टॉवर' असतो. इंग्लिश ग्रंथ-परिचय असतो. पोलड, वॉटरगेट प्रकरण या विषयांवर इंग्लिश वर्तमानपत्रापेक्षा आम्ही जास्त लिहिलेलं होत. शेनीबद्दल इग्लिशमध्ये श्री. झा जे लिहितात ते आमच्या बुधवार पुरवणीत असतं आमची बारा किंवा सोळा पानं झाली तर आम्ही अधिक विषय घेऊ शकू

**प्रश्न** : तशी शक्यता आहे का ?

**श्री तळवलकर** : ते जाहिरातदारावर अवलंबून आहे. वर्तमानपत्र हा व्यवसाय आहे. आमची कपनी फायदा पहाणार.

टाइम्समधले लेख जसेच्या तसे घेण्यात मला अर्थ वाटत नाही. रिफ्लेक्शन नको. प्रत्येक वर्तमानपत्राला स्वतःचं अस्तित्व हवं. स्वत.चे स्वतंत्र विषय हवेत. विविध विषयांवर लिहिणारी त्या कुवतीची माणसं हवीत. वर्तमानपत्राकडे ती नेहमी नसतात. बाहेरच्या लेखकानी लिहावं अशी अपेक्षा असते; पण ते तितकं लिहित नाहीत.

**प्रश्न** : तळवलकरांना इंग्लिशच आकर्षण आहे अस म्हटलं जातं. तुमची मितभाषा, मितहास्य हे प्रथमपासून आहे की, इग्लडला जाऊन आल्यावर ?

**श्री. तळवलकर** : मितभाषा, मितहास्य हे पहिल्यापासूनच आहे. मी हसत नाही अशी कल्पना मात्र चुकीची आहे ठणठणपाळ वाचताना मी हसत होतो. आणखी कितीतरी विनोदी पुस्तक वाचताना मी हसतो; पण उगाचच हसत बसणं मला आवडत नाही. शेक्सपिअरच्या मताप्रमाणे हसणारा माणूस

व्हिलन असू शकतो.

युरोपच्या संस्कृतीचं मला आकर्षण आहे. कोस्लर हंगेरियन होता. इंग्लंडला आला. नंतर सगळं जग हिंडून पुन्हा इंग्लंडला आला. त्याचं म्हणणं ज्या देशात परत जावंस वाटतं तो आपला देश. त्याचं म्हणणं, इंग्लंडमध्ये फ्रेंच रेव्होल्यूशन, रशियन रेव्होल्यूशन येणार नाही. इथे खोमेनी, हिटलर होणार नाही. इथे सर्वसामान्य माणसं असतील. म्हणून मला इथे आवडते.

**प्रश्न** : तुम्हाला इंग्लंडचं प्रेम आहे. त्या ठिकाणी उदारमतवाद आहे. भारतासारख्या अविकसित देशात व्यक्तिस्वातंत्र्यवाद, उदारमतवाद कितपत येऊ शकतो ?

**श्री. तळवलकर** : ' Oh to be in England ' अस मी म्हणतो. तिकडे जायला मला केव्हाही आवडतं तेथले जीवन आणि वाङमय याबद्दल मी आणि पी. एल देशपांडे खूप बोलतो. इतराना कटाळा येतो, पण आम्हाला कटाळा येत नाही. काहीही स्वीकारताना मला प्रत्येक गोष्टीबद्दल संशय असतो. ती गोष्ट लोकप्रिय असेल तर फारच सशय असतो.

ज्या ठिकाणी सरकार सुसंस्कृत असतं त्याच ठिकाणी उदारमतवाद जगू शकतो. सत्याग्रह करून सुसस्कृत सरकारशी सामना देता येतो. आपल्याकडे हैद्राबादमध्ये किंवा गोव्यामध्ये सैन्य घुसवाव लागल.

**प्रश्न** : ब्रिटिशाचं प्रेम ठीक आहे. मराठी भाषा, मराठी लेख याबद्दल तुच्छता तुमच्या मनात आहे मराठी नाटक, चित्रपट तुम्ही पहात नाही. मराठी पुस्तक वाचीत नाही.

**श्री. तळवलकर** : मी मराठी वाचत नाही हे खोटं. मी आणि दळवी एकदा पुस्तकं निवडीच्या एकाच कमिटीवर होतो, पण भारतातच विद्वत्तेची वाण आहे, तिथ महाराष्ट्राचं काय ? न्यूयॉर्क, जर्मनी, इंग्लंड या ठिकाणची विद्वता वघितल्यावर इथे काही वाटतच नाही. ज्ञानकोशकार केतकर लोकमान्य टिळकांकडे गेले होते. ज्ञानकोशासाठी त्याना काही माहिती हवी होती. तेव्हा लोकमान्य टिळकानी त्याना सागितलं, सगळे लेख नीट तपासून घ्या. आम्ही वर्तमानपत्रात लिहिताना कोणाच्याही मागे विद्वान हा शब्द लावतो, पण या ठिकाणी भाडारकर सोडून कोणीही विद्वान नाही.

मराठी नाटकाबद्दल म्हणाल, तर मी दळवीची नाटकं पहातो. प्रश्न असा आहे दळवी इतराची किती नाटकं पहातात ? मी इतरही मराठी नाटक पहातो. खूप नाही. वर्षातून दोन-तीन बघितली तरी पुरे होतात. सहज वाचता वाचता या सदरात मी मराठी पुस्तकांवर कधी लिहिलं नाही कारण मराठी पुस्तकांवर लिहिणारे बरेच आहेत. म्हणून मी इंग्लिश पुस्तकावर लिहितो.

**प्रश्न** : मराठी भाषेबद्दलच्या तुमच्या वृत्तीबद्दल जी भूमिका घेतली ती बरोबर वाटते आहे. बेळगावबद्दलची तुमची भूमिका याच दृष्टीतून आली ?

**श्री. तळवलकर** : नाही. बेळगाव सबंधात महाजन कमिशन आपण मागितलं. त्यांचा निकाल विरुद्ध लागल्यावर आपण ते चुकीचं म्हणायचं हे पटत नाही हा काही खेळ नाही. शिवाय आयरीश लोकांप्रमाणे एकच विषय घेऊन त्याभोवती पंचवीस–तीस वर्ष झुजत बसायच हे बरोबर वाटत नाही.

**प्रश्न** : इंग्लडला गेल्यावर आवडत्या लेखकांना भेटलात का ? किती आनंद किंवा अपेक्षाभग झाला ?

**श्री. तळवलकर** : माझ्या पुस्तकाच्या सबधित दोन जणांना भेटलो. लेखकाना भेटलो नाही ऑर्थर कोस्लरची भेट मुबईत झाली होती. त्याची मुलाखत घेतली होती. इग्लडमध्ये मी पूर्वी कोणाला भेटण्याचा प्रयत्न केला नाही. पण माल्कम, ए जी. पीट इ. मंडळीना आता भेटायचं ठरवल आहे.

**प्रश्न** : तुम्ही दर दिवशी इग्लिश पाने किती वाचता ?

**श्री. तळवलकर** : पन्नास पानं साधारण वाचतो. तेवढं वाचल नाही तर आंघोळ न केल्यासारख वाटतं.

या प्रश्नाबरोबरच मुलाखत सपली. यानंतर श्रोत्यामधून काही प्रश्न आले त्यानाही श्री. तळवलकरानी उत्तरे दिली.

**प्रश्न** : आणीबाणीच्या काळात मालकाच्या धोरणामुळे घणघणाती लेखन करता आल नाही. याचा मानसिक परिणाम तुमच्यावर झाला ?

**श्री. तळवलकर** : परिणाम तसा झाला. जेव्हा तामिळनाडूच सरकार बरखास्त केलं होतं तेव्हा त्याच्या विरोधी लिहिणं शक्य नव्हतं. ते जाणवलं.

**प्रश्न** : दलितांबद्दल तुमच्या मनात उपहास का ? शकरराव खरात समेलनाध्यक्ष झाल्यावर तुम्ही अभिनंदनपर का लिहिलं नाही ? दलितस्थान झाल्यास तुम्हाला काय वाटेल ?

**श्री. तळवलकर** : दलितांबद्दल उपहास माझ्या मनात नाही. ढसाळ, ढाले आमच्याकडे लिहितात. समेलनाध्यक्षावर अभिनंदनपर मी लिहीतच नाही. माडगूळकरांवरचा आमच्याकडचा लेख मी लिहिलेला नव्हता. कोणत्याही गोष्टीसाठी मोहीम काढणं हे माझं ध्येय नाही. अनेक अग्रलेख मी दलिताच्या बाजूनी लिहिले आहेत. राखीव जागा हे वेगळं प्रकरण आहे, ' Other backward classes ' म्हणजे गुजराथ गव्हर्मेंटनी केलेली सत्ताधाऱ्याची सोय आहे. विरोधी पक्षही या बाबतीत पूर्वग्रहपतित आहेत. मागासलेल्याना पुढे आणण्याचा राखीव जागा हा एकमेव उपाय नाही.

**प्रश्न** : मालकाचं नियंत्रण वृत्तपत्रावर नसत म्हणता, तर अरुण शौरीनी इंडियन एक्सप्रेस का सोडला ?

**श्री. तळवलकर** : इतराबद्दल मी बोललो नाही. माझ्यावर नियंत्रण नाही अस मी म्हटल.

मुलाखतकार प्रश्न स्पष्ट आणि नेमके विचारीत होते. श्री. तळवलकर यानीही कोणत्या उत्तराची टाळाटाळ न करता मोजक्या परतु आवश्यक तेवढ्या विस्ताराने मुलाखतकाराच्या प्रश्नाना उत्तरे दिली. त्यामुळे दीड तास सुरू असलेला कार्यक्रम जराही कटाळवाणा झाला नाही. मुलाखतकारानी स्तुतीची सुमने उधळली नाहीत किंवा तोफेचे गोळे डागले नाही. मात्र मनात असलेले प्रश्न आणि डाचत असलेल्या शका मनमोकळेपणाने विचारल्या. फारशी भीड ठेवली नसावी. यामुळे मुलाखत रूक्ष वैचारिक झाली नाही किंवा केवळ रंजक, हशा पिकवणारी अशीही झाली नाही. विचार आणि रंजन याचा मेळ सहज या कार्यक्रमात साधला गेला.

ही मुलाखत श्री. तळवलकरांच्या विचाराचे बारकावे दाखवणारी होती, असे मात्र म्हणता येणार नाही. जाहीरसभेमधल्या मुलाखतीत ते अपेक्षित नाही; परंतु श्री.

तळवलकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे काही कंगोरे मुलाखतीत जाणवले आणि त्यांनी मनात काही विचार निर्माण केले.

श्री. तळवलकर यांचे रोजचे जबरदस्त वाचन, बहुविध विषयांवरील लेखन, स्वतंत्र दृष्टिकोन, महाराष्ट्राला भूषणास्पद आहे. या बहुश्रुततेमुळेच 'महाराष्ट्र टाइम्स' हे सर्व मराठी दैनिकात विषय आणि आशय यांच्या दृष्टीने सरस दैनिक वाटते. परंतु श्री. तळवलकर यांचे इंग्लिश आणि इंग्लंड यांचे प्रेम, त्याचबरोबर मराठी भाषा–महाराष्ट्र याबद्दलचा दृष्टिकोन ऐकल्यावर वाटले, श्री. तळवलकर भारतात–महाराष्ट्रात आणि त्यातही मराठी दैनिकाचे संपादक म्हणून इतकी वर्षे का राहिले? त्यांच्यासारखी व्यक्ती अगतिकपणे, प्रवाहपतीतपणे येथे राहिली हे संभवनीय वाटत नाही. येथून बाहेर पडण्याची संधी त्यांना मिळाली नाही? इतर देशात किंवा भारतातील इंग्लिश पत्रकारितेतील स्पर्धेत टिकण्याची त्यांना शक्यता वाटली नाही? की वरवर तुच्छता दिसली तरी मराठी–महाराष्ट्र याबद्दल त्यांच्या मनात खोल कुठे तरी प्रेम दडलेले आहे? ज्या देशात पुन्हा पुन्हा जावेसे वाटते तो आपला देश असे कोस्लरचे मत सांगून, नंतर बोलण्याचे ओघात ते स्वतःला पुनःपुन्हा इंग्लंडला जावेसे वाटते असे म्हणाले. म्हणजे श्री. तळवलकर यांचा देश इंग्लंड म्हणायचा का? तळवलकरांना पुनःपुन्हा इंग्लंडला जावेसे वाटले तरी ते पुनःपुन्हा यावेत असे इंग्लंड देशाला वाटते का? पुन्हा इंग्लंडला जाणार तेव्हा कोणत्या इंग्लिश लेखकांना भेटण्याचा प्रयत्न करणार याची लांबलचक यादी श्री. तळवलकर यांनी सांगितली; पण आधीच्या भेटीत या लेखकांना भेटण्याचा प्रयत्न त्यांनी का केला नाही यावर ते बोलले नाहीत. का? श्री. तळवलकर यांनी पुरेशा संदर्भाशिवाय कथन केलेले कोस्लरचे मतच मुळात एकांगी वाटते. चाळीच्या एका खोलीत रहाणाऱ्या माणसाला दुसऱ्याच्या मोठ्या बंगल्यात पुनःपुन्हा जावेसे वाटले तरी तो बंगला त्याचे घर होऊ शकते का? त्या बंगल्याकडे सतत नजर ठेवून स्वतःच्या चाळीला तुच्छ लेखणारा माणूस चाळीचे प्रश्न सोडवू शकेल का? इंग्लिशच्या तोडीचे लेखक मराठी वृत्तपत्रीय नोकरीत नाहीत, बाहेरचे लोक लेख देत नाहीत असे तळवलकर म्हणाले; पण खोलात जाऊन याची कारणे त्यांनी कधी शोधली का? मराठी लेखांना मिळणारे मानधन आणि इंग्लिश लेखांना मिळणारे मानधन यातली तफावत हे एक कारण असू शकेल, या बाजूने त्यांनी विचार केला का? मराठी लेखक आणि लेखांबद्दल सहजपणे तुच्छतेने बोलणारे हे संपादक तरुण मराठी लेखकांना कितपत प्रोत्साहन देऊ शकतात? आणीबाणीत तामिळनाडूविरुद्ध लिहिणे शक्य नव्हते असे तळवलकर म्हणाले आणि मालकाचे नियंत्रण मला अनुभवाला आले नाही असेही ते म्हणाले. या विसंगतीला काय म्हणायचे?

सहसा जाहीर कार्यक्रमात नसणारे श्री. तळवलकर मॅजेस्टिक गप्पांच्या निमित्ताने थोडा वेळ मराठी जनतेच्या निकट आले, बोलले, बरे वाटले. यातून काही एकमेकांबद्दल समज, गैरसमज निर्माण होतील किंवा दूरही होतील; पण संपादक आणि समाज यांच्यात सतत देवाणघेवाण झाली पाहिजे असे वाटते.

—विनया खडपेकर

---

डार्विनचे वेगळेपण हे की त्याने माणसाला 'माणूस' केले. मनुष्यात 'ईश्वरी' अंश आहे, तसेच कोणा एकाच्या पापामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, या दोन्ही धार्मिक असत्यांच्या मगरमिठीतून त्याने माणूस मुक्त केला.

पण भारतीय समाजाला ही मगरमिठी अजून पूर्ण सोडवता आलेली नाही. माणसातील जाती-पोटजाती थेट परमेश्वराने निर्माण केल्या आहेत अशी आपली श्रद्धा आहे.

म्हणूनच डार्विन चरित्राचा अभ्यास आज उपयुक्त ठरेल.

# चार्ल्स डार्विन

**व्यक्ती, क्रांती आणि उत्क्रांती**

**लेखक : भा. रा. बापट**

डेमी आकार, पृष्ठे : १८२
भरपूर आकृत्या व साधार विवेचनासह प्रकाशित झालेली पहिली आवृत्ती.

**किंमत : रुपये बत्तीस**

शाळा कॉलेजच्या ग्रंथपालांनी त्वरित मागणी करावी.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ३०.

ह्या ना त्या निमित्ताने

# यजमान....पूर्वीचे आणि आत्ताचे

फिरोझ रानडे

' पण जर खरंच सासरच्या लोकानी मदत केली असली व यजमानांनी म्हणजे नवऱ्याने मोकळीक दिली असली, समजूतदारपणा दाखवला असला आणि त्याचा उल्लेख जर एखाद्या बाईने मोठ्या आदराने व अभिमानाने केला तर त्याबद्दल एवढी टीका व टवाळी करायची गरजच काय, म्हणते मी.' एवढे मालगाडीसारखे लांबलचक वाक्य राधा नुसतेच म्हणाली नव्हती तर अगदी रागारागाने म्हणाली होती.

विषय अगदी आजकालच्या वापरातला होता. म्हणजे स्त्री–मुक्ती व त्या संदर्भात होणाऱ्या वेगवेगळ्या चळवळी हा होता हे वेगळे सांगणे नकोच. त्या विषयावरची श्यामची मते पण वेगळी सांगायला नकोत. उरवठ्याला–पुरवठा म्हणून श्यामचा एक जुना आणि जाणता मित्र–गोविंदा सहकुटुंब, सहपरिवार म्हणजे आपल्या बायकोबरोबर म्हणजे आशाबरोबर दुपारचे जेवायला म्हणून आला होता.

गोविंदाही सर्वसामान्यपणे पुरुष–म्हणजे नवरे–मंडळी जितकी स्त्रीद्वेष्टी वा स्त्री–मुक्ती लढाद्वेष्टी असतात तेव्हढा होता. स्त्रीमुक्ती द्वेषाविषयी ही खुबी लक्षात घेण्याजोगी आहे. लग्न न झालेले पुरुष म्हणजे तरुण कधीही स्त्री–मुक्तीद्वेष्टे नसतात. उलट त्यांना 'मुक्त' स्त्रियाच जास्त आवडतात. बहुधा लग्नानंतरच हा स्त्री–द्वेष्टेपणा सुरू होत असावा.

गोविंदा मूल-बाळ असलेला, लग्न झालेला होता त्यामुळे तो स्त्री–मुक्ती–चळवळ–द्वेष्टा तर होताच पण त्याची बायको आशा राधाच्या बरोबरीने स्त्री–मुक्ती लढ्यात भाग घेणारी असल्यामुळे त्याच्या द्वेष्टेपणाला एक वेगळी धार होती.

जेवण व्हायला तसा अवकाश होता. म्हणजे तसे जेवण्याचे घरात बनवावयाचे पदार्थ तयार झाले होते. बाहेरूनचे म्हणजे वारणानगरचे श्रीखंड, लज्जतचे पापड, बेडेकरबंधूंची लोणची वगैरे पण तयार होती. पण का कुणास ठाऊक, सुट्टीच्या दिवशी लवकर जेऊन घ्यायला मन करत नाही त्याप्रमाणेच त्या दोघांचेही मन करत नव्हते.

सुट्टीचा वार होता पण रविवार नव्हता म्हणून घरात दूरदर्शन असून नसल्यासारखाच होता. तेव्हा अशा वेळी स्त्री–मुक्ती व चळवळ हा विषय निघणे अगदी साहजिकच होते. आणि त्या साहजिकतेत कोणा दोन जावा–जावांनी कोठल्यातरी जाहीर कार्यक्रमात आपल्याला सासरच्या मंडळींनी अशी मदत केली, आपआपले काम करायला यजमानांनी कशी मोकळीक दिली वगैरे गोडवे गायल्याची भर पडली होती.

त्या जावा–जावातली एक जाऊ गेले दहा वर्षे एक संगीताचा, नृत्याचा व इतर करमणुकीचा कार्यक्रम करणाऱ्याचा चमू चालवीत होती. गेल्या दहा वर्षात त्याचे महाराष्ट्रात, इतर प्रांतात, इतकच नव्हे तर अगदी परदेशातही शेकडो कार्यक्रम झाले होते.

एकतर महाराष्ट्रात कोणतीही संस्था दहा वर्ष टिकवणे व चालवणे हेच मोठे भारी काम आहे. पूर्वी जसे शेकड्याने बाल-मृत्यू होत त्याप्रमाणे संस्थांचेही बालमृत्यू होतात. एखादी संस्था दोनतीन वर्षे चालली की कोणीतरी 'मधु' निघतो आणि त्या संस्थेची वाट लावतो.–ह्या जावेच्या बाबतीत तसे झाले नव्हते. गेली दहा वर्षे जवळजवळ तिने एकटीने तो चमू चालवला होता, यशस्वी केला होता. दहाव्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांनी मोठा समारंभ केला होता. अध्यक्ष म्हणून मंत्री–महोदय आले होते. त्या समारंभात त्या पहिल्या जावेने आपल्याला सासरच्या मंडळींनी, त्यातल्या त्यात यजमानांनी कशी मदत केली हे मोठ्या कौतुकाने सांगितले होते.

श्यामाला व गोविंदालाही त्या पहिल्या जावेने सासरच्या लोकांचे व यजमानांचे कौतुक करण्यात काही गैर वाटले नव्हते. 'हे बघा' श्याम समजुतीच्या स्वरात म्हणाला 'हा गायनाचा–करमणुकीचा कार्यक्रम इंग्रजीत ज्याला commercial proposition म्हणतात तसा आहे त्यात कलेचा भाग असेल, तेव्हा तसे कार्यक्रम करण्यात त्या बाईंच्या यजमानानी मदत दिली, प्रोत्साहन दिले व मोकळीक दिली व त्याबद्दल त्याचे कौतुक केले तर त्यात काही अयोग्य नाही. त्या मराठी मासिकात मोठ्ठाले उद्योगपती आपल्या यशाचे श्रेय आपल्या हसतमुख बायकोला देत नाहीत का ? त्यातलाच हा प्रकार! खरा प्रश्न आहे तो दुसऱ्या जावेचा !'

हे मात्र अगदी खरे होते. खरा प्रश्न दुसऱ्या जावेचा व तिने आपल्या कार्यात सासरच्या लोकांनी कशी मदत केली व आपला यजमान किती समजुतदार आहे, आपल्याला कशी मदत करतो, मोकळीक देतो ह्याचे गोडवे गायले होते. त्याचा होता.

कारण ही दुसरी जाऊ चार–चौघीसारखी नव्हती. ती बुद्धिमान होती, कर्तृत्वान होती, मन लावून काम करणारी होती. स्त्री–मुक्ती लढ्याच्या सर्व रणक्षेत्रावर ती हिरीरीने लढत होती. पदयात्रा, सभा, चर्चा–सत्र, अभ्यासमंडळ, स्त्री–मुक्ती यात्रा काही म्हणून काही करायचे तिने शिल्लक ठेवले नव्हते पुस्तके व लेख लिहिणे, दूरदर्शनवर चर्चा ह्यात पण ती फार पुढारलेली होती.

संसाराबद्दल, नवरा–बायकोच्या संबंधाबद्दल तिच्या फार तिखट कल्पना होत्या. सुखी संसार हा मृगजळाचा सख्खा भाऊ आहे अशी तिची कल्पना असावी. एखादे दहा–बारा वर्षाचे मूल रविवारी वा सुट्टीच्या दिवशी दुपारचे दंगामस्ती करून आई–वडिलांना भंडावून सोडते त्याप्रमाणे ह्या दुसऱ्या

जावेने समाजाला भंडावून सोडले होते.

आणि ह्याच दुसऱ्या जावेने पहिल्या जावेच्या गायन–चमुच्या दहाव्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात आपल्याला सासरच्या लोकांनी कशी मदत केली, यजमानांनी कशी मोकळीक दिली, कार्य करायला कसे स्वातंत्र्य दिले ह्याचे कौतुक–गान गायले होते.

ते कौतुक-गानच गोविंदाचा व श्यामचा टीका बिंदू होता. गोविंदाने टिकेला सुरुवात केली तीच मुळी ह्या शब्दात :

'म्हणजे स्त्री-मुक्तीकरता लढा वगैरे सगळ्या गोष्टी फुसक्याच निघाल्या की ! आता सुदैवाने ह्या जावेचा नवरा पण समजूतदार, मदत करणारा, स्वातंत्र्य देणारा निघाला म्हणून ह्या बाईची सगळी चळवळ व कार्य. पण जर तो तसा निघाला नसता तर ?'

आणि ह्याच प्रश्नाला राधाने मालगाडीसारखा लांबच लांब प्रतिप्रश्न विचारून उत्तर दिले होते.

'सांगा ना, जर नवऱ्याने वा यजमानाने जर खरंच मदत केली असली तर त्याचा अभिमानाने उल्लेख करायला काय हरकत आहे ?'

पूर्वी दळण दळण्याकरता एक बाई दुसऱ्या बाईच्या जात्याला हात लावत असे तशी आशा राधाला हातभार लावत म्हणाली.

'त्यात हरकत काहीही नाही. पण त्यात आणि विशेष काय आहे ? आज अशी शेकडो कुटुंबं आहेत आणि महाराष्ट्रात तर ती परंपराच आहे. अगदी शंभर वर्षापासूनची जुनी.'

'न्यायमूर्ती रानड्यांचे लग्न झाले त्या वेळी रमाबाईना साधे लिहायला, वाचायलासुद्धा येत नव्हते. रावसाहेबांनी त्यांना प्रथम मराठी शिकवले, मग इंग्रजी शिकवले. गांधी आफ्रिकेतून परत आल्यावर कस्तुरबांच्या सत्कारसभेत लेडी फिरोझशहा मेहता, लेडी कावसजी जहांगीर यांच्याबरोबरीने रमाबाईनी भाषण दिले ! रमाबाई स्वत: मोठ्या बुद्धिमान होत्या. त्यावेळच्या मुंबई विधानसभेच्या पहिल्या स्त्री-सदस्य होत्या, माहीत आहे ?'

'पण हे सगळे न्यायमूर्ती रानड्यांमुळेच ना ? त्यांनी प्रोत्साहन दिले म्हणूनच ना ?' राधाने आपण महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे ह्या स्वरात म्हणाली.

'अर्थातच. रानड्यांनी नुसते प्रोत्साहन दिले नाही तर मोठा समजुतदारपणा पण दाखवला. त्यांना मूल नव्हते. पुष्कळ लोकांनी त्यांना दुसरे लग्न करायचा सल्ला दिला व शंभर वर्षापूर्वी ती पद्धत पण होती. तरी न्यायमूर्तींनी दुसरे लग्न केले नाही, हा खरा समजुतदारपणा.'

श्यामचा न्यायमूर्ती-अभिमान अगदी ओसांडून जात होता. कदाचित रानडे व फलाणे दोघेही 'ए' कारांत 'स्थ' आहेत म्हणून असेल.

'अहो पण तुमच्या त्या रमाबाईनी पण आपल्या यजमानांचे कौतुक केले आहेच की?' आशा.

'आपल्या आत्मचरित्रात भरपूर कौतुक केलं आहे.' आता गोविंदा श्यामच्या मदतीला धावला.

'मग त्या रमाबाईची प्रशंसा व आमच्या स्त्री-मुक्ती पुढारणीची टिंगल, असे का ?' राधा.

'अग, तो सगळा संदर्भच वेगळा आहे. एका गायनाचे व करमणुकीच्या कार्यक्रमाला तुम्ही जावेच का ?'

'बर जवळच्या नातेवाईकाचा म्हणजे जाऊबाईचा कार्यक्रम म्हणून गेलात तर स्टेजवर बसावे का ?'

'बरं स्टेजवर बसलात ते बसलात, तेथे भाषण ठोकावे का ?'

'बरं भाषण ठोकले तर त्या जाऊबाईबद्दल, तिच्या कार्यक्रमाबद्दल, तिच्या कर्तृत्वाबद्दल बोलायचे की, आपल्याला आपल्या नवऱ्याने कसे स्वातंत्र्य दिले, कशी मदत केली ह्याबद्दल बोलायचे ?'

'मग तुम्ही सुखी संसार म्हणजे मृगजळवत असे मुक्ती सभेतून कसे म्हणता ?'

'वर नवरा-बायको म्हणजे मालक-कामगार संबंधासारखे आहेत असे म्हणण्यापर्यंत तुमची मजल कशी जाते ?'

श्याम व गोविंदा प्रश्नावर प्रश्न करत होते राधा आणि आशा थोड्या भांबावून गेल्या. त्यांना श्याम-गोविंदाच्या बोलण्यात तथ्य वाटत होते व आपली पुढारीण चुकली हे पण जाणवत होते; पण हे सगळे कबूल करायला मन घेत नव्हते.

'मग तुम्हाला म्हणायचे आहे काय ? आम्ही कार्यकर्त्यांनी गाण्याच्या व करमणुकीच्या कार्यक्रमाला जाऊच नये काय ? मौज-मजा करूच नये काय ?'

'आम्हाला एवढेच म्हणावयाचे आहे की, ज्याला कोणाला सामाजिक कार्य करायचे असते त्याच्यावर फार जबाबदारी असते.' श्याम टिंगलीचा स्वर सोडून देऊन मोठ्या गंभीरतेने म्हणाला, कारण त्याला राधा-आशाच्या पुढारीणबाईबद्दल आदर होता.

ज्याला काही राजकीय वा सामाजिक बंधने तोडायची असतात, त्यालाच जास्त बंधने असतात. तो किंवा ती कोणत्या कार्यक्रमाला जातात तेथें काय बोलतात एवढेच काय पण खातात-पितात काय ह्याला ही फार महत्त्व असते.

'आता टिळकांचे पहा ना, ब्रिटिशांशी सिंहासारखा झुंजणारा, कुठे चहा–बिस्कुट खाल्ल्याबद्दल...'

'पुरे पुरे आता पर तरानडे-टिळक नकोत. चला भूक लागली. जेवून घेऊ या !' राधा घाईघाईने उठत म्हणाली.

आता सर्वांनाच भुका लागल्या होत्या, म्हणून राधाच्या सूचनेला कोणी विरोध केला नाही व सगळे जेवायला म्हणून उठले.

□


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

मला निसटलंच पाहिजे !

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# पारधी वस्तीवरील 'ग्रामायन' कार्यकर्त्याचा एक दिवस..

नामदेव माळी

आज सोमवार दि. २२।१०।८५. काल रात्रीपासून संततधार पाऊस येतोय. हवेने गारठा धरला आहे. मुक्काम शिवतक्रार म्हाळुंगीतच आहे. न्हावरा रस्त्यापासून १॥ किलोमीटर अंतरावर हे छोटंसं गाव. पावसाळा सुरू झाला की अंगावर काटाच येतो. घराबाहेर पडला की सारा चिखलच. अर्ध्या किलोच्या चपला तावडतोब ५ किलोच्या होतात. नेहमी रस्त्यावरून पळणारी सायकल खांद्यावर येते. बैलगाडीची चाके अर्धीएक जमिनीच्या कुशीत शिरतात. त्यामुळे त्यांना वर ओढून पुढे नेणे बैलांच्या नाकी नऊ आणते. अशाप्रकारे दळणवळण ठप्प होते.

आज तर मला सकाळी ९ वाजता पुण्यात पोहचायचे होते. सांगवी–सांडस पाणी पुरवठा योजनेच्या पुनरुज्जीवनाच्या कामी महाराष्ट्र बँकेने कर्ज द्यावयाचे मान्य केले होते. आता हातात कर्ज मिळणार, १३ वर्षे बंद लिफ्ट पुन्हा सुरू होणार, ग्रामायनने सतत दोन वर्षे केलेल्या अथक प्रयत्नांना फळ येणार अशा आनंदात असतानाच काही तांत्रिक अडचण ऐनवेळी उपस्थित झाली होती. त्यामुळे मला पुण्याला जावे लागत होते.

पाऊस व चिखल यांची फिकीर न करता पहाटे ५ वाजता उठून जाण्याची तयारी सुरू केली होती. पावसाचा मारा सतत सुरू होता. ७ वाजता निघणार होतो. मोटारसायकलवर पुण्याला जावयाचे होते. मोटारसायकल न्हावरा रस्त्यापर्यंत नेणे आवश्यक होते. दादा मंजावा शिवळे यांना सांगून बैलगाडीची व्यवस्था केली होती. ६॥ वाजता बैलगाडीसाठी निरोप पाठविला. मोटारसायकल हलविणार तोपर्यंत पारधी प्रकल्प निमगाव–म्हाळुंगी वरील शामा पिंपळे व रामदास काळे दारात येऊन उभे राहिले.

मी विचारले, इतक्या लवकर कसं काय येणं केलं ?

शामा – 'मधू म्हातारा मेला !'

माझ्यासमोर प्रश्नचिन्ह उभे राहिले. एकीकडे सांगवी–सांडसचे काम तर दुसरीकडे मधू म्हाताऱ्याच्या अंत्यसंस्कारालाही जाणे आवश्यक. मी मधू पारध्याच्या अंत्यसंस्काराला उपस्थित रहाण्याचा निर्णय घेतला.

पारधी प्रकल्प हा 'ग्रामायन'चे एक वेगळ्या प्रकारचे पण नाजूक काम. ग्रामायनने पारधी प्रकल्प, निमगाव–म्हाळुंगी, ता. शिरूर येथे ऑक्टोबर ८२ पासून काम सुरू केले. या मंडळींना दारू गाळणे, विकणे व चोऱ्या करण्याच्या धंद्यापासून परावृत्त करून त्यांना शेतीवर आणण्याचा व मानवी जीवनाची ओळख करून देण्याचा प्रयत्न सुरू केला.

आतापर्यंत मी स्वतः, जयश्री माळी, प्रसिद्ध समाज कार्यकर्ते श्री. आबा करमरकर आणि माझे ग्रामायनचे सहकारी यांनी लक्ष घातले. या प्रकल्पाची मुख्य जबाबदारी माझी असल्यामुळे व आम्हाला एक वेगळा प्रयोग करून पहावयाचे असल्यामुळे मी या प्रकल्पावर अधिक लक्ष घातले आहे. या मंडळींच्या बरोबर काम करणे, त्यांच्या बरोबर मैत्री निर्माण करणे, त्यांच्यातील भांडणे मिटवून त्यांना कामाला लावणे हे फार मोठे अवघड काम आहे. वर्षानुवर्षे पिढीजात लागलेल्या सवयी एक–दोन वर्षात ही माणसे सोडतील ही फार मोठी भ्रामक कल्पना आहे.

आज या प्रकल्पातील एक जुना दुवा गळून पडला होता.

बाप मेला म्हणून, प्रकल्पावर इतर लोक असताना, निरोप सांगण्यासाठी मुलगा आला होता. सोबत मेहुणा होता.

सध्या पारधी प्रकल्पावर चार कुटुंबे रहातात. (१) एका कुटुंबात दामा बापू पिंपळे व त्याची पत्नी जराबाई. वडील बापू पिंपळे व ७ मुले असे एकत्र रहातात. (२) दुसऱ्या कुटुंबात शामा पिंपळे त्याची पत्नी शांताबाई व दोन मुले असे एकत्र रहातात. (३) तिसऱ्या कुटुंबात रामदास मधु काळे, त्याची पत्नी दोन मुले व वृद्ध आई व गेलेला मधू म्हातारा तर (४) चौथ्या कुटुंबात मुरल्या पिंपळे व बुलबुली हे पती-पत्नी रहातात. यापैकी शेवटची दोन कुटुंबे, रहायला स्वतंत्र जागा नाही म्हणून एका अतिलहान अत्यंत गचाळ अशा झोपडीत रहातात. या झोपडीत उन, वारा व पाऊस यांना छपराच्या अनेक खिडक्यांतून मुक्त प्रवेश असतो. शामा पिंपळे पालात रहातो. पाल फाटके आहे म्हणून नवीन पाल आणणेसाठी गतवर्षी शामास १५० रुपये उसने दिले. १५० रुपये हातात मिळताच शामाची पत्नी पैसे घेऊन श्रीरामपूरला निघून गेली. येताना एक स्वस्त साडी घेऊन पैसे संपवून आली. आता पूर्वीच्याच पालात रहातात. शामा पालात रहातो तर त्याचा भाऊ दामा तणाच्या गोटावजा घरात रहातो. दामा, शामा, भाऊ. शामाला रामदासची बहिण शांता दिली. (मधु म्हाताऱ्याची मुलगी) त्यामुळे रामदास–शामा मेहुणे–मेहुणे. तसेच मुरलीधरला रामदासची दुसरी बहिण बुलबुली दिली म्हणजे ते दोघे मेहुणे–मेहुणे. असे यांचे नातेसबंध आहेत. म्हणजे आज जेव्हा मधु म्हातारा वारला तेव्हा त्याच्याजवळ एक मुलगा, एक सून, दोन नातू, दोन मुली, दोन जावई व पत्नी हजर होते.

आजच्या घटना नमूद करण्यापूर्वी मधु म्हाताऱ्याविषयी काही लिहिणे आवश्यक आहे असे वाटते. हा म्हातारा फार वेरका होता. सशासारखी त्याची नजर. जोपर्यंत

अंगात तरुण रक्त संचारत होते, तोपर्यंत या म्हाताऱ्याने मोठमोठ्या चोऱ्या केल्या. दरोडे घातले, चालत्या वेगवान वहानातून चोऱ्या करून उड्या मारल्या. तसे सर्व जीवन गुन्हेगारी करण्यात गेले. आयुष्याचा सूर्य मावळताना 'ग्रामायन'च्या प्रयत्नातून वेगळे जीवन चालू लागलेला हा म्हातारा ३० वर्षापूर्वी फिरता–फिरता निमगावला आला. फिरते जीवन सोडून येथेच स्थायिक झाला. मधू काळे व बापू पिंपळे (शामा–दामाचा बाप) हे दोघे येथे रहात होते. निमगाव म्हाळुंगीच्या लोकांशी दोस्ती करून, सरकारी अधिकाऱ्याशी संपर्क साधून त्यांनी फॉरेस्टच्या जमिनीपैकी ३० एकर ३० गुठे जमिन मिळविली. त्यापैकी १२ एकर १० गुठे जमिन एका तलाठ्याने गडप केली. आता १८ एकर २० गुठे जमिन शिल्लक आहे.

तर अशा प्रकारे लाख उलाढाली करणारा मधू म्हातारा वार्धक्याने वारला होता.

'मी आजपर्यंत असे पाहिले होते की, जवळचा माणूस वारल्यावर लोक दु.ख करतात, दुखवटा साजरा करतात. मयत माणसाची मुले–मुली लाबच्या ठिकाणी असतील तर त्याना बोलावून घेतात त्याच्या हस्ते पाणी पाजतात. सर्वजण मृत शरीराजवळ बसून रहातात, रडतात–वगैरे वगैरे. परंतु आज सकाळपासून मी वेगळाच अनुभव घेत होतो. कारण पारधी प्रकल्पावर इतर माणसे असताना, बाप मेला म्हणून सांगायला मेहुणा बरोबर घेऊन मुलगा आला होता. त्याला बाप गेल्याच्या दु.खापेक्षा बापाच्या मयतीसाठी माझ्याकडून पैसे घेण्याची आशा लागली होती. आणि अशा कामासाठी पैसे नक्की मिळणार म्हणून मृत बाप तसाच टाकून पोरगा शिवतक्रारला आला होता. अशा वेळी माणूस पैशाबाबत तपशीलवार विचार करीत नाही. त्या दोघांच्या म्हणण्यानुसार मी इतर कामासाठी ठेवलेले २०० रुपये त्याना दिले. साधारणपणे अंत्यसंस्कारासाठी सकाळचे ११ वाजतील म्हणून मी १०–१०॥ वाजता येतो म्हणून सांगितले. रामदास (मुलगा) म्हणत होता की, तो त्याच्या नातेवाईकास आणण्यासाठी पुण्याला जातो. बाप तसाच टाकून हा पठ्ठा पुण्याला निघाला. मी त्याला सांगितल की, पुण्याला अजिबात जावयाचे नाही. मेलेला बाप टाकून तू कसा काय जातोस? नातेवाईकास बोलाविण्यासाठी दुसरे कोणास तरी पाठवून द्या.

पैसे मिळताच ते दोघे बाहेर पडले.

मी १०–३० वाजता मोटार–सायकल बैलगाडीत चढविली. दोराने घट्ट बांधली. वरून पावसाचा मारा सारखाच चालू होता. तशीच मोटार सायकल म्हाळुंगी फाट्यावर आणली. तेथून पारधी प्रकल्पावर गेलो. तेथील एक एक घटना पाहून सुन्न झालो. पारधी प्रकल्पाजवळ जाऊन थांबतो न थाबतो तोच मन्या व दामा सायकलवरून मिठाचे पोते घेऊन येत असल्याचे दिसले. मन्याने हातात सायकल धरली होती तर दामा सायकल जोरजोराने ढकलत होना. दामाचा भयानक तोल जात होता. तो दारू प्याल्याचे लक्षात आले. दामा सायकल ढकलीत होता म्हणण्यापेक्षा तो कधी सायकलला धक्के देत होता तर कधी सायकलच्या आधारे तोल सावरण्याचा प्रयत्न करीत होता. मला मनस्वी भयकर राग आला होता. परंतु आपण आज शातपणे सगळे ऑब्झर्व्ह करावयाचे ठरविले. नतर एक एक गोष्ट समजू लागली.

## निर्णय होत नव्हता

माझ्याकडून २०० रुपये आणताच शामा, रामदास, शाताबाई व शाताबाईचे पोर जन्या ट्रक पकडून तळेगावला निघून गेले. पैसे मिळाल्यावर ते पारधी–प्रकल्पावर गेलेच नाहीत. याना जाताना पाहून पारधी प्रकल्पावरील लोक ओरडू लागले की, अरे तुम्ही तळेगावला जाऊ नका, निमगाववरून मीठ आणू; परंतु त्याचे कोण ऐकतो? रामदास (म्हाताऱ्याचा पोरगा) सरळ पुण्याला निघून गेला. कारण काय तर नातेवाईकांना पुण्यावरून आणावयाचे होते. शांताबाईन (मुलगी) २०० रुपयापैकी १५० रुपये शामाकडून घेतले व अक्षरश: पळतच ती फोटोग्राफरवाल्याकडे गेली. तिने कशाचाही विचार न करता फोटोवाल्याला १५० रुपये दिले व फोटोग्राफरला घेऊन ती आली धावत पळत जाऊन मयत बापाचा फोटो काढून घेण्याची तिने प्रथम व्यवस्था केली. १५० रुपयाचा मयत बापाचा फोटो काढून झाल्यावर नतर हे लोक म्हणत होते की, आमचा त्या म्हाताऱ्याचा हात धरून, डोके धरून फोटो काढू दे, रडताना फोटो काढू दे; परतु रोख पैसे नाहीत म्हणून फोटोग्राफरने फोटो काढण्यास नकार दिला. शाताबाईस ट्रक मिळाला नाही म्हणून तळेगाववरून ती चालत आली. दोन वाजता आली. शामा कापड व फुले घेऊन २॥ वाजता आला.

मधू म्हातारा पहाटेच मयत झाला होता. त्याला झोपडीच्या तोडाला आणून ठेवला होता. जवळ कोणीच नव्हते. एखादा माणूस झोपल्यावर जसा दिसतो तसा तो दिसत होता. डोक्यापासून–पायापर्यंत जुनी मळकट चादर पाघरून घातली होती. त्यामुळे मधूचे मृत शरीर मळकट चादरीखाली आरामशीर झोपले होते. मी जवळ गेल्यावर १–२मिनिटं जवळच्या बायानी थोडा रडण्याचा प्रयत्न केला; परतु तो फार वेळ टिकाव धरू शकला नाही. फारच वेळ झाला होता. दुपारचे तीन वाजून गेले तरी निर्णय होत नव्हता. आम्ही दिवसभर बसून–बसून अवघडलो होतो पोटात सकाळपासून अन्न नव्हते आणि ह्या म्हाताऱ्याचा अत्यविधी केव्हा होणार हे सागता येत नव्हते. आता निर्णय झाला की, मधूला मिठात पुरायचा; परतु प्रश्न असा निर्माण झाला की, खड्डा कोणी काढायचा? शामा फक्त काम करू शकत होता. बापू म्हातारा वयस्कर, रामदास पुण्यात, दामाचा पोरगा जागेवर नाही दामा दारू प्यालेला. शेवटी शामाने खड्डा काढण्यास सुरुवात केली. दामा दारूमुळे बेभान होऊन वाटेल तसे बोलत होता. गडा दो सालेको, जला दो साले को, असे बोलत होता. शामाला पण शिव्या घालत होता.

४ वाजले तरी रामदास पुण्यावरून येत नव्हता. पोरगा आल्याशिवाय बापाचा अंत्यविधी कसा करायचा? जवळचा पोरगा पुण्याला गेला आणि आम्ही मात्र पोरासाठी मुर्खासारखे वाट पहातोय. जास्त उशीर होईल तसा दामाच्या शिव्याच्या भडीमारास जोर येत होता. कारण दारूबरोबर सकाळपासूनचा उपास हेही कारण असावे. कधी एकदा म्हाताऱ्याला गाडून टाकतोय आणि आपण मोकळे होतोय असे दामाला झाले होते. आम्हीही वैतागून गेलो होतो. ४वाजता जयश्री व अशोक सातकर आले. रामदासला पाहण्यासाठी दोन वेळा मी मोटर सायकलवर घोलपवाडीपर्यंत चकरा मारल्या कारण आम्हाला असे समजले की, वहान मिळाले

नाही म्हणून रामदास पाहुण्यासह चालत येतोय. आमच्यासमोर तर भराभर लोकांच्या ट्रका भरून जात होत्या ४॥ वाजता रामदासची वाट न पहाता मधू म्हाताऱ्याला गाडण्याचा निर्णय घेतला. रामदासच्या पोराने (लहान मुलगा–४ वर्षांचा) म्हणजे मधूच्या नातवाने मधू म्हाताऱ्याच्या तोडात पाणी सोडले व आता उचला म्हाताऱ्याला म्हणून लोक म्हाताऱ्याला झोळीतून घेऊन जाऊन लागले.

तेवढ्यात रामदास आला असा आरडा–ओरडा झाला. पुन्हा रामदास येईपर्यंत थांबलो. रामदाम व त्याचा मेहुणा आले. दोघेही भरपूर दारू पिऊन आले होते. अशा परिस्थितीत कोणाला काही बोलण्यात अर्थ नव्हता. रामदासने म्हाताऱ्यास पाणी पाजले. रामदासचा मेहुणा म्हणाला म्हाताऱ्याला नेण्यासाठी तेरडी (ताटी) केली नाही. काय मूर्ख माणसे आहेत? आता झोळीचा विचार मागे पडून तेरडी तयार करण्याचा प्रयत्न सुरू झाला. मग इकडची तिकडची लाकडे गोळा केली. लाकडासाठी पळापळसुरू झाली दामाने रामदासच्या झोपडीचीच लाकडे ओढण्यास सुरुवात केली. होता नव्हता तेवढा निवारा पण नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू झाला मी आता मात्र दामाला विरोध केला. मग मात्र झोपडी वाचली. ताटी बाधण्याचे काम संपत आले होते एक लहान काठी आडवी बांधण्यासाठी कमी पडली. मधू म्हाताऱ्याची बायको शेजारीच होती. ती स्वस्थपणे सर्व घडामोडी पहात बसली होती. एकाने म्हातारीस तिच्या हातातील काठी तिरडी बाधण्यासाठी मागितली. म्हातारीने आपल्या मयत नवऱ्याच्या ताटीसाठी काठी देण्यास नकार दिला व म्हातारी उठून झोपडीत जाऊन बसली. कसेतरी ताटीचे काम झाले. म्हाताऱ्याच्या अंगावर नवीन, कापड टाकले, तोडात पान, गुलाल टाकला, म्हाताऱ्याला ताटीवर चढविले. ताटी चौघानी खाद्यावर घेतली. रस्त्यात खादे पालट झाली म्हाताऱ्याला खड्ड्याजवळ नेले. खडयात प्रथम मीठ टाकले, दामा मुद्दाम जवळ येत नव्हता. ते टाकण्यासाठी वा गाडण्यासाठी प्रयत्न करीत नव्हता.

आता म्हाताऱ्याला पुरण्यापूर्वी पुन्हा पाणी पाजायचे होते. तेही ओल्या फडक्याने रामदास पळत पळत ओढयावर गेला. अंगावरील कपडे त्यानी काढले. अंडरवेअर अंगावर ठेवून अघोळ केली. हातात एक कपडा घेतला. तोही पाण्यात भिजवला व ओल्या पडद्याने म्हाताऱ्याजवळ आला. कपडा पिळून म्हाताऱ्याच्या तोडात त्याने पाणी सोडले. म्हाताऱ्याला मीठावर झोपविले. त्याच्यावरून मीठ टाकले. नंतर वरून माती टाकली. या बाबतीत शामा काळजीपूर्वक व आस्थेने काम करीत होता; परंतु त्याचा पोरगा मन्या डोके दुखतय म्हणून पालात झोपला होता. मी दम भरल्यावर आला होता. दामा सुरवा. तीला माती ढकलीत नव्हता. मी सांगितल्यावर ढकलू लागला

म्हाताऱ्याला गाडण्यापूर्वी काहीनी म्हाताऱ्याचे अंत्यदर्शन घेतले. त्याची म्हातारी (पत्नी) जवळच होती. तिला दर्शन घ्यावयाला सांगितले. ती दर्शन घेईना. बळे बळे तिचा हात दुसऱ्या बायानी म्हाताऱ्याच्या तोडाजवळ नेला. आता शातावाई मोठ्यामोठ्याने गहिवरून रडत होती. ती खरोखरीच रडत होती की, रडायचे म्हणून रडत होती ते मला अद्याप समजलेच नाही.

¤

२२ ऑक्टोबरला वरील प्रसंग पारधी वस्तीवर घडला आणि या प्रकल्पाची जबाबदारी स्वीकारलेले नामदेव माळी अगदी हतबुद्ध झाले. दोन वर्षे ज्यांना आपुलकीने, समजुतीने वागवून, कधी थोडा धाकदपटशा दाखवून, प्रगतीच्या वाटेवर आणले, ज्यांच्या अनेक चुकांकडे–अपराधांकडे सहनशीलतेने-क्षमाशीलतेने बघितले, ती ही माणसे एकाएकी असं वेडयासारखी, स्वार्थीपणाने का वागतात? आपले, ग्रामायनाच्या सर्व कार्यकर्त्यांचे इतक्या दिवसाचे श्रम वायाच जाणार का? 'तळागाळात काम केले पाहिजे' म्हणून शहरात भाषणे ठोकणे-लेख लिहिणे वेगळे, प्रत्यक्ष काम असे क्षणोक्षणी कार्यकर्त्यांची परीक्षा पाहणारे. हजारो रुपये, कार्यकर्त्यांची अमाप शक्ती या प्रयोगात आजवर खर्ची पडली; १५। २० पारध्यांना, गुन्हेगारीच्या चक्रात अडकलेल्या भटक्या व विमुक्त जमातीच्या दोन। चार कुटुंबांना साधे माणुसकीचे व स्वत.च्या पायावर उभे असलेले जीवन जगता यावे यासाठी, पैशाची-मनुष्यबळाची पुरेशी सोय नसतानाही, ग्रामायनने हा प्रयोग हाती घेतला. पण वरच्यासारखा एखादा दिवस असा उगवतो आणि हा सगळा पारधी-प्रयोगच बंद करून टाकावा असे वाटायला लागते. पंधराच दिवस उलटले नव्हते; या पारध्यानी काय काय आश्वासने दिली होती? निमगाव-म्हाळुगीला ग्रामायनचे एक शिबिर होते. पारध्यांनाही या शिबिरात सहभागी करून घेतले होते. ग्रामायनाच्या १।२ कार्यकर्त्यांनी पारध्यांना खूप बोलते केले, त्याची एक सविस्तर मुलाखतच घेतली. रात्री जवळजवळ दोन तास हा कार्यक्रम चालू होता. आपल्याला वस्तीवर काय काय सुधारणा हव्या आहेत, त्यासाठी आपण काय करायला तयार आहोत, प्रगतीचे कोणते चित्र आपल्या डोळ्यांसमोर आहे, हे, पारधी सांगत होते आणि कार्यकर्ता लिहून घेत होता. या लिहून घेतलेल्या तुकड्यातुकड्यातून एक निवेदन तयार केले गेले व त्यावर हजर असलेल्या पारध्यांनी सह्या केल्या, आंगठे उठवले. हे निवेदन म्हणजे पारधी प्रकल्पाचे योजनापत्रकच आहे. पारधी म्हणतात :

---

## पारधी प्रकल्प

---

आम्ही फासेपारधी जमातीचे लोक गावच्या पूर्वेच्या बाजूस एक मैलावर रहातो. तेथे आमची तीन कुटुंबे आहेत, सर्व कुटुंबात मिळून आम्ही २१ ते २२ माणसे आहेत. तेथे आमच्या झोपड्या आहेत. तेथे आमची ३० एकर ३० गुंठे जमीन आहे ती आम्हास २० वर्षापूर्वी सरकारकडून मिळालेली आहे. पूर्वी ही जमीन जिरायतच होती. ती आम्ही पावसावरच कसत होते. शेती जिरायतच असल्याने पुरेसे उत्पन्न निघायचे नाही. त्यामुळे आम्ही दारूचा धदा करायचो. म्हणजे आम्ही दारू तयार करून विकायचो व पोट भरायचो.

दोन वर्षापूर्वी शिवतक्रार म्हाळुंगी येथील काम पाहून आम्ही तेथील कार्यकर्ते श्री. नामदेव माळी मामा याना भेटलो व त्यांना

आम्ही आमची सविस्तर कहाणी सांगितली. त्यांनी आम्हाला आमचे काम करण्याचे आश्वासन दिले. परंतु त्यांनी आम्हास दारूचा धंदा सोडून देण्याचे, चोऱ्यामाऱ्या, लबाडी सोडून देण्याची अट घातली व आम्ही ती मान्य केली. नतर त्यानी आम्हास 'तुम्ही शेती करणार का?' असे विचारले. तेही आम्ही मान्य केले.

त्यानतर माळीमामा व ग्रामायनचे इतर कार्यकर्ते यांनी आमच्या येथे भेट दिली व आमची मीटिंग घेतली. आम्हास कुटुबाचा आठवडयाचा खर्च किती लागतो हे विचारले 'तुम्ही सर्वजण तुमच्या शेतात काम करा, आम्ही तुमचा आठवडयाचा खर्च मजुरी म्हणून देऊ,' असे ग्रामायनच्या मडळींनी सागितले.

आम्ही माळीमामांच्या मार्गदर्शनाखाली कामास सुरुवात केली.

प्रथम शेतीला पडलेल्या ओगळा बुजवला व एक विहीर खोदली. विहिरीलाही चागले पाणी लागले.त्यानंतर आम्ही इजिनची मागणी केली ग्रामायनने आम्हास इंजिन व १२५० फूट पाईप लाईन दिली. तसेच पाच एकर जमिनीचे सपाटीकरण केले. सध्या आम्ही पाच ते साडेपाच एकराचे बागायत शेती करत आहोत. ह्या कामास सुरुवात झाल्यापासून आमची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. आम्ही पोटास पोटभर सुखाने खात आहोत. परतु आम्हास यापेक्षा जास्त प्रगती करावयाची आहे. त्यासाठी कष्ट करण्याची आमची तयारी आहे. आमच्या प्रगतीचे विचार व आमच्या समस्या खालीलप्रमाणे आहेत.

१) **शेतीविषयक सुधारणा :** आम्ही शेतामध्ये पाडलेली विहीर बांधण्याची आवश्यकता आहे कारण पावसाच्या पाण्याने ती सारखी गाडते. तसेच ती खोल करण्याचीही आमची इच्छा आहे. येत्या शेतीच्या उत्पन्नातून व स्वकष्टाने आम्ही ते काम करणार आहोत.

उरलेल्या चारपाच एकराचे सपाटीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे आमचे उत्पन्न आणखीन वाढेल.

आमच्याकडे सध्या चार बैल आहेत. परंतु आमच्याकडे बैलगाडी नाही. त्यामुळे खत वहाणे, माती वहाणे, दगड वहाणे, शेतातील निघालेला माल वहाणे यासाठी बैलगाडीची आवश्यकता आहे शेतकरी बैलगाडी देत नाहीत. त्यामुळे बरीच कामे अडून पडलेली आहेत. खारवटी जमिनीवर माती भरून जमीन चांगली करावयाची आहे. परंतु गाडी नसल्याने ते काम अडून पडले आहे. एखादी जुनीपानी गाडी मिळाली तरी बरे होईल.

शेतीसाठी खताची आवश्यकता असते. आम्हाला विकत खत घेऊन परवडत नाही. त्यासाठी आम्हास १५ ते २० बकरे घेवयाची आहेत त्यामुळे खताचा प्रश्न सुटेल व जोडधंद्यातूनही उत्पन्न वाढेल.

आतापर्यंत आमची पाईपलाईन मोकळी आहे. ती या उन्हाळयात आम्ही गाडणार आहोत. नतर घराजवळील माळरानावर झाडे लावणार आहोत. त्यामध्ये निमोणी, सत्रा, पेरू, आंबा, नारळ व सुबाभुळीची झाडे लावण्याचा विचार आहे.

शेतीला लहान लहान बाध घालण्याचे काम चालू आहे. शेतात ओघळ आहे तो तसाच ठेवून त्यामध्ये सुबाभूळ लावणार आहोत व बैलगाडी मिळाल्यावर सडकेजवळची मोठी बाध घालणार आहोत व ते काम आम्ही करणारच आहोत.

आमच्याकडे विहिरीवर डिझेल इंजिन आहे. आम्हाला डिझेल परवडत नाही व वेळेवर मिळत नाही. त्यामुळे आमच्या पिकाचे नुसकान होते व आमचीही धावपळ होते. त्यासाठी आम्हास विहिरीवर मोटार बसवून मिळावी.

आमच्या वडिलांच्या नावार पूर्वी (१) बापू गंगाराम पिंपळे (२) मधू गंगाराम काळे या दोघाच्या नावावर पूर्वी ३० एकर ३० गुठे (गट क्र. ५७५) जमीन होती व ती सर्व जमीन आमच्याकडे अद्यापही वहिवाटीस आहे. परंतु आठ वर्षापूर्वी त्यामध्ये तलाठयाने खाडाखोड करून आता आमच्या नावावर फक्त १८ एकर ३० गुठे जमीन ठेवली आहे व बाकीची जमीन त्यानी दुसऱ्याच्या नावावर घातली आहे. त्यासाठी खटपट करून पूर्वीचे उतारे काढले आहेत व त्यामुळे ३० एकर ३० गुठे जमीन आमच्या नावावर आहे तरी आम्हास आमची सर्व जमीन मिळावी ही आमची अपेक्षा आहे

२) **घराविषयी :** वर्षानुवर्षे आम्ही कापडाच्या पालातून व झोपडयातून दिवस काढत आहोत. थंडी पावसाचे फार हाल होतात. तसेच धान्ये, शेतीत पिकलेला माल भिजतो: तो ठेवण्यासाठी सुरक्षित जागा नाही. म्हणून आमचा पुरेसा निवारा बांधण्याचा विचार आहे

३) **मुलांच्या शिक्षणाविषयी :** आम्ही आमची मुले आश्रम शाळेत पाठवत आहोत. आम्ही अडाणी राहिलो परतु त्यांना शिकवून चागले करण्याचा आमचा विचार आहे. त्यासाठी आम्हास योग्य ती मदत व मार्गदर्शन मिळावे.

४) **दूधव्यवसाय :** गावात डेअरी निघणार आहे त्यामुळे दोन म्हशी घेण्याचा विचार आहे. म्हशी घेतल्याने मुलाबाळांना दूध मिळेल, शेतीला खत होईल व उरलेले दूध डेअरीला घातले तर चार पैसेही मिळतील.

अशाप्रकारे आमच्या समस्या आहेत व आमच्या पुढील कामाच्या कल्पना आहेत. त्यासाठी कष्ट करण्याची आमची तयारी आहे ग्रामायनच्या मार्गदर्शनाने आम्ही आज पोटभर सुखाने खात आहोत. यापुढेही अशीच मदत व सहकार्य ग्रामायनाचे मिळाल्यास आमचे वरील सर्व स्वप्न साकार होईल. आम्ही अद्याप हालात व गुन्हेगार म्हणून दिवस काढले आहेत. परतु आमच्या मुलास शिकवून स्वाभिमानाने जगविण्यास लावू. यासाठी आमची पाहिजे ते करण्याची तयारी आहे.

१) शामराव बापू पिंपळे
२) दामू बापू पिंपळे
३) रामदास मधू काळे
४) बापू गंगाराम पिंपळे
५) सौ. शाताबाई शामराव पिंपळे
६) सौ. जराबाई दामू पिंपळे
७) सौ. शालन रामदास काळे
८) सौ बुलबुलाबाई मुरलीधर पिंपळे

¤

पंधरा दिवसांपूर्वीच हे सगळं सागणारे, लिहून त्यावर सही-आगठा करणारे पारधी मधू म्हातारा मेल्यावर एकदम जुन्या वळणावर कसे जातात? आपल्याला या तळागाळाचा तळ कधी सापडणार आहे की नाही ? का आपणच तळागाळात रूतणार ?

■ या घटनेनंतर नामदेव माळी व ग्रामायनचा कोणीही कार्यकर्ता ८–१५ दिवस पारधी वस्तीकडे फिरकलाच नाही. इतका हा अनुभव अस्वस्थ करणारा होता.

■ काही काळ गेला; ग्रामायनचे कोणीच कसे येत नाही म्हणून पारधी चुळबुळ करू लागले. पुन्हा आणाभाका—शपथा झाल्या—काम पुढे चालू आहे. □

# १ मे : कामगार दिन

# नव्या औद्योगिक धोरणाने कामगार चळवळ धोक्यात ?

गिरिश प्रभुणे

कामगार चळवळीचा जवळून विचार करीत असताना आज धोरणात्मक एवढे मोठ्या प्रमाणात बदल होत असताना, अगदी मूलभूत औद्योगिकरणाचा पायाच ज्या तत्त्वांवर आधारित होता त्या तत्त्वापासूनच नवे औद्योगिक धोरण दूर चाललेले दिसताना कामगार क्षेत्रात आश्चर्यकारक शातता दिसून येत आहे. रोजगार निर्मिती येत्या पाचदहा वर्षात पूर्णपणे थाबणार असून, आधीच्याच गभीर समस्यांत बेकारीची समस्या ही भयानक होणार आहे. परतु या प्रश्नाकडे कामगार सघटनाचे म्हणावे तसे लक्ष आहे की नाही? कामगार वर्गाचे सर्वच प्रश्न जणू काही सपले आहेत अशी एक प्रकारची चमत्कारिक शातता दिसून येत आहे.

केवळ पिंपरी–चिंचवड परिसरच नव्हे तर कामगारक्षेत्रच नेतृत्वहीन दिसत आहे आज कामगारांना आपले प्रश्न सोडवील असा आशावादी नेता–धडाकेबद कार्यक्रम देणारा नेता दिसत नाही. पख कापलेल्या जटायूसारखी आज कामगार चळवळीची स्थिती झाली आहे भोपाळसारख्याच 'युनियन कार्बाईड' च्या घटनेनतर सपूर्ण हिंदुस्थानात कामगारक्षेत्रात रान उठेल असे वाटले होते, अभूतपूर्व चळवळ उभी राहील असे वाटले होते. पण ज्यावेळी भोपाळचा कामगार होरपळत होता, वेदनेने टाहो फोडत होता त्यावेळी आमचे कामगार नेते निवडणुकीत मताचा जोगवा मागत होते. रोम जळत होते आणि निरो फिडल वाजवीत होता.

भारतातील कामगार चळवळ कामगार हिताकडे किती जागरूकतेने पहात आहे हे यावरून दिसते. काही वर्षांपूर्वी अशाच प्रकारची कोळसा खाणीतली दुर्घटना झाली होती. त्यावेळीही असेच काहीसे घडले.

कामगार जीवन इतके असुरक्षित बनले असतानाही कामगार चळवळीचे त्याकडे दुर्लक्ष का होत आहे ? भारतीय कामगार हा असा स्वयकेन्द्रित का बनत चालला आहे...? जगातील कामगारानो एक व्हा, असा नारा देणारा कामगार स्वत.च्या शेजारच्या कामगाराची दु ख कसा काय जाणून घेऊ शकत नाही ? एकीकडे सर्व प्रकारच्या मार्गाने मुबईच्या गिरणी कामगाराचा अभूतपूर्व सप मोडून काढला जातो लक्षावधीचे जीवन उध्वस्त बनने, तरीही कामगार क्षेत्राची काही हानी न होता ते आहे तसेच आहे ? शासन, मालक आणि कामगार पुढारी आम्ही जिंकलो म्हणून आनदोत्सव करीत आहेत. कोण जिंकले ? आणि कोण हरले...?

एकदरीत या अस्वस्थ करणाऱ्या सर्वसामान्यांच्या मनातील प्रश्नांसंबधी कामगार चळवळीत प्रत्यक्ष काम करणाऱ्या कामगार नेत्याशी बोलावे, गेल्या काही वर्षातील वाटचालीतील यशापयशातून कामगार संघटना आणि कामगार चळवळ आज कशाप्रकारे वाटचाल करीत आहे हे पहावे, यादृष्टीने काही प्रातिनिधिक सघटनाच्या नेत्याशी त्या सदर्भात गप्पागोष्टी करून जाणून घ्यायचा प्रयत्न केला आहे. पुणे–पिंपरी–चिंचवड परिसरात काम करणारे हे कामगार पुढारी असले तरी कामगार चळवळीतले प्रातिनिधिक विचार त्यातून आपल्याला जाणून घेता येतील.

## कामगार क्षेत्रात अस्थिरता

सर्व श्रमिक सघटनेचे एक नेते कॉ. अशोक मनोहर यांना सर्वप्रथम भेटलो कॉ. अशोक मनोहर हे बी एस्सी झालेले असून, चार वर्ष धुळे जिल्ह्यात शहाद्याला आदिवासी शेतमजूराच्या संघटनेत त्यांनी काम केले. आणीबाणीनतर पुणे परिसरातील कामगार क्षेत्रात ते लाल निशाण पक्षाचे कार्यकर्ते म्हणून काम करू लागले. सर्व श्रमिक संघटना ही लाल निशाण पक्षाची कामगार आघाडी, त्याचे नेते ते आहेत.

आपल्या संघटनेच्या धोरणासंबंधी बोलताना कॉ मनोहर म्हणाले, 'आम्ही जरी लाल निशाण गटाचे सभासद असलो तरी कामगार सघटना आणि पक्ष वेगळा मानतो लाल निशाण पक्षाची ध्येयधोरणे सर्व श्रमिक संघटनेस मान्य असायलाच हवीत असे नाही. आमच्यात इतरही पक्षाची मडळी आहेत. ज्यावेळी एखादा सार्वजनिक प्रश्न उभा राहतो त्यावेळी आमची सघटना त्यासाठी पुढाकार घेऊन कृती समिती स्थापन करते डेव्हीड ब्राऊन, एस. के एफ या ठिकाणच्या कामगारावरील पोलिसाच्या हल्ल्याच्यावेळी त्या कारखान्यात आमची सघटना नसूनही आम्ही कृती समिती स्थापण्यासाठी पुढाकार घेतला होता. आजही बजाजच्या ज्या ३१ कामगारांना शिक्षा झालीय त्याच्यासाठी कृती समितीद्वारा हायकोर्टात केस लढवायचा प्रयत्न चालू आहे जिथे कामगार चळवळीचा प्रश्न आहे त्याठिकाणी एकत्रित कृती करण्यावर आमचा भर आहे. आणि त्यासाठी आम्ही आमच्या ऑफिसचा, कायदे सल्लागाराचा उपयोग इतर सघटनाना सुद्धा करून देतो'

आपल्या सघटनेचे कार्य कोणत्या प्रकारच्या कामगार वर्गात चालते यासंबंधी बोलताना श्री. मनोहर म्हणाले, 'लहानमोठ्या उद्योग-

धंद्यांमध्ये आमचे कार्य चालते. पुणे मनपा, बँक कर्मचारी यांचबरोबर छोट्या उद्योगांमधील कामगार संघटना आहेत. छोट्या उद्योगांमधील संघटना बांधताना खूप अडचणी असतात. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्यामुळे त्या ठिकाणी संघटना बांधता येत नाही. ती टिकत नाही. त्यासाठी जरी आर्थिक तोटा झाला तरी ती संघटना आम्ही चालवतो. अशी ३०–४० युनिटस् आहेत. त्यात नवीन भर पडत असते, जुने जात असतात असे चालू असते. या क्षेत्रात अशाप्रकारचे अस्थैर्य असूनही आमचे ४ पूर्णवेळ कार्यकर्ते काम करीत आहेत. संघटित कामगारांच्याक रवी असंघटित अशा कामगाराना आम्ही एकत्र करीत असतो. हल्ली मोठ्या कारखान्यांतून छोट्या कारखान्याना 'जॉब-वर्क' देण्याची प्रथा आहे. त्यामुळे अशा कामगाराची संख्या मोठी असते. अशावेळी आम्ही त्या त्या मोठ्या कारखान्याशी संलग्न जॉब–वर्क करणाऱ्या कामगारांना संघटित करीत असतो. टेल्को, व्हल्कन लावल, सॅन्डविक एशिया यांची उदाहरणे देता येतील.'

–पंतप्रधान राजीव गांधी यांच्या नवीन औद्योगिक धोरणाविषयी आपले काय मत आहे? पंतप्रधानांच्या या धोरणाचा कामगारवर्गावर कशाप्रकारे परिणाम होईल? या प्रश्नावर बोलताना कॉ. मनोहर म्हणाले,

'आजवरचे औद्योगिक धोरण हे रोजगाराभिमुख होते खाजगी उद्योगांच्याबरोबर सार्वजनिक उद्योग रहावेत असे धोरण होते. परंतु याच्या विरोधी राजीव गांधींचे धोरण दिसते आहे. भांडवली गुंतवणुकीचे म्हणजे मशिनरीमधील गुंतवणूक ही मोठ्या प्रमाणात होणार असून, त्यामुळे रोजगारनिर्मिती थांबणार आहे. आधुनिकीकरणाने हे प्रश्न जटिल बनणार आहेत. आज अनेक कारखान्यांनी त्यामुळे स्वेच्छेची निवृत्ती योजना जाहीर केली आहे. २१ व्या शतकात देश प्रवेश करीत असताना या 'जपानी' करणामुळे देशापुढे अनेक गंभीर प्रश्न उभे रहाणार आहेत. आत्तापर्यंत यंत्राचे सर्व भाग कारखान्यात तयार होत असत आता सुटे भाग अन्य ठिकाणी तयार करून फक्त जुळणी (असेम्बली) केली जाईल.'

या नव्या धोरणाचा कामगारांवर होणारा परिणाम सांगताना कॉ. मनोहर पुढे म्हणाले, 'कामगारवर्गात यामुळे पुढील पाच वर्षात अस्थिरता निर्माण होणार आहे. कामगारवर्गातील असंतोष उफाळून वर येईल कायद्याच्या मार्गाने जाणे योग्य असले, हिंसाचार नको असला तरी हिंसाचार अपरिहार्य होईल आजपर्यंत लढा देऊन कामगारवर्गात जी थोडीफार सुरक्षितता होती, ती संपुष्टात येऊ लागल्याने कामगारवर्गातील असंतोष उग्र स्वरूप धारण करेल. पुण्यातील कामगाराचे वय ३० ते ३५ असे सरासरी आहे. इथले उद्योग हे तरुण आहेत. पंचवीस वर्षे उद्योगाना स्थापून झाली आहेत. सुशिक्षित प्रशिक्षित आहे मराठी बोलणाऱ्या महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेला कामगार आहे पूर्वी मुंबईतला कामगार मुंबईत आला तरी गावाकडे जमीनशेती याकडे त्याचे लक्ष असे. तिथे काही करण्याची उमेद घेऊन तो येत असे. आता पुण्यातील कामगाराचे गावाकडचे नाते तुटले आहे तो जिथे जाईल तिथेच स्थायिक होतो. त्यामुळेच त्याच्या आशा–अपेक्षा उंचावल्या आहेत. त्यामुळे त्याच्या मागण्या वाढल्या आहेत. नवीन प्रश्न निर्माण झाले आहेत. आणि म्हणूनच तो हळूहळू आक्रमक बनत चालला आहे. त्याला कोणतीही परंपरा नाही, राजकीय नाही–कामगार चळवळीची नाही, एखाद्या राजकीय विचारांची धारणा त्याने पकडलेली नाही. त्याला त्या मार्गावर आणण्याचा आमचा प्रयत्न आहे.'

भोपाळ दुर्घटनेच्या संदर्भात बोलताना कॉ मनोहर यानी सांगितले की, 'भोपाळ दुर्घटनेनंतर कामगारवर्ग प्रथम जागृत दिसला; परंतु त्याच्यात वैचारिक जागृती मात्र झालेली दिसत नाही भोपाळ दुर्घटनेला १०० दिवस झाले. त्यानिमित्त लोकविज्ञान संघटनेच्या सहकार्याने आम्ही कामगार आघाडीतर्फे प्रदर्शन भरवून जागृती करण्याचा प्रयत्न केला. युनियन कार्बाईडच्या 'एव्हरेडी' या उत्पादनावर बहिष्कार घालण्यासाठी जनमत जागृत करण्याच्या प्रयत्नाला यश येत आहे'

## स्वतंत्र कामगार आघाडी

दत्ता सामंत याच्या संदर्भात बोलताना कॉ मनोहर म्हणाले, 'दत्ता सामंतांना पुणे परिसरात अपयश आले. कारण त्याच्या प्रवेशावर मालकवर्गाने अत्यंत कडक धोरण स्वीकारून 'सामंतानी संप पुकारताच टाळेबंदी जाहीर केली. भारतफोर्ज–क्लोराइड इंडिया; या ठिकाणी अशा प्रकारे झाले. शिवाय सामंतानी मागितलेली वाढच इंटरनल युनियन केल्यावर दिली गेली. याचा अर्थच हा, की इथल्या उद्योगपतींना लढाऊ कामगारनेता नको आहे. लौकिक अर्थाने दत्ता सामंत अपयशी दिसत असले तरी लढाऊपणात अपयश नाही. कारण दहा-दहा महिने संप चालू होते'

कामगार चळवळीसंबंधी बोलताना कॉ. मनोहर याचे म्हणणे पडले की, 'राजकीय पक्षामधून आज कामगारक्षेत्रात कार्यकर्ते येतात, त्याऐवजी कामगारामधूनच कार्यकर्ते यायला हवेत. तरच कामगार चळवळ भक्कम पायावर उभी राहील. आज राजकीय आंदोलनात जे घडत असते– मोर्चे, निदर्शने इ गोष्टीतून जी नासधूस होते तिथे राजकीय कार्यकर्ते हे गुन्हेगार ठरत नाहीत. कामगार मात्र अशा मोर्चे-निदर्शनात गुन्हेगार ठरतो. त्याला सक्तमजुरीची शिक्षा होते. म्हणजे न्याय मागण्यासाठी सत्याग्रह करणे हा गुन्हा समजला गेलाय. आम्ही संपकरी कामगाराच्या बरोबरच्या शेतमजूरानाही आर्थिक मदत गोळा करून देत असतो.'

एकीकडे राजकीय क्षेत्रातून कार्यकर्ते नकोत असे म्हणत असताना कामगार आघाडीमार्फत निवडणुका लढविल्या जातात हे कसे काय? यावर बोलताना कॉ. मनोहर म्हणाले –

'लालनिशाण पक्ष हा एकमेव क्रान्तिकारी पक्ष आहे असे आम्ही मानत नाही. कामगाराच्या काही मागण्या, प्रश्न यासाठी कामगार प्रतिनिधी हे निवडून जाणे आवश्यक असते म्हणून आम्ही सर्व संघटनाची मिळून कामगार आघाडी तयार करून निवडणुका लढवत असतो. नव्या आर्थिक धोरणाचे भांडवलदारानी एकत्रितरित्या स्वागत केले आहे. भांडवलदाराचे प्रतिनिधी निवडणुकामधून निवडून येतात. त्यामुळे कामगार आघाडी स्वतंत्रपणे निवडणुका लढवीत आहे'

**कामगार नेत्यांच्या मुलाखतींवर आधारित विशेष लेख**

कॉ. अशोक मनोहर यांच्यानंतर पुणे परिसरातील एका मोठ्या अ. भा. संघटनेचे भारतीय मजदूर संघटनेचे नेते श्री. उदयराव पटवर्धन यांना भेटलो.

श्री. उदयराव पटवर्धन हे भा. म. संघाचे पुणे जिल्ह्याचे जनरल सेक्रेटरी आहेत. बी. एस. सी., एल. एल. बी. पर्यंत शिक्षण झालेले पटवर्धन हे कामगार कायद्याचे मोठे जाणकार समजले जातात. त्यांनी मजदूर संघाच्या वाटचालीच्या सफलतेविषयी बोलताना सांगितले.

---

## राजकीय नेत्यांमुळे नुकसान

---

' मजदूर संघाच्या स्थापनेपूर्वीच्या सर्व संघटनांवर साम्यवादी विचाराचा प्रभाव होता शिवाय राजकीय पक्षाच्या कामगार आघाड्या असे त्यांचे स्वरूप होते. राजकीय कारणांवरून फाटाफुटीनंतर त्या तयार झाल्या होत्या. त्यातून समाजाची बांधिलकी शिकविली जात नव्हती. समाज उभा राहिला तर कामगार उभा रहाणार ही संकल्पना मान्य नव्हती. देशहित, उद्योगहित आणि कामगारहीत ही सर्व एकाच दिशेने आणि एकमेकास पूरक असतात हा विचारच कुणी मांडला नव्हता. त्यामुळे कामगार संघटनांनी घेतलेले निर्णय देशहिताला तसेच समाजहिताला पूरक ठरतीलच असे नव्हते. कामगारांच्या व्यक्तिगत स्वार्थापलीकडे प्रस्थापित कामगार संघटनाकडून शिक्षण मिळत नव्हते परकीय तत्त्वज्ञानाबरोबरच परकीय संस्कृतीचा प्रभाव संघटनांवर होता.

कामगार संघटना देशाच्या उन्नतीचे साधन म्हणून पाहिल्या जात नव्हत्या. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी मुंबईच्या कापड गिरण्या ओव्हर टाईमवर चालू होत्या. कामगारवर्गाला स्वातंत्र्यलढ्यात आणले गेलेच नाही. इंग्लंड आणि रशिया हे दुसऱ्या महायुद्धाच्या वेळेस मित्र होते. त्यामुळे आपल्या राजकीय विचारांच्या प्रभावाखाली इथल्या कामगारांना त्यावेळी आणून चळवळीचा उपयोग पक्षीय स्वार्थासाठी केला गेला. तेच स्वातंत्र्योत्तर काळातही घडत राहिले. त्यामुळे कामगार आहे तिथेच राहिला. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादाच्या चौकटीत कामगारहिताची बांधिलकी मानणारी संघटना म्हणून मजदूर संघ कामगारक्षेत्रात उतरला आणि त्याने राष्ट्रीय श्रमिक दिन १ मे ऐवजी १७ सप्टेंबर मानून त्याचा प्रसार केला. भारतीय संस्कृतीशी निगडित अशा भगव्या ध्वजाचा वापर तसेच चक्र–गव्हाची लोंबी हाताच्या मुठीत धरलेल्या मुठीचे संघटनेचे एकजुटीचे प्रतिक अशा प्रकारे आम्ही १ मे हा आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून मानतो. परंतु भारताचा राष्ट्रीय कामगार दिन १७ सप्टेंबर आम्ही सुरू केला, आज त्याला संपूर्ण देशभर इतरही संघटना मानतात.'

### कामगार हिताशी बांधिलकी

उदयराव पटवर्धन यांनी एक मेच्या संदर्भात मजदूर संघाची तात्त्विक भूमिका काय हे सांगितल्यानंतर त्यांना प्रश्न केला की या पार्श्वभूमीवर आपण भारतीय कामगार चळवळीत सर्व कामगारांसाठी असे कोणते कार्य केले आहे ?

' आमची इतर संघटनाप्रमाणे कोणत्याही राजकीय पक्षाची कामगार आघाडी नसल्यामुळे राजकीय पक्षांच्या यशापयशाचा आमच्या संघटनेवर कोणताही परिणाम होत नाही. आज नंबुद्रिपाद यांसारखे सर्व आयुष्य या क्षेत्रात घालविलेल्या कम्युनिस्ट नेत्यांनी मार्क्सवादी पक्षापासून कामगार संघटना स्वतंत्र करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. आज सर्वांनाच हा विचार पटू लागला आहे आणि असे होणे हेच आमचे मोठे यश आहे. आपापले राजकीय संबंध सोडून राजकीयहित पाहून कामगार चळवळ एकत्र होईल, तर मजदूर संघसुद्धा वेगळा ठेवण्याची आवश्यकता नाही !'

कामगार क्षेत्रातील काही लढ्यांबाबत बोलताना पटवर्धन यांनी सांगितले 'बोनस रिव्हिजनसाठी मजदूर संघाने लढा देऊन मुंबई बंद पुकारला त्यात सर्व संघटना सामील झाल्या होत्या. त्याला त्यावेळी यश येऊन लकडावाला समिती नेमली गेली आणि ४% बोनस मान्य झाला. त्यावर सतत आंदोलन करून तो ८.३३% करण्यात यश आले. आता मजदूर संघ बदलत्या काळात १२॥% बोनसची मागणी करीत आहे. आमचा विश्वास आहे, आम्ही ही मागणी पदरात पाडून घेऊ आवश्यक त्या ठिकाणी सनदशीर मार्गांचा अवलंब करून, लढाऊ देशव्यापी यशस्वी संपही मजदूर संघाने पुकारले आहेत. त्याला इतरांचेही सहकार्य मिळते. त्यासाठी राष्ट्रीय स्तरावर एक सर्व संघटनांची मिळून एक विचार समिती तयार करण्यात आली आहे. त्याद्वारे इतर कामगार संघटनांचे विचारही घेतले जातात.'

कामगाराच्या प्रश्नाबरोबरच काही विधायक कार्य आम्ही करीत असतो असे सांगताना ते म्हणाले की, 'वेगवेगळ्या विषयांच्या अभ्यासासाठी भारतीय श्रमशोध संस्था स्थापण्यात आली आहे तसेच अनेक वेळा प्रासंगिक आपत्तीत कामगाराकडून सहकार्य मिळवून देण्यात येते. पिंपरी–चिंचवड परिसरात नेत्रशिबिरातून कामगारांना अल्प किंमतीत चष्मे उपलब्ध करून देण्यात आले. रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात येतात. झोपडपट्टीतल्या विद्यार्थ्यांसाठी वह्या–पुस्तके आदीचे सहकार्य केले जाते.'

पंतप्रधान राजीव गांधीच्या नव्या औद्योगिक धोरणाचा कामगार क्षेत्रावर होणाऱ्या परिणामासंबंधी बोलताना उदयराव म्हणाले.

### यंत्र मानवाचे आगमन, धोका !

'पंतप्रधानांनी गणकयंत्राच्या वापरासंबंधीचे धोरण स्वीकारले आहे आज देशाच्या परिस्थितीचा विचार केला तर हे धोरण देशहिताच्या विरोधी असून आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या घातक आहे. मजदूर संघाने १९८४ साल हे संपूर्ण देशभर गणकयंत्र विरोधी वर्ष पाळून त्याविरुद्ध कामगारामध्ये आणि जनतेत जागृती करण्याचा प्रयत्न केला. अवकाश संशोधन, शिक्षण क्षेत्र, संरक्षण विभाग, जलसंशोधन आदी क्षेत्रात गणकयंत्राचा वापर करण्यास आमचा विरोध नाही. संशोधनाच्या नावाखाली काही कंपन्यांनी यापूर्वीच गणकयंत्राच्या साहाय्याने हिशोब ठेवणे-लिहिणे सुरू केले होते. (किर्लोस्कर) आता केवळ गणकयंत्राचाच वापर नव्हे तर यंत्रमानवाचे आगमन

पिंपरी–चिंचवड–पुणे परिसरात होत आहे. बजाज ऑटो-टेम्पो, टेल्को, कूपर या कारखान्यातून रोबो (ROBOT) या यंत्रमानवाचे आगमन झाले आहे. तो हिशोब ठेवण्याकरता येत नसून प्रत्यक्ष कामगाराच्या जागेवर श्रमाचे काम करणार आहे. त्यामुळे येती दहा–पंधरा वर्षे कामगार भरती पूर्णत: थांबणार आहे. आजच ती बंद झाली असून स्वेच्छेची निवृत्ती योजना कारखान्यांनी जाहीर केली आहे. त्यामुळे या 'रोबो' मुळे दरवर्षी जो नवीन रोजगार निर्माण होत असे तो बंद झाला आहे. आज कामगार जगतापुढे या रोबोमुळे भीषण असा भविष्यकाळ उभा आहे. अनेक नवीन समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे. आज सामान्य माणूस कुतुहलापोटी या धोरणाचे स्वागत करताना दिसत आहे; पण त्याच्याच मुलांच्या हातचा भविष्यातला रोजगार या धोरणामुळे काढून घेतला जाऊन त्यांचे भविष्य अंधारात लोटले जात आहे याची त्यांना कल्पना नाही. त्यासाठी जनजागर करणे आवश्यक आहे. मजदूर संघ आणि इतरही ते करीत आहेत.'

गणक यंत्रामुळे बेकारी वाढेल असे म्हणून ते पुढे म्हणाले, आज सर्वात पुढारलेल्या अमेरिकेत दरवर्षी लक्षावधी तरुण बेकार होत आहेत आणि भारताच्या पन्नासपट मोठी त्यांची अर्थव्यवस्था आहे. तरीही ते त्यावर मात करू शकलेले नाहीत. अमेरिकेतले साक्षरतेचे प्रमाण ९० % आहे. गणकयंत्राच्यामुळे आज तिथे असंख्य प्रश्न उभे राहिले असून तिथल्या कामगारास आज असुरक्षितता वाटते. त्यातूनच गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. भारत तर निरक्षरच अधिक आहे. आपल्या देशात त्यामुळे भयानक परिस्थिती निर्माण होईल प्रस्थापित मॅनेजमेंट जाऊन, नोकरशाहीचे युग संपून 'टेक्नोक्रॅट' (तंत्रशाही) चे युग अवतरेल. त्यामुळे 'ब्युरोक्रॅट' च्याऐवजी 'टेक्नोक्रॅट' चे युग या देशात सुरू होईल. त्याची सुरुवात पंतप्रधान राजीव गांधी यांनी केली आहेच. आज या शेतीनिष्ठ देशात कित्येक खेड्यात पिण्याचे पाणी मिळत नसताना, शेतीला पाणी नसल्याने उत्पादन-वाढ नाही. त्यामुळे गणकयंत्रावरील गुंतवणूक ही मोठी घातक ठरणार आहे. विषमतेत अधिक भर घालणारी ठरणार आहे. पुढील वर्षभरात १५७९९ गणकयंत्रे भारतात आयात केली जाणार आहेत. गणकयंत्रामुळे उत्पादनात वाढ होईल. त्याचा फायदा भांडवलदारांना होईल. या देशातला सामान्य माणूस उपाशीच राहील. आज अद्यापही सामान्य प्रश्नांची सोडवणूक नसताना पंतप्रधान तालुका विभागापर्यंत नजिकच्या पाच वर्षात गणकयंत्र नेऊ इच्छितात. गणकयंत्र जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन करू शकणार आहे का?'

कामगाराच्या संदर्भात उदयराव पटवर्धन यांनी सांगितले–गणकयंत्र आणि यंत्रमानवाचं आगमन याचा समाजाने अद्यापही गांभीर्याने विचार केला नाही. याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली आणि हा केवळ कामगार विश्वाचा प्रश्न नसून सामान्य जनतेशी निगडीत असा हा प्रश्न आहे असे सांगितले कामगार हा समाजाचा एक भाग आहे त्यामुळे हा प्रश्न समाजाचाच आहे. शासन–मालक यांच्या संगनमताने कामगार वर्गात पोलिसांकरवी अत्याचार होतात आणि हिंसाचार माजतो असे पटवर्धन म्हणाले–

## बेकारीची समस्या

पटवर्धन यांच्याप्रमाणेच या भागातील एक समाजवादी कामगार-नेते हिंदमजदूर सभेचे कार्यकर्ते श्री. मधू वाणी यांचे म्हणणे असे की,

'इंदिरा गांधींच्या आणि राजीव गांधींच्या धोरणात काहीही फरक नाही. त्याही कामगारविरोधी होत्या. इंदिरा गांधींनी सप्टेंमध्ये कामगारविरोधी I. D. ॲक्ट पास केला. यात कामगाराचे मूलभूत अधिकारच काढून घेण्यात आले आहेत. कोणतेही काम अत्यावश्यक ठरवून संपावर बंदी घालण्याचे अधिकार शासनाला त्यामुळे मिळाले असून, रजिस्ट्रार ऑफ ट्रेड युनियन्सला संघटनेत कोणत्याही कारणाने मॅनेजमेंटच्या हस्तक कामगाराकरवी तक्रार करवून रजिस्ट्रेशन रद्द करता येईल अशी सोय आहे. संपाची १४ दिवसाची नोटिस दिल्यानंतर कामगार-मत जागृत करावे लागते. त्याला कारखान्याच्या परिसरात बंदी करण्यात आली आहे. असे बोलणारी व्यक्ती ६ महिन्याच्या शिक्षेस पात्र ठरते. त्यामुळे कामगार चळवळ मुळातूनच चिरडून टाकण्याचा प्रयत्न इंदिरा गांधींनी समाजवादाच्या बुरख्याआडून केला आहे आणि राजीव गांधी तर समाजवाद हा शब्दसुद्धा उच्चारत नाहीत इतके त्यांना त्याचे वावडे आहे. गणकयंत्राच्या धोरणाने आज देशातील जे चार ते पाच कोट लोक बेकार आहेत. त्यात पाच ते सहा कोटींची भर पडून देशाला निकामी बनवून अराजकतेची वाट मोकळी करून देत आहेत.'

कामगार चळवळीतील नेते या परिस्थितीत कशा प्रकारे काम करीत आहेत? या प्रश्नावर श्री. वाणी म्हणाले,

'जितक्या पोट तिडिकेने या प्रश्नाकडे पहायला हवे तितके पाहिले जात नाही. याचे कारण स्वातंत्र्यपूर्व काळात आणि त्यानंतरही काही काळ जे राजकीय विचाराचे नेतृत्व या कामगार चळवळीत होते, ते संपल्यामुळे नेतृत्वाची उणीव कामगार चळवळीत निर्माण झाली आहे. आता जे कामगारनेते पुढे येत आहेत, त्यांच्यात राजकीय विचाराची तत्वाची निष्ठा नसते. मोठमोठ्या कारखान्यामधून आता अंतर्गत युनियन आहेत. स्थानिक नेते त्यांचे नेतृत्व करतात. मालकवर्ग राजकीय विचार पोहोचू नये यासाठी अशा स्थानिक कामगार नेत्यांचा उपयोग करून घेतात. नवीन कामगार पिढीला राजकीय विचार नको असतो. बोनस, पगारवाढीपुरता ते संघटनेचा विचार करतात. आमचा भर याबरोबरच वैचारिकतेचा असतो. तसेच सध्या महागाई निर्देशांक मिळत असतो. त्यामुळे महागाई विरोधात कामगार एकत्र येत नाहीत. आम्ही सर्व कामगारापर्यंत पोहोचू शकत नाही. शोषण विरहित समाज रचनेची भूमिका आम्ही कामगारांच्या गळयात उतरवू शकलो नाही. १०–१२% कामगार आज संघटित आहे. उर्वरित असंघटित कामगारांत संघटन वाढायला हवे. एच्. एम्. एस्. तेच काम मोठ्या प्रमाणात करीत आहे. छोटा शेतकरी–शेतमजूरांची संघटना आम्ही बांधत आहोत. रोजगार हमी योजनेवरील मजुरांची संघटना बांधली आहे आज कामगार चळवळ चालविणे पूर्वीपेक्षा कठीण झाले आहे. एकत्रितपणे संघटितपणे येऊन जोपर्यंत कामगार कार्य

करीत नाहीत, तोपर्यंत कामगारांचा विचार करणारे राज्य येणे कठीण आहे केवळ सघटित होऊन भाता भागणार नाही. विधायक कार्यक्रम द्यावा लागतो. त्यादृष्टीने आतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या सह-कार्याने मावळ तालुक्यात जयप्रकाश ग्रामविकास प्रतिष्ठान, तळेगाव येथे स्थापून त्याठिकाणी वर्कशॉप सुरू केले आहे त्याठिकाणी ग्रामीण भागातील तरुणांना स्वयरोजगार करण्याचे शिक्षण दिले जाते.'

सध्याच्या न्यायालयीन पद्धती संदर्भात बोलताना श्री. मधू वाणी म्हणाले,

' अत्यंत दिरंगाईच्या पद्धतीमुळे साध्या साध्या प्रकरणांचे निकाल लागायला पाच-पाच वर्ष लागतात. तोपर्यंत त्याप्रश्नाबरोबर अन्य प्रश्न निर्माण झालेले असतात. त्यामुळे या पद्धतीला कामगार कटाळ-तात. लेबर ऑफिसर्सना कोणतेच अधिकार नाहीत, त्यामुळे प्राथमिक स्टेजला सुटणारे प्रश्नही सुटत नाहीत. त्यामुळे कामगारात असंतोष पसरतो आणि न्यायालयावरचा विश्वास उडून कामगार सघर्षाने पेटून उठतो.'

### नेतृत्वाची उणीव हीच समस्या

दत्ता सामंत याच्या कामगार विषयक धोरणाचे विश्लेषण करताना श्री. मधू वाणी यानी सागितले की, ' दत्ता सामंत हे आजच्या काम-गार चळवळीला विधायक वळण देऊ शकतील असे वाटत नाही किंवा ते पर्याय होऊ शकत नाहीत. गिरणी कामगारांचा सप ज्या कारणा-साठी झाला ती कारणे योग्य होती सप झाला तो योग्य होता, परतु सामतानी ज्या पद्धतीने तो संप हाताळला ती पद्धत अत्यंत चुकीची होती. या पुणे परिसरात हेच झाले. आठ-आठ दहा-दहा महिने सप चालले, पण त्यातून कामगारांच्या पदरात काहीच पडले नाही. उलट सामंत या ठिकाणी कामगारांना साधे भेटायलासुद्धा आले नाहीत !'

सामताच्या निवडणुकीतील विजयासंबंधी बोलताना वाणी म्हणाले, ' गिरणी कामगार सपानील गिरणी कामगारांची जिद्द मोठी होती. सरकारी ताठर भूमिकेमुळे संप मोडला त्यामुळे कामगाराचा सर-कारवर रोष होता त्याची प्रतिक्रिया सामंत निवडून येण्यात झाली. हा कामगार चळवळीचा विजय नव्हे, कारण मागण्या मान्य झाल्या असत्या तर चळवळीचा किंवा सामंताच्या धोरणाचा विजय म्हणता आला असता. खरे तर दत्ता सामंताना भांडवलदारांनीच निर्माण केले आहे कारण सामंत करारामध्ये उत्पादन वाढीसाठी कामगारांना बाधून घेत असत '

पुणे-पिपरी-चिंचवडच्या कामगार चळवळीचे विश्लेषण करताना ते म्हणाले, ' पिंपरी-चिंचवड-पुणे परिसरात कामगार सघटनाचा प्रभाव पडू शकला नाही. S K F., डेव्हिड ब्राऊन, टेल्को, बजाज असे मोठे लढे झाले. परतु कामगार चळवळ उभी राहू शकली नाही. मुबईतल्या मानाने इथली चळवळ अपरिपक्वच आहे मुबईला अ. भा नेतृत्व मिळाले, कार्यकर्त्यांची साखळी निर्माण झाली. या ठिकाणी तशी साखळी निर्माण होऊ शकली नाही. मुबईसारख्या दोन संघ-टनात इथे हिंसात्मक वाद झाले नाहीत. '

एच. एम. एस ने आसाम, पजाब प्रश्नावर काही केले नाही. मात्र पंजाबमध्ये कामगारांच्या सदर्भात त्रिसदस्य समितीपुढे निवेदन दिले. लघुउद्योजकाना सीमावेतन कायदा त्रासदायक असेलही; पण तो रद्द केला तर मोठे उद्योगपती त्याचा गैरफायदा घेतील किमान कार्य-क्रमावर सर्व सघटनानी एकत्र येऊन लढा दिला तर बरेच प्रश्न सुटू शकतील, असे मधू वाणी याना वाटते.


## परसूच्या पशुकथा

**वसंत सबनीस**

**किंमत १२ रुपये**

परसू म्हणजेच परशुराम. बुटका, पहेलवानी देहाचा, बारीक डोळ्यांचा आणि पिसाट केसाचा परसू, अचानक शाळा सोडून गेला तो वीस वर्षांनी भेटला. या काळात तो सारं जग भटकला. प्राणिसंग्रहालयातील नोकरी, संस्थानिकांबरोबरच्या शिकारी, मलायात हिंस्र श्वापदाचा व्यापार व शेवटी सर्कसबरोबर केलेली भटकती असा त्याचा हा प्रवास होता. या प्रवासातील त्यानी सागितलेल्या शिकारीच्या, जंगलातील वास्तव्याच्या व वन्य प्राण्यांच्या अनेक स्वभाववैशिष्टचांच्या या कथा...

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.**


## अंतर्गत युनियन - तोडगा की समस्या ?

पिंपरी-चिंचवड परिसरातील सर्वात मोठ्या उद्योगातील अंतर्गत टेल्को कामगार सघटनेचे कार्यकर्ते आणि उपाध्यक्ष श्री ज्ञानेश्वर शेंडगे याच्या म्हणण्याप्रमाणे अतर्गत कामगार सघटना हीच खरी कामगार सघटना असते. कारण ही कामगारातीच बनविलेली असते. तिथल्या कामगाराची सुखदु खे त्यानाच माहीत असतात. त्यामुळे कामगाराचे प्रश्न त्वरीत टेबलावर जावून सुटू शकतात बाहेरच्या सघटनामुळे साध्यासाध्या प्रश्नावर ' टूल डाउन ', ' सप ', ' मोर्चा ' काढण्यापर्यंत पाळी येते.अतर्गत युनियनने हेच प्रश्न प्राथमिक स्टेज-लाच सुटताना दिसतात बाहेरच्या सघटनेमुळे कोणत्याही कारणाने काम बद ठेवावे लागते. उदा. पुढाऱ्याना अटक झाली की लगेच काम बद ठेवावे लागते. त्यामुळे कामगाराचेच नुकसान होते. बजाजमधे गोळीबार झाला त्यावेळी पुणे बदचा आदेश होता. पण आम्ही काम चालू ठेवून त्यातून ४० हजार रुपये त्या कामगाराना मदत देऊ केली,

परंतु त्यानी त्यावेळी आम्ही बंदमध्ये सामील झालो नाही म्हणून स्वीकारली नाही. परंतु नंतर मात्र आमच्या सघटनेची मदत त्यानी स्वीकारली. २२ हजार रुपये आम्ही सघटनेमार्फत कामगारांना दिले. कोणत्याच पक्षाला सलग्न नसल्यामुळे आम्हाला कोणत्याही राजकीय पुढाऱ्याकडे जायला संकोच वाटत नाही आणि त्यामुळे ते पुढारीही आमच्या प्रश्नात लक्ष घालतात. सर्वच पक्षाचे आम्हाला सहकार्य लाभते.

कपनीबरोबर न पटल्यामुळे वाद निर्माण झाल्याचे असख्य प्रकार आहेत असे सांगून श्री. शेडगे म्हणाले, 'काही प्रकरणी आम्ही कंपनीच्या विरोधात हायकोर्टापर्यंत केस लढविली आहे. ७७ साली प्रथमच सप केला. २२ दिवस सप चालू होता एका कामगारास एकच मशीन चालवावयास लागावे अशी मागणी होती. कपनी एकाच वेळेला कामगाराना दोन किंवा तीन मशीन चालविण्यास लावीत असे. आम्ही सप पुकारला; परंतु शासनाने ( श्री. वसंतदादा मुख्यमंत्री ) वटहुकूम काढून सप बेकायदेशीर ठरवला. आम्ही कोर्टात गेलो; परंतु कोर्टाने कपनीचा अधिकार मान्य केला आणि आज कामगाराना एकाच वेळेस २-३ मशिनकडे लक्ष द्यावे लागते आहे यावर सघटनेने मॅनेजमेंटबरोबर बोलणी करून २ इन्क्रिमेंट जादा वाढवून घेतली. या मशिन चालविण्याच्या निकालाच्या सदर्भात कामगाराचा विचार करणाऱ्या इतर बाहेरच्या सघटनांनी काय केले?'

### गणकयंत्राने नुकसान

असा प्रश्न करून श्री. शेडगे म्हणाले, 'आज कपनी म्हणजे कुटुंब आहे अशा विचाराने आम्ही वागत आहोत. तरीही अन्याय झाला तर त्वरीत त्यावर प्रतिकार केला जातो. मात्र कुटुंबातील वातावरण हे ताबडतोब निवळून वातावरण चागले बनले जाते. बाहेरचे विचार त्यामुळे कितीही चागले असले तरी त्याचा आम्ही विचार करत नाही. कामगार सघटनेमार्फत आम्ही अनेक उपक्रम करतो. औद्योगिक सहकारी सोसायटी आहे. त्याच्यामार्फत कामगाराच्या महिला, नातेवाईकाना काम दिले जाते. पॅकिंग, छपाई, बाइंडिंग, वायरिंग, टेलरिंग, मसाले पापड बनविणे, मशिनचे सुट्टे भाग बनविणे इत्यादी कामात कपनीच्या सहकार्याने कामगाराच्या कुटुंबियाना सहभागी करून घेतले आहे. दर महिन्याला कामगारासाठी विविध विषयावर व्याख्याने सघटनेमार्फत आयोजित केली जातात. ३६ गृहबांधणी सोसायटया कपनीच्या सहकार्याने उभ्या रहात असून त्याला २॥ कोटी रुपये कर्ज मिळाले आहे आतापर्यंत ५००० कामगाराची स्वतःची घरे झाली आहेत. 'विद्यानिकेतन' नावाची एक शिक्षण सस्था; संघटना आणि कपनीच्या सहकार्याने काढली आहे. १३००० कामगार त्याचे सभासद आहेत. दरमहा ५ रु. त्यासाठी घेतले जातात. त्यातून ही शाळा चालविली जाते, शिवाय ज्या भागात टेल्कोचे कामगार अधिक रहातात तेथील शाळेला मोठी देणगी देऊन शाळा प्रवेशातील अडचणी आम्ही दूर करतो. फक्त शिक्षण सस्थेत मॅनेजमेंटचे प्रतिनिधी आहेत. अन्य सर्व ठिकाणी कामगारसघटनाच काम पहाते कामगारांतील कलागुणाना वाव देण्यासाठी प्रशिक्षण वर्ग आम्ही घेतो रमेश भाटकरसारखे कलाकार त्यातून मिळू शकलेत. रमेश तावडे, मुरलीधर पेटकर असे आतरराष्ट्रीय किर्तीचे खेळाडू आहेत. त्याना सघटनेने प्रोत्साहन दिले '

स्वत. शेडगे पैलवान असून महाराष्ट्र कुस्तिगीर परिषदेचे सभासद आहेत. महाराष्ट्र क्रिकेट बोर्डाचे सभासद आहेत. कंपनीने संघटनेच्या सहकार्याने पिंपरी बुद्रुक हे गाव दत्तक घेतले. दहा वर्षांपूर्वी दुष्काळी असणारे हे गाव आज एक आदर्श गाव बनले आहे. त्या गावात कंपनीने नदीवर बंधारा बाधून दिला, गावात २५ सूर्यचुलीचा लोक वापर करतात. तसेच १३६ गोबर गॅस प्लँटचा वापर होत आहे गावात शाळा, ग्रथालय आदी सर्व सोयी झाल्या आहेत. हरिजनबांधवांच्या शेतीची सहकारी शेती सोसायटी स्थापन झाली असून त्यालाही चागले यश येत आहे. विधायक कार्यात कामगार कपनीस सर्व प्रकारचे सहकार्य देतात आणि कपनीही कामगारांच्या सुखसोयी, अडचणीकडे लक्ष देत असते.

पंतप्रधानाच्या औद्योगिक धोरणासंबंधी श्री. शेडगे म्हणाले, 'कामगारविरोधी धोरण आहे. गणकयंत्रामुळे कामगारवर्गाचेच नुकसान होणार आहे. स्वच्छ कारभार देऊ असे आश्वासन पंतप्रधानानी दिले असले तरी ते सर्व कागदावरच रहाणार आहे. आजचे राष्ट्रपती पूर्वी गृहमंत्री असताना आसाम प्रश्न सोडविण्यासाठी ७१ हे आधार वर्ष धरू असे म्हणाले होते; परंतु राष्ट्रपती झाल्यानंतर तो प्रश्न त्यानी सोडविला नाही. या अशा कारणानीच राजकारणी लोकांवरचा कामगाराचा विश्वास उडाला आहे. कामगाराचे जीवन उध्वस्त होईल असा लढा असू नये.

## डाव्यांची पकड सैल !

श्री. शेडगे यांच्या विचारातून सध्याच्या कामगार चळवळीवर नेमके बोट ठेवले गले.

पिंपरी–चिंचवड परिसरातील इंडियन फेडरेशन ऑफ ट्रेड युनियन्स–इफ्टूचे एक नक्षलवादी कामगार नेते कॉ. सुभाष सरीन याच्यामते कामगार वर्गावरील डाव्यांची पकड सैल होण्याला अनेक कारणे आहेत नक्षलवादी मडळी एका विशिष्ट काळात कामगारवर्गात प्रभावीपणे कार्य करीत होती. ती आपली राजकीय धोरणे राबविण्यासाठी ग्रामीण भागाकडे वळली. त्यानंतर अनेक राजकीय प्रवाहात भरकटत राहिली. चारू मुजुमदारच्या गटाने अतिडावे धोरण स्वीकारले आणि जनसघटनेतील काम संपून वैयक्तिक दहशतवादाचा मार्ग त्यानी पत्करला. यामुळे चळवळी मडळी, कामगार आणि शेतकरी यांच्यापासून दूर फेकली गेली. याला काहींचा विरोध होता, आणि यातूनच चारू मुजुमदारनतर काहींनी जनसंघटनेकडे लक्ष दिले आणि 'इफ्टू'चा जन्म झाला इफ्टू ही एकमेव अशी सघटना आहे की जी कामगारवर्गीय राजकारण मानून निश्चित स्वरूपाचा राजकीय कार्यक्रम मानून तिचा पाठपुरावा करणारी आहे त्या त्या ठिकाणच्या बळाप्रमाणे काम वाढत आहे.

सध्याच्या आर्थिक धोरणाच्या सदर्भात बोलताना कॉ सरीन म्हणाले, 'जागतिक बँकेचा रोल वाढत आहे. ज्यानी भारताचे बजेट बनविले त्यामागे जागतिक बँकेचे अधिकारी आहेत. त्यामुळे आपले आर्थिक धोरण बडया आणि खाजगी उद्योगाकडे अधिक झुकले असून

अतिउजवे झाले आहे.औद्योगिकरणातील आधुनिकीकरणाने युरोपातील समस्या याठिकाणी निर्माण होतील. मुक्त अर्थव्यवस्थेने सार्वजनिक उद्योग अधिक अडचणीत येईल.'

सध्याच्या कामगारचळवळीचे विश्लेषण करताना सरीन म्हणाले, 'ज्या मूलभूत हक्कांसाठी कामगारांनी गेली शतकभर लढा दिला तो रजेचा हक्क– आठवड्याची रजा, आज कामगार दुप्पट किंमतीस विकतो आणि ही मागणी कामगार संघटनासुद्धा करतात हे चळवळीचे दुर्दैव होय. येथील कामगाराचा प्रत्यक्ष कृतीवर अधिक भर आहे. कारण कोर्टकचेऱ्यांतून त्याला न्याय मिळत नाही. येथील मालक आक्रमक आहे. संप होताच तो टाळेबंदी पुकारतो. संप हे जसे कामगाराचे हत्यार आहे तसेच लॉकआऊट हे मालकाचे हत्यार आहे.'

लघुउद्योगामधील कामगारांसंबंधी बोलताना कॉ. सरीन म्हणाले की, बडेकारखानदार माल बाजारात विकताना पैसे ॲडव्हान्स घेऊन विकतात. मात्र ज्या लघुउद्योजकांकडून ते स्पेअरपार्टस् बनवून घेतात त्यांच्याकडून ७ दिवसाचे क्रेडिट घेतात. म्हणजे इकडे बँकाकडून पैसे कर्जावू घेऊन लघुउद्योजक मोठ्यांना माल पुरवतात आणि मोठे उद्योजक बिनव्याजी ते पैसे तीन महिने वापरतात. अर्थात या सर्व व्यवहाराचा फटका लघुउद्योजकांना बसतो आणि लघुउद्योगांतील कामगारांवर त्याचा ताण पडतो.'

'कामगार संघटनामधील संघर्ष हा धंद्याच्या स्पर्धेतून येतो. कामगार कल्याणातून नव्हे. निकोप चळवळीतले काहीजण अशा वेळी माघार घेतात. कामगार चळवळीत आज कार्यकर्ते सर्वत्रच कमी आढळतात, कारण पूर्वीसारखा विचाराचा प्रभाव, बांधिलकी राहिली नाही. पिंपरी–चिंचवडमधील काय आणि एकदरीत कामगार लढे हे सध्या तात्पुरत्या मागण्यापुरतेच असल्याने कामगारजळवळ आहे तिथेच आहे. एकदरीत सर्व कामगार चळवळ ही शिथिल बनत चालली आहे.'

पुणे परिसरातील पाच प्रमुख संघटनाच्या कामगार नेत्याच्या गप्पांमधून जे चित्र कामगारचळवळीबद्दल उभे रहाते ते अत्यंत चिंताजनक आहे. कामगारचळवळी पासून कामगारवर्ग दुरावत चालला आहे. कामगार नेतृत्वाच्या उणीवेने कामगारचळवळ दुबळी झाली आहे. राजकारण आणि कामगारचळवळ यांची सांगड घातल्यामुळे राजकीय क्षेत्रातील अपयशाने चळवळी संपुष्टात काल्या. जॉर्ज फर्नांडिस, आर जे. मेहता यासारखे कामगार नेते अस्तास गेले. पिंपरी–चिंचवड–पुणे परिसराचे एकमेव आशास्थान होते रूपमय चतर्जी; परंतु त्याच्या अपघाती निधनानतर त्यांची जागा घेऊ शकेल असा एकही नेता या परिसरात असू नये हे या चळवळीचं अपयशच नव्हे काय? राजकीय स्वार्थासाठी कामगारचळवळीचा वापर केला गेल्यामुळे कामगाराचा नेत्यावरील विश्वास उडाला. संपासारख्या अस्त्राचा वापर सर्रास केल्यामुळे त्याचे महत्त्व संपून त्याच्या विरोधात मालक संघटीत झाले. त्यांच्या हितसंबंधांमुळे शासकीय धोरणाचे पाठबळ भांडवलदारानाच मिळताना दिसते.

नव्या औद्योगिक धोरणाची दखल मजदूरसंघाने अधिक जाणीवपूर्वक घेऊन त्याविरुद्ध मागच्या निवडणुकीत जनमत जागृत करण्याचा प्रयत्न केला. भविष्यात येणाऱ्या बेकारीच्या भीषण संकटांस तोंड देण्यासाठी सर्व कामगार संघटना–विद्यार्थी संघटना, सामाजिक संघटनांनी एकत्र येऊन आवाज उठविणे आवश्यक आहे. त्याचबरोबर जागतिक स्पर्धेत उतरायचे असेल तर गणकयंत्रयुगाचा प्रवेश हा अपरिहार्य आहे हेही जाणून घ्यायला हवे. प्रगत तंत्रज्ञानाचा वापर विषमता वाढीपेक्षा, लोककल्याणार्थ कशा प्रकारे करता येईल हे पहायला हवे. गणकयंत्रयुगात प्रवेश करत असतानाच या देशातील शिक्षणात अमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. जे दोष–धोके अमेरिका–युरोपमध्ये जाणवले त्यावरील उपाययोजनांवर सुरुवातीपासूनच विचार व्हायला हवा आणि त्यासाठी २१ व्या शतकाच्या या सुप्रभातीपूर्वीच्या काळोखात कामगारसंघटनांनी आपल्या कार्यपद्धतीत काही दोष असतील तर सुधारायला हवेत. □

---


# राजहंस प्रकाशन

# कुंपण आणि आकाश

मंगला गोडबोले

वीस रुपये

बाईचं सुख? तिला दुःख आहेच कुठे?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे
खरं तर या दोन टोकांमध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न!

पुस्तके

# नाट्यसमीक्षा–कशी असावी, नसावी?

डिसेंबर १ व २, १९८४ रोजी पुणे येथे टिळक स्मारक मंदिरात,! ॲक्टिव्ह थिएटर्स पुणे यांनी प्रथमच (नाट्यइतिहासात) नाट्य-समीक्षा मेळावा आयोजित केला होता. त्या मेळाव्यात जे वक्ते बोलले व ज्यांनी निबंध वाचन केले त्याचे हे पुस्तक.

डॉ. वि. भा. देशपांडे त्यांच्या प्रास्ताविकात लिहितात, 'मराठी नाट्यसमीक्षेबद्दल अनेकदा विस्ताराने बोलले जाते; पण त्यामानाने त्यावरची पुस्तके मराठीत उपलब्ध नाहीत. म्हणून जे नाट्यरसिक, जाणकार वाचक, नाट्याभ्यासक आहेत त्यांना नाटक आणि रंगभूमीच्या क्षेत्रातील आजच्या महत्त्वाच्या काही व्यक्ती नाट्यसमीक्षेविषयी कोणता आणि कसा विचार करतात ते समजावे, हा या पुस्तकामागचा हेतू आहे...' हे खरे आहे. नाट्यशास्त्रातील अनेक विषय असे आहेत की, त्यावरील पुस्तके नाट्य शिकणाऱ्या होतकरूंना–विद्यार्थ्यांना उपयोगी पडतील. नाट्यदर्शन, रंगभूषा, नेपथ्य व प्रकाशयोजना, दिग्दर्शन या विषयावर पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्यातील काही उपलब्ध आहेत, काही नाहीत. त्याबरोबरच नाट्यसमीक्षा हाही विषय महत्त्वाचा आहे. त्या विषयावर हे पुस्तक उपलब्ध झाले हे फार चांगले झाले.

आज काल प्रकाशक असली पुस्तके प्रकाशित करायला धजत नाहीत. त्यांच्यापुढे असा प्रश्न असतो की असल्या विषयावरील पुस्तके किती खपतील (कारण वाचकवर्ग मर्यादित), फायदा किती होईल? ना नफा ना तोटा या संदर्भातसुद्धा कोणीही प्रकाशक असल्या विषयावरील पुस्तके प्रकाशित करीत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तरी या पुस्तकाचे प्रकाशक यांचे अभिनंदन करावेसे वाटते. कारण त्यांनी हे धाडस केले आहे. आजच्या व्यापारी आणि गतीमान काळात असे विचार ग्रंथनिविष्ट करून ठेवण्याची मोठी गरज आहे हे प्रकाशकाला भावले हेही नसे थोडके.

मी, एक नाट्यरसिक म्हणून वरील समीक्षा मेळाव्याला गेलो होतो. प्रा. माधव मनोहर, प्रा. सौ. पुष्पा भावे, ज्ञानेश्वर नाडकर्णी यांच्या निबंधाच्या प्रती मला मिळालेल्या होत्या आणि त्याचे वाचनही केले होते. डॉ. सुरेशचंद्र पाध्ये यांचा निबंध 'मराठी नाट्यसमीक्षा–विष्णुदास भावे ते आचार्य अत्रे' या निबंधाची प्रतही मला मिळाली होती पण वेळेच्या अभावी म्हणा तो निबंध त्यांनी वाचला नाही की त्यावर बोलले नाहीत. म्हणून तो निबंध या पुस्तकात समाविष्ट केला नाही की काय?

प्रा. माधव मनोहर यांचे अध्यक्षीय भाषण : माधवराव आज जवळजवळ तीसपस्तीस वर्षे दैनिके, साप्ताहिके, मासिके इत्यादींतून सातत्याने वेळोवेळी नाट्यसमीक्षणे (प्रायोगिक विशेषत:) लिहीत आहेत. त्या लिखाणातून त्यांनी जे परखडपणे व स्वच्छपणे लिहिले, त्या अनुषंगानेच त्यांचे हे भाषण झाले. उदा. मराठी नाटक थिटे का? ही लेखमाला (आचार्य अत्रे व माधव मनोहर) दुसरा विषय ट्रॅजेडी, नाट्यइतिहास नाट्यशिक्षण. इंग्रजी व मराठी नाटके व त्यांची तुलना, इंग्रजी नाटककार व मराठी नाटककार यांची तुलना, चोखंदळ प्रेक्षक (भाषणात वापरलेला 'चोखे' हा शब्द व त्याचा उलगडा) वगैरे असे अनेक वेळा त्यांनी भाषणातून व लेखनातून प्रकट केलेले मुद्दे त्यांनी या भाषणात एकसंघपणे मांडले. त्यामुळे नाही म्हटले तरी त्यांचे हे भाषण विद्यार्थ्यांसमोर झाल्यासारखे वाटले. तरीसुद्धा त्यांना आज ज्येष्ठ व श्रेष्ठ नाट्यसमीक्षक म्हणून मान्यता व मान मिळालेला आहे.

प्रा. माधवरावांचे भाषण म्हणजे नाट्यासंबंधीतल्या निगडित अशा अनेक विषयांचा त्यांनी उहापोह केलेला आहे त्यामुळे मार्गदर्शन म्हणून त्याकडे पाहता येईल. जुन्या पारंपारिक नाट्यप्रयोगापासून शेक्सपियर-इब्सेन यांचे नाट्यतंत्र ते आजच्या हीट ॲंड हॉट नाटकापर्यंतचा प्रवासही त्यांनी विशद केलेला आहे. एक अभ्यासू आणि विचार करण्याजोगे व्याख्यान आहे.

एक सांगायचे राहिले. प्रा. माधव मनोहर यांच्या भाषणाअगोदर डॉ. वि. भा. देशपांडे यांनी मेळाव्यामागची भूमिका म्हणून जे लिहिले आहे तेही विचार करण्याजोगे निश्चित आहे. वाचकांनी हेही प्रकरण वाचावे असे आवर्जून लिहितो.

श्रीमती विजया मेहता – उद्घाटनाचे भाषण–यांनी पाश्चात्य अभ्यासाच्या आधारे प्रामुख्याने, नाट्यसमीक्षक कसा असावा व सुसज्जता कशी असावी याचा उहापोह केला आहे. सात-सात वर्षे प्रशिक्षण घेतल्यावर (त्या शिक्षणाचा एक कोर्स आहे) तियला समीक्षक उभा राहतो असे मांडले आहे. कलाकार व समीक्षक यांचा संवाद होण्यावरही त्यांनी भर दिला. तो भर देताना त्यांनी तेथील प्रसिद्ध समीक्षक केनेथ टायनन हा प्रसिद्ध समीक्षक म्हणून कसा घडला व त्याची समीक्षकपद्धती कशी आहे हा उहापोह विस्तृतपणे केला. हे त्यांचे उद्घाटनाचे भाषण अभ्यासाच्या दृष्टीने फारच उपयुक्त आहे. परदेशात त्यांनी सादर केलेले 'हयवदन' नाटकाचे व त्यावर घेतलेल्या परिश्रमाचे व त्यातून त्यांना मिळालेल्या अनुभवाचे, अवलोकनाचे असे संवेदनशील विवेचनही केलेले आहे. पुढे त्यांनी तेथील समीक्षक, त्यांची भाषा, मांडण्याची शैली वगैरे प्रांजळपणे मत मांडले. त्यांच्या भाषणात पाश्चात्य नाट्यशिक्षणाचा – समीक्षकांचा पगडा दिसतो. त्यात गैर काही नाही. तसा त्यांचा अभ्यासही आहे; पण आपल्याकडील समीक्षक व त्यांचे समीक्षण यांचा नाममात्र उल्लेख केलेला आहे. शेवटी शेवटी त्या सांगतात ती नावे नटांची

व त्यांच्या कंपनीची. (तालीम मास्तर, केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर, गणपतराव बोडस). शेवटी त्या खत बोलून दाखवितात– ' कपन्या व कंपन्यांची बिऱ्हाडे नेस्तनाबूद झाली. आमच्या पिढीला ड्रामा ट्रूप व त्यातून निर्माण होणारा समीक्षक मिळाला नाही. तो कसा मिळवायचा याचा विचार व्हायला पाहिजे.'

## मार्मिक जाणकार

श्री. विजय तेंडूलकर–समेलनाचे प्रमुख पाहुणे यांनी श्रीमती विजया मेहता यानी माडलेले मुद्दे खोडून काढले. परदेशी समीक्षक आणि त्याची समीक्षणे दुरूनच बरी वाटतात. आपल्याकडील समीक्षेचा विचार व्हायला पाहिजे. मग ती प्राध्यापकी समीक्षा, वृत्तपत्रीय समीक्षा आणि हौशी समीक्षा असो याचा खरपूस समाचार घेतला. आपल्याकडील समीक्षा ही ठाशीव, स्वच्छ आणि ठसठशीत हवी असे ते म्हणाले. त्याबरोबरच त्यानी हेही मान्य केले की केनेथ टायननसारखा कमीत कमी शब्दात लिहिणारा समीक्षक हवा. आणि त्याच्या अनुषंगाने त्यानी म्हणणे मांडण्याचा प्रयत्न केला. प्रशिक्षणाने समीक्षक बदलत नाही तर ते जसे असतात–जसे लिहितात तसेच लिहोत राहणार, असे प्रतिपादन करून सप्तवार्षिक प्रशिक्षणाचाही मुद्दा जो विजयाबाईंनी माडला होता, तो खोडून काढला. क्रिएटिव्ह रायटिंग आणि क्रिएटिव्ह रायटर आपल्याकडे पाहू गेल्यास त्या अर्थाने व्याख्या नाही. नाटककार, दिग्दर्शक, नट, नेपथ्य, रंगभूषा, वेषभूषा, प्रकाश योजना याच्या जडणघडणीतून रगभूमीवर जे नाटक दिसते ती जडणघडण घडत असताना समीक्षक तेथे हवा, पण ते होत नाही ही खंत त्यानी प्रकट केली. त्यांना जे प्रामाणिकपणे वाटले ते त्यानी मोकळेपणाने सागितले. त्याच्या मुद्द्याचाही विचार होणे अगत्याचे आहे.

प्रा. सौ पुष्पा भावे याचे नाटचसमीक्षा (तत्र व मत्र) या निबंधाचे वाचन : या वक्त्या साक्षेपी परखड पण मुद्देसूद बोलणाऱ्या अशा आहेत. एकूण निबंधाचे स्वरूप पाहता किचकट फारसा नाही तरी बुद्धीला व विचाराना चालना देणारा वाटला. त्याच्या मागील सखोल अभ्यास व विचार दिसतो. त्यानी पहिल्यांदाच स्वच्छ सांगून टाकले की 'आलोचकांनी जरी नाटचसमीक्षा तंत्र–मंत्र असे शीर्षक या निबंधासाठी वापरलेले असले तरी त्यातील 'तंत्र–मंत्र' हा शब्दप्रयोग मी वगळणार आहे कारण कोणत्याही विषयापुढे तंत्र–मंत्र हे शब्द जोडले की त्या विषयाला एक स्वस्त सोपेपण येते. इतकेच नाही तर कलेच्या प्रातातून कारागिरांच्या प्रांतात गेल्याचा भास होतो. त्यानी मुख्यत: तीन विभाग केले– (अ) नाटचसंहिता–आधार असणारी समीक्षा (ब) प्रयोग समीक्षा (क) ऐतिहासिक संशोधनात्मक समीक्षा आणि या तीन विभागात पोट विभाग करून विषयाची मांडणी केली आहे. समीक्षकाच्या दृष्टीने सर्वंगामी, सर्वंकष प्रश्नाचा उहापोह करणारा असा हा निबंध आहे. कला व्यवहाराच्या संस्काराने समीक्षकाच्या मूल्य व्यवस्थेवर सस्कार होत असतो व चांगला समीक्षक कला व्यवहारावर संस्कार करीत असतो. चागला समीक्षक कसा घडेल याचे विवेचन त्यांनी चांगले केले समीक्षकाला असाव्या लागणाऱ्या गोष्टी म्हणजे तोलामोलाची व्यासपीठे नाटचप्रयोगाचा अनुभव आणि हा अनुभव किती प्रकारचा असावा लागतो, नाटककार दिग्दर्शक यानी प्रयोगरूपात माडलेला अनुभव इत्यादी समीक्षकाची पूर्वतयारी म्हणून कसे पहावे–अभ्यासाने कशी तयारी करावी इत्यादी विवेचन करून त्या शेवटी सागतात 'मराटी नाटचसमीक्षा क्षेत्रात आज मूल्यचर्चा व परिभाषा निर्मिती या दोन्हीची पूर्वतयारी झालेली नाही पण प्रयत्नवादाने व्हावी एवढीच अपेक्षा आहे.'

ज्ञानेश्वर नाडकर्णी : नाटचसमीक्षा देशी-विदेशी–मराठीमध्ये या ना त्या स्वरूपाची नाटचसमीक्षा ढोबळपणे मराठी नाट्काइतकीच दीर्घकाळ चालू आहे (सन १८५५ पासून पुढे) असे सागून विष्णू आप्पाजी कुलकर्णी, श्री. कृ. कोल्हटकर, न. चिं. केळकर, किर्लोस्कर, देवल, खाडिलकरापासून इब्सेन, गडकरी हे नाटककार व डॉ ग. य. चिटणीस डॉ. य. दि फडके, डॉ. रा. भा. पाटणकर, धो वि. देशपाडे, द. भि कुलकर्णी इत्यादी नाटचटीकाकाराच्या टीकेबद्दल विस्तृत विवेचन केले आहे. हे झालं देशी विदेशीमध्ये ए. सी. ब्रॅडले, एच. बी चार्लटन, वर्लमॅन, जॉर्ज बर्नार्ड शॉ, अगटे, टायनन वगैरे लहान थोर समीक्षक व त्याचे समीक्षण याचा उल्लेख करून 'इंग्रजी भाषा नाटचसमीक्षकात्मक वाङ्मयात समृद्ध आहे' असे सांगतात. पर्यायाने नाटचसमीक्षेचा इतिहास त्यानी सांगितला आहे.

डॉ. व. दि. कुलकर्णी : नाटच समीक्षण–एक संघटना : भरतमुनीच्या नाटचशास्त्रातील मुद्द्याचा विचार प्रथम मांडून 'नाटचसहिता रसीकवाचक ह्याच नाटकाचा खरा वाचक ठरतो. आपल्या कल्पनाशक्तीने आपल्या मनाच्या मचावर नाटचसहिता 'प्रयोगालकार' रूपात तो अनुभवीत असतो. हे रसिकवाचकच नाटकाचे 'अधिकारी' अभ्यासक होऊ शकतात' असे सांगतात. मग नाटच दिग्दर्शक व त्याची दृश्यश्राव्य रूपाने प्रतीती याचा पडताळा तो घेत असतो असे सागून 'नाटच समीक्षक हा वरच्या प्रतीचा साहित्य समीक्षक तर असावाच लागतो, पण त्याबरोबर तो रंगमंचीय कलारूपाचा आणि त्याच्या तात्रिक उपयोजनाचा मार्मिक जाणकारही असावा लागतो.' 'पण असा अनुभवी जाणकार नाटचसमीक्षक दुर्मिळ आहे' अशी खतही व्यक्त करतात.

प्रा. माधव मनोहर : नाटचसमीक्षा : एकविचारणा : या निबधात त्यानी नाटचसहिता, नाटचसमीक्षेची विविध रूपे, श्री ना. बनहट्टी, नि. पा. दाडेकर, खाडेकर, डॉ. रा. शं. वाळिंबे यानी वेळोवेळी जे या विषयासबधी (नाटचइतिहास) प्रबंध लिहिले आहेत, त्याचाही विचार व्हावा असे सागितले आहे. त्या इतिहास ग्रथात मराठी नाटकाच्या पूर्व पर्वातील नाटचसमीक्षेची समीक्षा होती. येथे समीक्षा याचा अर्थ 'शोध' म्हणून घ्यावा असे नमूद करतात. पुढे ते नाटचसमीक्षेचा इतिहास सागतात व पुढे त्या संबधातील उदाहरणे देऊन पटवितात. पुढे ते नाटचप्रयोगाच्या समीक्षेकडे वळतात. नाटचविद्यालये, त्यातील नाटचशिक्षक. हे नाटचशिक्षक कितीसे नाटचसमीक्षक म्हणून प्रतिष्ठा पावलेले आहेत याचाही विचार मांडतात शेवटी ते म्हणतात, कोणताही समीक्षक हा स्वत: काही निर्माता नसतो, तर तो निर्मित वस्तूचा सशोधक असतो .. तो शोध कलाकृतीच्या अतस्थ गुणधर्मांचा जो काय असतो तो प्रायश: अनभ्यस्त अशा सहज प्रेरणेने घेतलेला असतो. त्यासाठी तात्रिकज्ञानाची गरज नसते.' (मागे काही निबधकार तात्रिक-

ज्ञानाची समीक्षकाला गरज असते असे सांगून गेले. येथे हे माधवरावांचे मत आहे) त्याच्या पुढ्यात कलाकृती असते. या कलाकृतीतील अंतर्हित घटकांच्या संघटनेचे यशापयश तो काही एका अंतःप्रेरणेने अजमावण्याचा प्रयत्न करीत असतो.' पुढे समीक्षक 'सबजेक्टिव्ह आणि ऑबजेक्टिव्ह' या वस्तुविषयाचा तौल निक विचार करून तो लिहितो असे माधवरावांचे मत दिसते.

## कलावंतांचं आत्मपरीक्षण

श्री. भा. कृ. पारधी : नाट्यसमीक्षेचे वर्तमानस्वरूप : हा निबंध समेलनात वाचला गेला नव्हता तरी या पुस्तकात तो समाविष्ट केला आहे. ते लिहितात, आजची समीक्षा अभ्यासपूर्वक लिहिली जात नाही. पन्नास वर्षांपूर्वी जी लिहिली जात होती ती साहित्यिक स्वरूपाची होती.' आजच्या समीक्षेबाबत एखाद दुसरा अपवाद सोडला तर चोखंदळपणे लिहिले जात नाही अशी खत त्यांनी व्यक्त केली आहे. पुढे त्यानी माध्यमाच्या मर्यादा (वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके) परिस्थितीचा रेटा (समीक्षकाला ज्या परिस्थितीत लिहावे लागते) समीक्षकाचा आवाका, निरुत्साहजनक नाटके, समीक्षकाबद्दल गैरसमज, शास्त्रीयबळ (समीक्षकांजवळ असावा असा अभ्यास) इत्यादी विषय हाताळले आहेत. शेवटी ते म्हणतात ते महत्त्वाचे आहे. 'त्याच्या ठिकाणी तटस्थता असावी लागते. ही तटस्थताच त्याच्या समीक्षतेचे वास्तव घडविते तिच्यातच त्याच्या समीक्षेचे सामर्थ्य असते'

येथपर्यंत मुख्य मुख्य अशा निबंधावरील समीक्षणात्मक लेखन झाले. परिशिष्टातील चर्चा–परिसवाद–सारांश हा जो भाग आहे तो प्राय. ऐकण्याचा भाग आहे. त्यात झालेल्या निबंध वाचनावर व भाषणावर प्रत्युत्तरे काही तुलनात्मक चर्चा व ज्या वक्त्याना निबंधरूपाने सांगता आले नाही त्यानी विषयाला धरून थोडक्यात भाषणे केली. त्याचा सारांश परिशिष्टात आहे. ग. वा. बेहरे यांनी समीक्षण कसे नको, कसे हवे याचे विश्लेषण केले. लेखक न बनता उत्तम रसिक व्हावे असे त्याचे म्हणणे. वा. य. गाडगीळ यानी वृत्तपत्र धोरणाने व येणाऱ्या दबावाने वृत्तपत्रात खऱ्या अर्थाने समीक्षेकडे लक्ष दिले जात नाही. भि. शि. शिंदे यांनी दलित रंगभूमी व ती कशी वेगळी आहे, कशी उपेक्षित आहे आणि त्या दृष्टीने समीक्षक समीक्षणे लिहीत नाहीत असे म्हटले आहे. जब्बार पटेल म्हणतात, समीक्षक हा सुजाण प्रेक्षक आहे. रिपोर्टिंग करण्याच्याच दर्जाची नाटके पुढे येतात. त्याला समीक्षक काय करणार? आम्ही नाटकवाल्यानी–कलावतानी आत्मपरीक्षण केले पाहिजे. प्रभाकर पणशीकर आत्माराम सावंत, कमलाकर सोनटक्के, एस डी. वाघ, नाना पाटेकर, सुधा माडके यानीही आपल्या आपल्यापरी आपआपल्या व्यथा, खंत, सुधारणा, अनुभव सांगितलेले आहेत.

—वसंत फाटक

नाट्यसमीक्षा : काही दृष्टिकोन
संपादक : डॉ. वि. भा. देशपांडे
मेहता पब्लिशिंग हाऊस
पृष्ठे : १११
किंमत २२ रुपये

## आत्ममग्न–गर्भरेशीम

कवितेनं गर्भरेशमी असणं हे किती अनोखं आहे! तसा गर्भरेशमी हा शब्दच मुळी वेगळी वैशिष्ट्ये घेऊन येतो. रेखीवता, सुबकता, सुंदरता, दुर्मिळपणा, कोरीवकाम, फिरत्या रंगाची मौज, तरल स्पर्श, तलम पोत आणि कितीतरी! अशी सारी नवनवीन वैशिष्ट्ये इंदिरा संताची 'गर्भरेशीम' मधील कविता घेऊन येते. ह्या काव्यानुभूतीचा पोतही असाच, पुन्हा पुन्हा अनुभववासा वाटणारा–अलौकिक 'फील' तरल जाणवणारा. ही कविता मनाभोवती लपेटून घेताना वेगळ्या जाणीवाच्या समृद्ध जगात मन प्रवेश करते. आणि इंदिरा संताच्या कवितेला हे स्थान मराठी कवितेत नक्कीच आहे. तेवढा गहिरेपणा, खोली ह्या कवितेत आहे. विविध आणि विलक्षण असलेली ही कविता भावमधुर आहे. खरं तर नेहमीची समीक्षेची भाषाही इथे पार करून जावी लागते. (इथे आठवण होते ती पु. शि. रेगे यांच्या 'मनवा'तल्या एका विचाराची. ते म्हणतात–फुलाच्या अगदी गाभ्यात जाण्याचा प्रयत्न करता कामा नये. तिथं नुसती पाकळी असणार आणि ती तशी रहाणं यातच त्या फुलाचं सौभाग्य आहे)

ह्याप्रमाणे कवितेच्या आत्मरूपाला केलेला स्पर्श मनोस्पर्शच नव्हे काय? तो का शरीरी शब्दात पकडता येणार आहे? 'गर्भरेशीम' मधील इंदिराबाईंची कविता अशा अनेक स्पष्ट–अस्पष्ट, कळत–नकळत, कोमल–हळुवार धाग्यानी विणलेली आहे. आत्ममग्न संवेदनाक्षमतेतून साकारलेली ही कविता अनुभवताना ज्ञानदेवांच्या म्हणण्याप्रमाणेच रसिकाला भूमिका घ्यावी लागते. स्त्रीमनाभोवती गुरफटले जाणारे अनुभववस्त्र ज्या स्त्रीचे आहे ती स्त्री उद्दाम, बेफाट, क्रांतिकारक वगैरे नाही तर या स्त्रीच मन साधंभोळ आहे सासरमाहेरच्या अंतरात अंतरणारं आहे, आठवणीनी भावाकुल होणारं आहे, सुखद आठवणीनी मोहरून जाणारं आहे. डोंगरावरच्या गावात रमणारं आहे, तऱ्हेतऱ्हेच्या हौशी ह्या मनास आहेत. हे मन अंगणातल्या जुईच्या झाडाशी बोलणारं आहे. माहेरच्या आठवणींनी ह्या मनाची पावलं जड होतात. दळणकांडण करताना साजणाच्या आठवणीन हे मन हुरळून जाते. बालपणीची आठवण होताच बागडायला लागतं.

जवळजवळ १०९ कविताचा संग्रह सर्वांगानीच सखोल, व्यापक नि समृद्ध आहे. हे खास इंदिराबाईंच्या प्रतिभेचं अलौकिक देणं आहे. हे देण घेताना मनाला वेगळ्या भूमिका स्वीकाराव्या लागतात. गुलाबाच्या फुलाची पाकळी हिरवळीवर पडताना जेवढा हळुवार स्पर्श होत असेल तेवढी नाजुक हळुवार. ही कविता अनुभवताना मनालाही तेवढीच हळुवारता जपावी लागते. कुठे उगाचच नव्याचा हट्ट ही कविता धरत नाही. उलट जुन्याला नवा अर्थपूर्ण संदर्भ देते. म्हणूनच 'तुझ्या केतकी रंगात' ह्यात कविमन म्हणते–

> शब्द मंजूळ घडले
> जसे सायसाखरेचे
> वागणेही तृप्त संथ
> कसे धारोष्ण फेसाचे

ह्या कवितेतलं स्त्रीमन वहीपुस्तक शिकलेलं नाही, मन ते जगण्याचे संदर्भ वाचण्याइतकं साक्षर आहे. माहेरच्या अनेकविध

संदर्भांनी ते हेलकावून जाते. भावाची आठवण मऊ रेशमी घडीच्या बासनात मुळी होते. गळा बालपण दाटते तेव्हा माहेरची ओढ लागते. धारोष्णाच्या सुरमुरत्या गंधाने मनाची भ्रांत उडून जाते. माहेरच्या वाटेला कुणाचीच सर यायची नाही असे वाटू लागते. ही वाट किती भावणारी ! किती जपणारी ! किती कोमल ! किती हळवी !

माहेराची वाट
तिच्यावर अंथरलेली
निळी मलमल
अशी नाजूक की,
पिवळ्या चिमुकल्या
पिसोळीने जिच्यावरून
अलगद चालत जावे

हे मन दारातल्या गर्भरेशमी हिरव्यागार केळीच्या अंगावर गोजिरवाणे पोर बघितल्यावर जगण्याची तृप्ती नि परिपूर्ती अनुभवते. भाग्यवंता आई केळीच्या रूपात भेटते. 'चार चौकांचे माहेर' ओलांडून आल्यावर ह्या मनाची स्थिती 'लेकराला कल्पवृक्ष, सुखदुःखाला मांडव, अशा माहेराला आज, आज आसुसला जीव' अशी होते. 'पिंपळपानाला' ती आपले मनोगत सांगते. मनोगत सांगताना मन पालवीसम होतं. क्षणभर हे मन हळुवार बनतं.–

कोवळ्या उन्हामध्ये
लाल डहाळी द्यावी–घ्यावी
डोळा कोवळी येता प्रीत
त्याच पानात लपवावी

पण यातून निर्माण होतं, ते वेगळं दुःख

गडद संध्याकाळी
पानगळीत एकटी मी
आसू टिपूनिया जावे
आता पिवळ्या पाखरांनी

जाणीवा बदलतात. कधी ही जाणीव इतकी सूक्ष्म होते की, 'पाणी...पाणी' ह्या कवितेत तहानेने व्याकुळ झालेल्यांना जेव्हा पाण्याचा थेंब मिळत नाही तेव्हा डोळ्यातला थेंब सुकून जावा असे वाटते. संसाराचे 'ओझे' सावरणे अशक्य होते. आयुष्यातले सुखद क्षण धुक्यासारखं सारं काही व्यापून टाकतात. एक अपरिहार्यता जीवनाला स्वीकारावी लागते. कविमन अंगणात, घरादारात, वृक्षवेलीत, पाखरांच्या थव्यात सगळीकडे अनुभव घेते. या अनुभवाने झुलून जाते. लयीत वहायला लागते. मन चंदनाचे झाड होते. या वाटेवर शब्दांचे थवेच्या थवे उडून जातात. मन 'तटस्थ' बनते, 'जेव्हा भिंती स्तब्ध होतात' तेव्हा मन भिऊ भिऊ लागते. 'किनारा' दिसत नसला तरी तो असण्याचा–सापडण्याचा आत्मविश्वास व्यक्त होतो. स्वतःला सगळ्यातून सोडविले जाते. आयुष्याच्या पाटीवर खूप वळणे गिरविताना गिजमिट होऊन जाते. यातच मध्येच जाणीव होते स्वतःतल्या तृप्ततेची नि मुक्ततेची ! मात्र कधी–

फांद्यांचे व्यूह,
काटेरी रान
ओचा–पदर
अडकून राहिले

जरीधागे रेशीम फाडून तशीच सुसाट पुढे गेले अशाही स्थितीत मन मात्र गारव्याने भरून जाते. आयुष्यात अनेक उलट–सुलट घटना घडत असतात. भ्यायच्यावेळी धीट होणं, वृक्षासारखे तोलून रहायचे तेव्हा पाचोळा होणं हाही 'एक खेळ' डोळे भरून पहायचा, डोळे मिटून अनुभवायचा. एवढ्याशा आयुष्यात कितीतरी करायचे राहून गेलेले असते. काळजाला गुंतून राहिलेले आकाशाशी पोचलेले असते.

नाही माझ्या चूलीपाशी
ताका-मेळींचं अप्रूप
कशी ठेवीन बांधून,
त्याचे अवखळ रूप !

असं म्हणत म्हणत कवीमन कुब्जेची भूमिका घेते. एक तऱ्हेचे मनभावीपण तिच्यात येते.

ही संपूर्ण कविताच मुळी आत्ममग्न आहे. सगळा मनभार सावरता सावरता जवळ काय आले, काय सुटून गेले, काय मनात राहिले, काय पायात खुपले अशा अनेक वळणावरून जाताना अनेकानेक तरलतम 'तरंग' तिच्यात उमटतात. स्वतःच्या ठिकाणी सगळ्यातून जीवन जगताना अलिप्तता येते. सर्वात सामावलेली मनाची अनुभवशीलता सर्वातून वेगळी होते. प्रत्येक क्षणाची चव वेगळी असते. ह्या अनुभवात गाढ समाधान असते, असह्य व्यथा-वेदना असतात. भवितव्याचा कठीण तराणा असतो. कधी अकल्पनीय हळुवारता असते.

नभ ढाळते वरून
जाईजुईचा संभार
मनोमनीच्या क्षणाला,
चढे उन्हाचा माहेर
उन्हाच्या या उत्सवात,
कशी सावरून राहू ?
वज्रमणी हा मनीचा,
कसा सांभाळून ठेवू ?

असा प्रश्न जगताना पडतो. कसं जपावं हे सारं ? कशी जपावी ही मनस्विता? पंखमोडलेल्या पाखरास मात्र अधांतरी अवस्था झाल्यावर कसं जगावं ? मग वाटतं–

कुणी घातले वाळवण
राखणा कसा नाही
माझे पाखरू फसणारे
आता माझ्यापाशी नाही

'प्रवास' ही कविता जगण्याचा प्रवास सांगते. हे सर्व अनुभव, आत्ममग्नतेची ही अनेकविध रूपे पहाताना खचित हे गर्भरेशीम वस्त्र अनोखा स्पर्श करते. मननात आणि सृजनात सर्वत्र गर्भरेशमी तरलता येते. जे सहजही सांगता येणार नाही आणि प्रयत्न करूनही सांगता येणार नाही ते ही कविता अगदी सहजसहज सांगून जाते, अनाहूतपणे व्यक्त करते, हेच या कवितेचे आगळेपण होय.

–प्रतिमा केसकर


मराठीतील एक सच्चे
आत्मचरित्र

हंसा वाडकर

सांगत्ये ऐका

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

# ऐलमा पैलमा, शिक्षण देवा

## लीला पाटील

# मुलांचे बोलणे

आपल्या अवतीभोवती मुले नेहमीच असतात. कधी आपली, कधी नातेवाईकांची. केव्हा नातवंडे तर केव्हा शेजाऱ्यांची. शिक्षकाभोवती विद्यार्थी या नात्यानेही मुले असतात. या मुलांचे कधी आपण लाड करतो तर कधी त्यांच्यावर रागावतो. सारखी वटवट करतात म्हणून ओठांवर बोट ठेवायला सांगतो, चूप बस म्हणतो. 'तोंड चामडयाचे आहे म्हणून बरे आहे, लाकडाचे असते तर फुटले असते.' असेही वैतागाने म्हणतो. बहुसंख्यवेळा मुलांची बडबड म्हणून त्यांचे बोलणं दुर्लक्षतो; परंतु मुलांचं बोलणं हे पालकपणासाठी किंवा शिक्षकपणासाठी मोठे महत्त्वाचे Feed-back असते. आपसात मुले जेव्हा अकृत्रिमतेने संवाद करतात किंवा काही वेळा स्वगत बोलतात, तेव्हा ते ऐकण्यासारखे व विचार करण्यासारखे असते. मुलांच्या मूल्यविषयक संकल्पना ( Value Concepts ) कशा बनतात, एकाद्या बाबीचे त्यांचे तात्विक निराकरण कसे असते व तसे का असते, प्रौढ जगातला दुटप्पीपणा त्यांना कसा रुचत नसतो–अशा कितीतरी बाबी त्यांच्या संवादातून आपल्यापर्यंत पोचतात. आजच्या घाईगर्दीच्या आयुष्यात आपण फक्त जैविकदृष्टया (Biological) पालक बनतो. शिक्षणाच्या प्रस्फोटाच्या आजच्या घडीला आपण स्वतःच्या उपजीविकेखातर शिक्षक बनतो; पण पालक बनणे आणि असणे यात तफावत आहे. शिक्षक बनणे व शिक्षक असणे यात फरक आहे. मुलांच्या, विद्यार्थ्यांच्या नाडीची जाण आपल्याला कितपत असते ? मुलांच्या मनात घोंघावणारे प्रश्न आपल्याला कितपत माहीत असतात ? आपले पालकपण मुलांना जन्म दिल्याने सुरू होते. तिथे संपत नाही. आपले शिक्षकपण प्रशिक्षण काळात सुरू होते आणि ज्यांच्या बाबतीत ते ह्या काळात खरेच सुरू होते त्याचे शिक्षकपण येणाऱ्या प्रत्येक दिवसाबरोबर विप्लवित होते. नवे नवे धुमारे त्याला फुटतात. नवी माहिती, नवे आकलन, निरीक्षण, शोधन यातून पालकांना व शिक्षकांना नवी समज, नवे शहाणपण मिळत असते. मुलाचे सहज बोलणे हे पालकांना व शिक्षकांना अशी नवी समज व शहाणपण देणारे फार मोलाचं साधन आहे.

आपण प्रत्यक्षच मुलांच्या बोलण्यातील काही भाग ऐकू या आणि प्रत्येक भाग ऐकल्यावर त्यातून आपल्याला कोणती समज अथवा शहाणपण मिळते आहे हे शोधू या. तयार ?

### १. टी. व्ही.तलं गाणं

एका घरात संध्याकाळच्या वेळेस घरातली काही मंडळी गप्पा करत बसली होती. वेगवेगळया वयोगटातली मुलेही तिथेच काही बाही करीत होती. कोणी चित्रं पहात होते, कोणी अभ्यास करीत होते. चार-सहा वर्षाचा एक मुलगा व एक मुलगीही त्या तिथे होती. मोठया माणसांच्या गप्पा ऐन रंगात येताहेत व आता आपल्याकडे कुणाचं फारसं लक्ष नाही असे पाहुन तो मुलगा व मुलगी एकमेकांना मिठया मारून सतरंजीवर लोळू लागली, दोन–तीन मिनिटांतच प्रौढांपैकी कोणाचे तरी त्यांच्याकडे लक्ष गेले. 'हे काय करताय तुम्ही ? असं काय गाढवासारखं लोळताय ?' अशा वाक्यांचा चाबूक कडाडला. मुले शांतपणं म्हणाली, 'आम्ही लोळत नाही ये काय ? आम्ही टीव्हीतलं गाणं करतोय ?'

### २. बाई अस्सच करतात ?

माझ्या एका मैत्रिणीकडे एके दिवशी मी गेले होते. तिचे माझे बोलणे चालले होते. इतक्यात तिच्या धाकटया मुलीने एक जुनी साडी आणली आणि स्वतःला साडी नेसावयाला मला सांगितले. (मुलं भारी हुषार असतात. पाहुणे आले की आई रागवत नाही आणि नाइलाजाने का होईना पाहुणे आपले ऐकतात हे त्यांनी हेरलेले असते !) जमेल तशी ती फाटकी साडी मी तिला नेसवली. मुलगी बाजूला झाली, आमचं बोलणं सुरू झाले. बोलता बोलता माझ्या लक्षात आले



की दर दोन–चार मिनिटांनी मुलीचा पदर पडतो आहे आणि क्षण दोन क्षण तो तसाच ठेवून मग ती पदर उचलून अंगावर घेते आहे. मुलीचा पुन्हा एकदा पदर पडल्यावर मी म्हटलं, 'अगं, अगं–पदर पडला ना!' आपले आपरे नाक उडवत ती म्हणाली, पडला नाही काय मावशी! आमच्या बाई अस्संच करतात!

## ३. सॉली

एका घरात दोन भावंडे होती. मोठा मुलगा, लहान मुलगी. मुलगी काहीशी अपंग, अशक्त. बरेच वेळा ती अंथरूणावरच असायची. मुलगा चांगला दणकट. त्याला वाटायचे बहिणीबरोबर खेळावे. दोघांची आई एक दिवस कामात होती. मुलगा मुलीजवळ गेला. तिला हात लावला. तिला उचलायचा प्रयत्न केला आणि नंतर तिच्या चांगली जोरात थोबाडीत मारली. हे सारे पहाणाऱ्या आईला फार राग आला. तिने मुलाला मुलीच्या दोन्ही गालांना कुरवाळून 'सॉरी' म्हणायला लावले. घडलेला हा प्रसंग आई विसरून गेली. चार–पाच दिवसांनंतर मॉंटेसरीत जाण्यासाठी मुलगा आईबरोबर चालत होता. का कुणास ठाऊक फार हळू चालत होता. वेळेत पोचावयासाठी आईने मुलाला कडेवर घेतले. ती रस्ता पार करण्याच्या नादात. इतक्यात मुलाने आईच्या चांगली थोबाडीत मारली. एक क्षणभर काय झाले हे आईच्या लक्षातच आले नाही. त्यानंतर तिने मुलाकडे विस्मयाने पाहिलं, क्षणाचाही वेळ न दवडता आईचे दोन्ही गाल कुरवाळीत मुलगा म्हणाला 'सॉली, सॉली'

## 4. you look like a Mom in a Sari

आई वाचत बसली आहे. मुलं अभ्यास करीत आहेत. सर्वात लहान पोर येऊन आईच्या गळचाला मिठी मारते. त्यांच्यात झालेला संवादच ऐकू या, 'Mom, you look beautiful today, you look beautiful in a sari.' 'Don 't I look beautiful in dresses?' 'Not like that-you look beautiful in dresses. But you look like a Mom in a Sari.'

## ५. मी लग्नच करणार नाही

माझ्या एका मैत्रिणीच्या लहान मुलीला नटणे थटणे फार आवडायचे. लग्नसमारंभांना जाणे तिला फार प्रिय. नेहमी म्हणायची, 'माझे कधी लग्न करायचे. मी कधी खूप खूप दागिने घालायचे. माझे कधी फोटो काढायचे?' सान्याजणांना तिच्या बोलण्याची मोठी मौज वाटायची. एकदा ही मुलगी आईबरोबर एका घरी गेली. त्या घरातलं बाळ आजारी होते. अशक्त झाले होते. सारखे किरकिर करत होते. बाळाची आई ते सारे सांगत होती. त्या आईची समजूतही काढली जात होती. 'अग, चालायचेच लग्न झाल्यावर हे सगळे गृहितच धरायचे.' पुन्हा बऱ्याच दिवसानंतर मी मैत्रिणीच्या घरी गेले. थोड्या वेळाने कुठून तरी तिची मुलगी आली. माझ्या पदराशी चाळा करत एकादे गुपित सांगावे तसे ती म्हणाली, 'मावशी ऽऽ मी आता लग्न करणार नाही. लग्न केले ना ऽऽ म्हणजे मुले होतात. मुले ना ऽऽ आजारी पडतात ती ऽऽ ना रडतात. त्रास देतात.'

## ६. मग, आता तू कशाला आहेस?

एक आजी आणि नात यांच्यातील संवाद-
'आजी, तुझी आई कुठाय?'
'मी मोठी झाल्यावर ती गेली.'
'कुठं गेली?'
'अग गेली म्हणजे मेली'
'आजी आता बाबापण मोठे झाले आहेत. मग तू कशाला आहेस?'

## ७. आंघोळीचं पाणी मी पीत नाही

मामाच्या मांडीवर बसून सुधा देवपूजा पहात होती. देवपूजा संपल्यावर मामाने ताम्हणातले पाणी (तिर्थ) स्वतःच्या तोंडात तीन वेळा टाकले. सुधाच्याही तोंडापाशी पाण्याची पळी नेली. मामाचा हात झटकून सुधा म्हणाली, 'मला नकोय ते पाणी कोणाच्या आंघोळीचे पाणी प्यायचे नसते. ते घाण असते.'

## (८) Only Jesus is true

सेंट कोलबोत जाणाऱ्या एका मुलीच्या घरी केवळ गंमत म्हणून ख्रिसमसच्या वेळी ख्रिसमस ट्री आणून सुशोभन केले होते. केक आणली होती. शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागात शिकणारी ती मुलगी अगदी गंभीर स्वरात सांगते, 'This table, this tree is all sss false, only jesus is true sss. Only his paradise is true sss.





### ९. पाहुण्यांना आधी द्यायचे असते

घरी मंडळी आली आहेत. यजमानीणबाई चहा करायला म्हणून स्वयंपाकघरात आल्या. पाहुण्यांची दोन मुलेही त्यांच्या मागोमाग आली. ‘तुम्ही काय कलताय ?’ ‘मी ना ? चहा करते.’ ‘मग, तुम्ही आम्हाला आधी देनाल ना ? आई मनते लोकाना आधी द्यायचे असते ?’

### १०. इस्टेटीची वाटेकरीण

एका मुलाच्या पाठीवर पाचसहा वर्षांनी मुलगी झाली. सगळ्यांना आनंद झाला. येणारे–जाणारे पै–पाहुणे या घटनेबद्दल नाना प्रकारे बोलत असत. खेळता खेळता मुलाच्या ते सारे कानावर पडे. नवे बाळ पहायला गेल्यावर मी मुलाला म्हटले, ‘वा:, तुला छान, छान बहीण मिळाली.’ मुलगा तट्कन म्हणतो कसा, ‘छान कसली ? इस्टेटीत वाटेकरीण आली ना !’

### ११. दोन पप्पा

माझी एक माजी विद्यार्थिनी टी. व्ही. वरच्या एका सिरीजमध्ये काम करते. तिच्या घरी मी गेले तो दिवस सुटीचाच होता. तिचा नवरा कुठे दिसला नाही त्या संदर्भात तिच्या मुलाशी झालेला संवाद ऐका– ‘तुझे पप्पा कुठे गेले ?’ ‘कोणते पप्पा मावशी ?’ ‘अरे तुझे पप्पा. पप्पा का दोन असतात ?’ ‘होयच मुळी. मला दोन पप्पा आहेत. एक टीव्हीतले आणि एक घरातले !’

### (१२) Then, I will grow old

श्रीमंत, उच्चभ्रू कुटुंब. नातू आजारी आहे. आजी नातवाला म्हणते, ‘I shall give my life to see that you don't get hurt’ नातू म्हणतो, ‘No, Nanny I don't want your life. Then I will grow old.’

### १३. मी कुठे बसू ?

पहिलीत असणारी सई वडिलांशी बोलत होती, ‘भाऊ, गणिताच्या तासाला बाई सांगतात– मठ्ठ मुली पुढं येऊन बसा. मी कुठे बसत जाऊ हो ?’

### १४. माझे तिकिट माझ्याजवळ हवे

मुकुंद आईवडिलांबरोबर प्रवासाला निघाला. गाडीत बसल्यापासून तिकिटासाठी पाच वर्षाच्या मुकुंदाने वडिलांजवळ टुमणे लावले होते. शेवटी चिडून वडील म्हणाले, ‘तुला कशाला हवे आहे तिकिट तुझे ?’ मुकुंद म्हणाला, ‘म्हंजे काय ? माझे तिकिट माझ्या खिशात नको का ? तिकिटवाले काका मला तिकिट विचारतील ना ?’

ऐकलेत ना मुलाचं बोलणं ? शिक्षणशास्त्रावरचे कोणतेही पुस्तक शिकवू शकणार नाही एवढा पालक/शिक्षक प्रशिक्षणाचा उपयुक्त ठरणारा आशय मुलांच्या बोलण्यात भरलेला आहे. अनेक संकल्पना/विचार मुलांच्या मनात अंकुरलेल्या आपण पाहतो; पण त्या अंकुरीत कशा झाल्या हे पहात नाही. ते पाहण्यासाठी मुलांचे बोलणे ऐकणे व त्यावर विचार करणे हा आपला छंद बनला पाहिजे. □

---



शोभा भागवत

---

# चित्रांमधून मनापर्यंत

लहान मुलं काढतात ती चित्रं हा मला कायम नुसत्या कौतुकाचाच नव्हे तर प्रचंड कुतुहलाचा विषय वाटत आला आहे. शिकलेल्या घरांमधे वर्ष दीड वर्षाच्या मुलाच्या खेळण्यांमधे पाटी पेन्सिलही असते. पण मुलांच्या चित्रकलेला अशिक्षित घरामधेही काही अटकाव नसतो. रस्त्यावर कागद वेचणारी आठ दहा वर्षाची मुलं सुद्धा कचऱ्यात मिळालेले पाटीचे तुकडे आणि पेन्सिलीचे तुकडे जपून घरी आणतात आणि त्यावर चित्रं काढतात हे दृश्य मी स्वत: पाहिलेलं आहे.

पेन्सिल हातात धरली आणि हात हालवला की पाटीवर,कागदावर काहीतरी दिसू लागतं. हा मुलाचा चित्रं काढण्याचा पहिला अनुभव असतो. मोठ्या माणसांच्या मते या रेघोट्या, गिरगोट्या असतात. पण मूल मात्र त्यातून काही तरी सांगायला बघत असतं. नवीन नवीन बघायला लागलेलं मूल तोल जाऊन मागे आपटतं, नवीन चालायला लागलेलं मूल धपकन् पडतं तसंच हे चित्रकलेतलं अनुभव घेणं असतं. जे करायचंच ते नेमकं तसं जमत नसतं. मग एक छोटा ठिपका म्हणजे चिमणी असते. एखादा वेडावाकडा गोल म्हणजे हत्ती असतो. एखादी रेघ म्हणजे आई असते. हळूहळू मूल वेगवेगळे आकार काढायला लागतं.

आपल्याला काहीतरी नवीन यायला लागलंय हा आनंद इतका मोठा असतो की त्या उत्साहात मुलांना घराच्या भिंती, जमिनी, कपाटं, सगळीकडे चित्रं काढावीशी वाटतात. ह्या वयात घरात मोठा फळा हवाच. तरीही भिंती, जमिनी चित्रांच्या तडाख्यातून सुटतील याची शाश्वती मात्र नसते.

मुलांचं हे चित्रं काढण्याचं वय मला चांगलं आठवतं. बालवाडीत जाऊ लागण्याचा हा काळ होता आणि बालवाडीतल्या शिक्षणानी त्याला आणखी प्रोत्साहनही मिळालेलं होतं.

या वयात चित्रं काढणं किंवा काही निर्माण करणं यापेक्षा त्या माध्यमाशी खेळणं, त्याची ओळख करून घेणं, त्यातल्या आनंदाचा अनुभव घेणं चालू असतं.

मुलांच्या हळूहळू लक्षात यायला लागत की, पाटी पेन्सिलीच्या पलीकडे अनेक गोष्टींनी चित्रं काढता येतात. त्यात रंगीत खडू, ब्रश, रंग हे पालकमान्य रंग असतात पण कुंकवाची बाटली, नेल पॉलिश, लिपस्टिक, शाई, स्वैपाकघरातील हळद, रंगणारी टूथ पावडर असे सहज हाती लागणारे अनेक रंग मुलं मनमुराद वापरून पहातात.

मुलांच्या ह्या प्रयत्नातून जेव्हा दारापाठीमागच्या बाजूला एक लाल आणि एक फिका केशरी असे दोन लिपस्टिकचे दाट चौकोन उमटलेले पाहिले तेव्हा ह्या गोष्टी

आता कुलपात ठेवायला हव्यात हे मी शिकले.

रंग हे माध्यम फक्त चित्र काढण्यासाठीच मुलं वापरतात असं नाही. स्वत ला रंगवणं, कपडे रंगवणं हे निदान रंगवण्याचेच भाग झाले; पण रंगीत तेली खडूशी याच्या पलीकडे जाऊन मुलं खेळलेली आहेत.

एकदा बत्ता घेऊन मुलगा तेली खडूच जमिनीवर कूट करत बसला होता. अगदी मजेत होता. त्याच्यानतर दोनच वर्षांनी मुलीनी खेळातल्या किसणीवर तेली खडू किसून रगीत कीस स्वैपाकात वापरला होता. त्यानतर ती दोघ तीन चाकी सायकल चालवायला लागल्यावर खाली खडू ठेवायचे आणि त्याच्यावरून सायकलीचं चाक न्यायचं हा खेळ होता.

पालक म्हणून आपल्या मनात अशावेळी अनेक प्रश्न उभे राहतात. हे पैशाच नुकसान असतं. यातून मुलाना विध्वसाच वळण लागतंच का काय अशी शका येते. घराची खराबी तर होतेच हे प्रकार निस्तरण्यात, साफसफाईत वेळ जातो. शिवाय ह्या मुलाला काही वळण नाही असं घरातली मोठी माणसं इतर मंडळी म्हणताततच या सगळ्या गोंधळातून नेमकं वागायचं कस हा प्रश्न पडतो. पालकाची पारंपारिक भूमिका सांगत असते, 'मुलाच्या पाठीत एक धपाटा घाल आणि त्याला हे चुकीच आहे हे समजावून दे. त्याला ओरड' पण मुलाच्या चेहऱ्यावरचा आनद हे करू देत नाही अशा वेळी मुलाला ह्या अनुभवातून काय शिकायला मिळतय हे नीट पाहणं, समजून घेण्याचा प्रयत्न करणं आणि सौम्य शब्दात नुकसानीची जाणीव करून देणं हा मला राजमार्ग वाटतो.

दिवाळीत आणलेली रांगोळी आणि रंग याच्याशीसुद्धा मुल किती प्रकारे खेळत असतात ! आपल्या मते अनेकदा रग फुकट घालवत असतात पण या मनमुराद खेळण्यातून मुलं रंगाशी जवळीक करत असतात. ते रंग मिसळून बघत असतात, विस्कटून पहात असतात. या सगळ्यातून त्यांना जाऊ दिलं पाहिजे आणि त्याचबरोबर रांगोळी काढणं, रंग भरणं, रंगसगती साधणं, रंग एकसारखे पसरणं हेही मुलाना पहायला मिळाल पाहिजे.

लिहायला लागेपर्यंत मुल या चित्रातूनही संवाद साधायला पहात असतात. आपण कुणाला पत्र लिहिल की त्याखाली मुलांना एखाद फुल काढायचं असतं, रेघोट्या मारायच्या असतात किंवा एखादं मोठ चित्र काढायचं असत. पत्रातून मुल बॅट, बॉल, बाहुली, चद्र, सूर्य अस काही काही आपल्या आजीला भावडांना पाठवत असतात.

मुलांच्या त्या चित्रवलेत मला सर्वात आकर्षण कशाच असेल तर त्याच्या चित्राबद्दल ती जे बोलतात त्याच.

## कल्पना शक्तीचे नमुने

मुलानी एकदा कागदावर वरपासून खालपर्यंत चार सरळ रेघा मारल्या होत्या आणि डावीकडच्या दोन रेघामध्ये बऱ्याच आडव्या रेघा होत्या. हे काय आहे विचारल्यावर तो म्हणाला ही आभाळापर्यंत जाणारी शिडी आहे. या शिडीवरून वर जायच आणि ही इकडची घसरगुंडी आहे तिनी खाली यायच.

एकदा मुलीनी सहाव्या वर्षी काढलेलं चित्र आठवतं. एक आंबा काढला होता आणि त्याच्याशेजारी एक छोटा विदूषक टागलेला काढलेला होता झाडावर. या कागदाच्या पाठीमागे तसेच रगीत कपडे, टोपी असलेला मोठा विदूषक आणि त्याच्याच सारखे कपडे असलेला एक छोटा विदूषक काढला होता. हे काय काढलय विचारल्यावर ती सागत होती—ह्या आब्याला स्वप्न पडलं की आपल्या शेजारी हा विदूषक टागलाय् आणि हा मागच्या पानावरचा विदूषक हा जवळून पाहिलेला आहे (क्लोज अप) तो असा दिसतो आणि त्याच्याबरोबर त्याचं एक पिलू पण आहे ते झाडावर लाबून दिसत नाही आहे. त्या चित्रातली लाल-हिरवी-पिवळी-जांभळी रगसगती इतकी छान होती आणि क्लोजअपची कल्पनाही मजेशीर होती. शिवाय आब्यालाही स्वप्न पडू शकत ही कल्पना कशी काय मनात आली असेल अस वाटलं !

घरातल्या फळ्याचा चित्र काढायला मुलांनी खूप उपयोग केलाय्. त्यावर कधी एखाद बघून चित्र काढतात. कधी मनानी. शाळा शाळा खेळताना फळा वापरला जातोच. तेव्हा त्याच्या कोपऱ्यात दिनाक- हजेरी वगैरे लिहिलेल असत मधे एक पाहुणे जेवायला येणार होते तेव्हा ह्या फळ्यावर घर काढून ते रंगवून त्याच्या आजूबाजूला फुलं वगैरे काढून खाली सुस्वागतम् असं लिहिलं होतं आणि वर त्या पाहुण्यांचं नाव होतं.

ह्या गोडपणाबरोबरच भाडणं झाली की—'आभा निर्लज्ज, दुष्ट आणि कपटी आहे' असही मुलांनी लिहून फळ्याचा सर्वांगीण उपयोग केलेला आहे.

गेल्या गणपतीत गणपती पाहून आल्यावर मुलीनी एक चित्र काढलं. त्यात कागदाच्या खालच्या बाजूला मोदक, करंज्या, लाडू, फळं पेढे काढलीत ओळीनी. दोन्हीकडे दोन माणसं. सोन्याचा चौरंग अस लिहिलं आहे. त्यावर चादीची पालखी अस लिहिलं आहे. पालखीचा मोठ्ठा आकार काढलेला आहे आणि पालखीभर नाणी, पाच, दोन, दहाच्या नोटा काढलेल्या आहेत. यात गणपती कुठे दिसतच नाही म्हणजे तो काढलेलाच नाही. ही प्रसादानी आणि पैशानी भरून टाकलेली पालखी म्हणजे गणेशोत्सवावरची अबोल टीकाच वाटली मला.

फुलं आवडणारी मुलगी म्हणून एक चित्र काढलय्. त्यात त्या मुलीच्या डोक्यावर, खाद्यावर, हातावर, पायावर फुलंच फुलं ठेवलीत. तिचा चेहराही फुलाच्या आकाराचा आहे. फ्रॉकही फुलाचा आहे. बूटही फुलाचे आहेत.

मुल आपल्याला दिसलेलं, जाणवलेलं, आवडणारं, हवं असलेलं किंवा गंमत वाटणारं किती किती या चित्रामधून व्यक्त करत असतात !

वास्तवातून काही गोष्टी वगळलेल्या मुलाना आवडत नाहीत. घर काढलं की पूर्वी त्याचं नुसत चौकोनी बद दार असायच पण मग त्याच्या कड्या काढाव्यात असं वाटू लागलं. मग उघडलेली तिरपी दोन दारं आली. मग कायय घराच्या एका कोपऱ्यात सडास, बाथरूम येऊ लागली. बाथरूममधे बादली, अघोळीचं भांड आलं. आता घर काढल तर सडास बाथरूम नाही असं चालत नाही. नाहीतरी तो अविभाज्य भाग असतोच घराचा.

कित्येकदा देवळात शेंदूर लावलेले दगड त्यावर बसवलेले दोन डोळे असतात देव म्हणून ते खरच कधी कधी खप उग्र, भयानक दिसतात. तशी एक देवी मुलांनी काढलीय. ती पाहून खरच भीती वाटते.

त्याचबरोबर ससा, कासव, हत्ती, लहान मुलगा अशी काही चित्रं इतकी गोड काढलीत की ती पाहून प्रसन्नच वाटतं. हसूपण येतं.

याबरोबर एक चमत्कारिक उंच माणूस काढलाय्. त्याचं शरीरही माणसासारखं नाही. झुरळासारखं आहे आणि त्याच्या शेजारी 'माणसाच्या स्वप्नात येणारं भूत' असं लिहिलं आहे.

मुलांचे अनुभव बदलतात तशी त्यांची चित्रंपण बदलतात. क्रिकेट आवडायला लागलं, कळायला लागलं असं झाल्यावर मुलांनी लॉइड बाद झाल्याचं एक चित्र गावसकर, कपिलदेव वगैरे नावांसकट काढलं होतं. तेव्हा कुठल्या पोझिशनला कोण होता हेही त्यांनी बहुधा अचूक काढलं असावं लक्षात ठेवून.

रंगीत रंगीत फुलपाखरांची चित्रं काढायची आणि ती कापून भिंतीवर लावायची हा उद्योगही मध्ये काही दिवस होता.

एकदा रंगपंचमी वेगळ्या प्रकारे कशी साजरी करायची याबद्दल बोलणं झालं होतं. तेव्हा अशी बरीच रंगीत चित्रं, रंगीत पताका मुलींनी आपल्या खोलीत लावल्या होत्या आणि त्याच्यामध्ये मुलांनी 'कामाशिवाय जास्त वेळ बसू नये' ही उसाच्या गुऱ्हाळातली पाटी लिहून लावली होती तिला चिडवण्यासाठी.

मुलांच्या चित्रांच्या स्पर्धा होतात, प्रदर्शनं होतात, शाळांमधून चित्रकला शिकवली जाते; पण त्यात मुलं त्यांच्या मनातलं असं काही अगम्य चित्रातून व्यक्त करू शकतात ते समजून घ्यायचा प्रयत्न दिसत नाही.

एखादा विषय देऊन चित्र काढणं वेगळं आणि स्वतःच्या मनातलं काही व्यक्त करू पाहणं वेगळं. एकात निरीक्षण आहे. दुसऱ्यात खरी निर्मिती आहे. अर्थात निरीक्षण कागदावर उमटवणं हीपण निर्मिती आहेच.

इथे ह्या अनुभवांना कमी-जास्त ठरवायचा आपण प्रयत्न करत नाही आहोत. चित्रातून मुलांच्या मनापर्यंत आपल्याला पोहोचता येतं. मुलाच्या बदलत्या विचारांचा मागोवा घेता येतो. त्याचा विचार आपण बालचित्रकलेत करत नाही असं मला वाटतं. महत्त्व शेवटी चित्राला, तंत्राला दिलं जातं. त्यामागच्या विचाराला, भावनांना नाही.

शाळेतही ठोकळेबाजपणे चित्रकला शिकवली जाते. फळ्यावर काढलेलं तसंच्या तसं कागदावर काढणं ही कसोटी असते. ही चित्रकला खऱ्या निर्मितीला कितपत मदत करते, पहायला हवं.

मुलं मोठी होतात तशी त्यांची माध्यमं बदलतात. रंगीत कागद, मखमल, जलरंग, तैलरंग, माती, धातू ती वापरू बघतात. चित्रं करतात पण लहानपणी या चित्रातून आपण इतर कुणालाही सांगत नव्हतो असं काही मनातलं व्यक्त करत होतो. ही आठवण किती मुलांना राहते?

प्रत्येक मुलाच्या चित्रांचा तारीखवार संग्रह पालकांनी केला तर कदाचित मुलांच्या मानसिक जडणघडणीचाही मार्ग दिसू शकेल.

कला माणसाला आनंद देते. स्वतःचा शोध घ्यायला प्रवृत्त करते. त्याला मोठा बनवते. सखोल बनवते. चित्रकला तुमच्या आमच्या सर्वांच्या हाती लहानपणी अशी खेळत असते. काही व्यक्त करू पहात असते. पण आपण ती हळूहळू हरवून टाकतो. शाळेत शिकवले जाणारे भोपळे, कुंड्या, बादल्या, बाटल्या, द्राक्षांचे घड, वस्तुचित्रं या हरवण्याला मदत करतात का? रंगांची जाणही अशीच कुठेतरी मध्येच थांबते.

कुणी चित्रकार, चित्रकलेतली तज्ज्ञ मंडळी यांनी पालकांना याबाबत काही सांगायला हवं. तंत्राला महत्त्व देण्यापेक्षा आतल्या गाभ्याला पोहोचायचं कसं ते सांगायला हवं. □

## रंगभूमी

# बालनाट्यांचा हंगाम : काही अपेक्षा

वि. भा. देशपांडे

शाळांच्या परीक्षा संपल्या की, प्रवास आदी ठिकाणी जशी वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढत राहते, तशीच रंगभूमीच्या क्षेत्रात बालनाट्यांची संख्या वाढलेली दिसते. दिवाळी आणि उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये बालनाट्यांचा हंगाम जोरदार असतो. जे येईल ते नाटक अधाशीपणाने पाहात राहणे, पाहुणेमंडळी आली असली, तर त्यातल्या बालमंडळींना नाटकांना पाठवणे हे नित्याचे असते.

या हंगामात काही ठराविक मंडळी बालनाट्याचे प्रयोग व्यावसायिक पद्धतीने करताना दिसतात. विशेषतः पुणे आणि मुंबईसारख्या शहरात हे प्रमाण जाणवण्याइतके असते. व्यावसायिक नाटकांप्रमाणेच ह्या नाटकांच्या जाहिरातीही जोरदार असतात. अधिक म्हणजे त्या जाहिरातींमधून काही प्रलोभनेही असतात. चॉकलेट, गोळ्या, आईस्क्रीमसारखे पदार्थ मिळतील असेही छापलेले असते. प्रलोभनं असो किंवा नसो बालचमूंची गर्दी होतच असते!

अलीकडच्या काळात जो बालनाट्ये होतात त्यामध्ये काही नाटकांचे विषय काही प्रमाणात सामाजिक, काही विज्ञानविषयक असे आहेत हे जाणवते. पण हे प्रमाण फारच थोडे आहे. अजूनही राजा-राणी-परी यांच्या भोवती फिरणारे नाटक मोठ्या प्रमाणात आहेच. मागणी तसा पुरवठा हे तत्त्व डोळ्यासमोर ठेवून, मुलांना अमूकच आवडते असे गृहीत धरून तेच तेच नाटक थोड्याफार बदलाने दिले जाते आहे असे वाटते! इतक्या मोठ्या प्रमाणात जर बालप्रेक्षकांचा प्रतिसाद मिळत आहे तर नवनवीन विषय, सादरीकरणाच्या पद्धती यामध्ये वेगळेपण का येत

नाही असा सारखा प्रश्न पडतो. काही चार-दोन अपवाद वगळता असे जाणिवेचे नेमके प्रयत्न होताना आढळत नाहीत, त्यामुळे त्यातले साचलेपण त्रासाचे वाटते !

हे असे का होत असावे याचा शोध घेऊ लागलो तर ध्यानात येते की, बालनाट्य, बालरंगभूमी या संकल्पनेचा विचार अथवा अभ्यास, जाणतेपणाने होत नाही. त्यामुळे बालरंगभूमी ही मराठी रंगभूमीचा अविभाज्य, अपरिहार्य भाग बनून 'चळवळ' होताना आढळत नाही. वीस पंचवीस वर्षांपूर्वी बालरंगभूमीची हालचाल आरंभित झाली. त्यावेळी साहित्य आणि रंगभूमी या दोन्ही क्षेत्रातील मातब्बर मंडळी कार्य करण्यास उत्सुक होती. त्यामध्ये पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, सई परांजपे, गोपीनाथ तळवलकर, रत्नाकर मतकरी, सरिता पत्की, सुलभा देशपांडे, सुधा करमरकर, श्रीधर राजगुरू इत्यादी लोक होते. नंतरच्या काळामध्ये लीलावती–भा. रा. भागवत, जयंत तारे, वासुदेव पाळंदे, तेलिचरी, वंदना विटणकर, नरेंद्र बल्लाळ, रश्मी–श्रीराम बढे, दत्ता टोळ, रामनाथ थरवळ, कांचन सोनटक्के अशी आणखी नावे सांगता येतील. पण यामध्ये प्राधान्याने जाणवते ते असे की, नव्या साहित्यिकांपैकी ज्यांना विशेष नाव आहे अशी मंडळी आवर्जून बालांसाठी नाटक लिहिताना अपवादात्मकच दिसतात. साहित्य आणि रंगभूमी यांचा परस्पर मेळ साधण्याची कला ज्यांना अवगत आहे अशा मंडळींनी या लेखनात रस घेणे महत्त्वाचे आहे. कारण त्यावर एकूणच बालनाटचांची गुणवत्ता अवलंबून असते ! बंगालमध्ये रंगभूमीच्या अभ्यासासाठी दोन वेळा गेलो असताना तिथे बालरंगभूमीसंबंधात जेव्हा चौकशी केली तेव्हा अनेकांनी सांगितले की, आमच्याकडचे प्रथितयश साहित्यिक, कलाकार हे बालरंगभूमीसाठी आवर्जून लेखन-प्रयोग करतात. यामध्ये सर्वात महत्त्वाचे नाव घेतले गेले ते म्हणजे सत्यजित रे यांचे ! हे नाव चित्रपटाच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर मान्यता पावलेले आहे. ते चित्रपटनिर्मितीत सदासर्वदा मग्न असूनही वेळात वेळ काढून लहान मुलांसाठी मासिके प्रसिद्ध करतात. अन्य स्वरूपाचे लेखनही करतात. विशिष्ट काळ नाही तर वर्षानुवर्षे करतात हे महत्त्वाचे !

हे सारे आग्रहाने सांगायचे प्रयोजन असे की, सध्या बालरंगभूमीवर प्रयोग उदंड संख्येने घडत आहेत, पण संख्यात्मक वाढीबरोबर जी विविधता, गुणवत्ता अपेक्षित असते तिचा अभाव जाणवतो. ती गुणवत्ता लेखन आणि सादरीकरण अशा दोन्ही स्तरांवर अपेक्षित आहे. लहान मुलांचे वय कल्पनेत रमण्याचे, स्वप्नात गुंगण्याचे जरूर असते. ते त्यांचे विश्व नाटकांतून यावेच. पण या कल्पनाविश्वाच्या बरोबरीनेच वास्तव जीवनातील विशेषतः विज्ञानजगातील अनेक गोष्टींचे, अनुभवांचे दर्शनही त्यामध्ये असावे. विषयानुरूप मांडणीचे, सादरीकरणाचे रूपही पालटेल, ते निराळे सांगण्याची गरज नाही. पण हे करताना मुलांच्या वयोगटाचा विचार फार क्वचितच केला जातो असे दिसते. वयाच्या सहा–सात पर्यंतची मनोरंजनाची गरज ही आठ ते तेरापर्यंत वेगळी होते. पुढे तेरा ते अठरा–एकोणीसपर्यंत अनुभवस्तर वेगवेगळ्या संदर्भात बदलत जातात. जगण्याचे संदर्भ बदलतात. हे सारे गृहीत धरून लेखन व्हायला हवे. सरसकट सर्वांना एकच नाटक दाखवण्यात मतलब काय ? बाल, कुमार, किशोर, तरुण–युवा असे गट पाडून लेखन–प्रयोग अपेक्षित आहे.

यामध्ये आणखी एक महत्त्वाचा प्रश्न गुंतलेला आहे. तो म्हणजे नाटचाभिरुचीचा. हीच बालमंडळी पुढे प्रौढ प्रेक्षक म्हणून येणार असतात. त्यांची अभिरुची विशिष्ट वेळेला जाणतेपणाने घडवायला हवी. हे घडण्याचे–घडवण्याचे वय असते. अशा घडत्या वयात रंगभूमीविषयक किंवा अभिरुचीविषयक गोष्टींचे किमान भान या मंडळींना आले तर बालरंगभूमीचा तर फायदा होईलच; पण प्रौढ रंगभूमीलाही पूरक असा भाग होईल. हे जाणतेपणाने करणे, तशी नेमकी दृष्टी ठेवून कार्यक्रम आखणे म्हणजे चळवळीचे रूप येण्यासाठी सिद्ध असणे असे होईल !

असे प्रयत्न कोणीच करीत नाहीत असे म्हणणे योग्य होणार नाही. सुधा करमरकर किंवा 'आविष्कार'सारखी संस्था जशी मुंबईत बालरंगभूमीचे प्रशिक्षण जाणतेपणाने करते आहे, तसेच पुण्यापुरते बोलायचे तर 'जागर'च्या वतीने वासुदेव पाळंदे करीत असलेले प्रयत्न, बढे पति–पत्नी युवा कलाकारांसाठी करीत असलेले प्रयत्न, लीलाताई भागवत, दत्ता टोळ, श्रीधर राजगुरू इत्यादींचे प्रयत्न नुसते नोंद होण्याजोगे नाहीत तर लक्षवेधी आहेत. पण या सर्वांमध्ये एकसूत्रीकरण नाही. त्यांच्या कार्यक्रमात, प्रयोगात परस्परांशी संलग्न असे नाते नाही. ते प्रस्थापित व्हायला पाहिजे. त्याशिवाय 'बालरंगभूमी' ही संकल्पना पुन्हा एकदा बाळसे धरू शकणार नाही. एकांडे प्रयत्न तेवढ्यापुरतेच निर्माण होतात आणि जिरून जातात. तसे होऊ नये ! ◻


एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून बालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला ?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

लेक
वालेसा
डॉ. श्रीकांत मुंदरगी
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.


काही दिवस
श्यामचे
काही राधाचे
फिरोझ रानडे
पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

चित्रपट

# लोरी– सबकुछ शबाना !

**स्त्री**ला असलेली मातृत्वाची आस ही नैसर्गिक असते. मूल होणं आणि वाढवणं ही स्त्रीच्या जीवनातील स्थित्यंतराची एक महत्त्वाची पायरी असते. प्रत्येक स्त्रीचं आयुष्य हे मातृत्वाच्या एकमेव इच्छेच्या उंबरठ्याशी एकवटलेलं असतं, वगैरे निरनिराळ्या कल्पना घेऊन मातृत्वाचे निरनिराळे आविष्कार सतत साकार होत राह्यले आहेत. स्त्रीची मातृत्वाची नैसर्गिक आस हा धागा घेऊन कल्पनेचे इमले बांधत मातृत्व ही गोष्ट इतकी टोकाला नेऊन पोहोचवली आहे की बस ! पण अलीकडच्या बदलत्या परिस्थितीत मात्र मातृत्वविषयक कल्पनांना एक वेगळं वळण मिळतं आहे. लग्नानंतर मूल हवंच, असा नियम करू पाहणाऱ्या समाजाविरुद्ध विरोधाचा एक सूर उमटताना दिसतो आहे. मुलाशिवाय बाईचं जीवन अपूर्ण वगैरे कल्पना मोडीत काढल्या जात आहेत. मातृत्वाचे गोडवे हिरीरीनं गाणाऱ्या चित्रपटवाल्यांकडे पुढच्या दृष्टीनं हा एक महत्त्वाचा दृष्टीकोन होऊ शकतो. कारण मातृत्वाची महती वर्णन करणारे अनेक चित्रपट आतापर्यंत आले आणि गेले. या चित्रपटांनी मातृत्वाच्या महतीचा चांगला सणसणीत डोस प्रेक्षकवर्गाला पाजला आहे. अशा परिस्थितीत मातृत्वविषयक ज्या वेगळ्या कल्पना बदलत्या स्त्रीच्या मनात रुजू होऊ पाहात आहेत, त्या कल्पना चित्रित करण्याचा प्रयत्न करायला चित्रपटवाल्यांना काहीच हरकत नाही. कारण या निर्णयामागची तिची मनोभूमिका काय, घेतलेला निर्णय पेलताना असणारी मानसिक अवस्था, या निर्णयातली गुंतागुंत वगैरे बाजू प्रेक्षकासमोर ठेवणं हे एक आव्हान ठरू शकतं पण परंपरागत चौकटीच्या बाहेर डोकावण्याचं नाकारणारे चित्रपटवाले अजूनही मातृत्वविषयक परंपरागत कल्पनांना घट्ट चिकटून आहेत. स्त्रीची मातृत्वाची आस हा धागाच इतका चिवट आहे की, भूतकाळापासून अगदी परवा परवाच्या 'भावना' पर्यंत मातृत्वाचे तोंड भरभरून गोडवे गाण्याचा मोह चित्रपटवाल्यांना आवरता आलेला नाहीय. यात मुलाला नीट वाढवता यावं म्हणून तनामनाची किंमत मोजणाऱ्या स्त्रीचं वास्तवाच्या जवळ जाणारं रूप भेटलं, तसं मृत्यूनंतरही मुलाला भेटायला येणारी, त्याच्यासाठी अंगाई गीतं गाणाऱ्या स्त्रीचं अवास्तववादी चित्रणही आढळलं. आई होण्याच्या दुर्दम्य आशेपायी जेव्हा मानवतसारखं प्रकरण घडतं, तेव्हा अंगावर सरसरून काटा उभा राहतो. मातृत्वाचा अधिकार सहजासहजी प्राप्त होऊ शकत नसेल तो अधिकार प्राप्त करून घेण्यासाठी एखादी बाई किती खालच्या पातळीवर येऊ शकते, यातलं भीषण सत्यही अनुभवावयास मिळतं.



सागर सरहद्दींचा 'लोरी' हा चित्रपटही मातृत्व या स्त्रीच्या नैसर्गिक इच्छेभोवती केन्द्रित झाला आहे. गीता मल्होत्रा ही एका शाळेतली शिक्षिका. तिला मुलांची खूप हौस आणि ही हौस भागवण्यासाठीच ही शाळेतली नोकरी. अशा गीताला स्वतःचं मूल असावं असं वाटत असलं तर नवल नाही. पण पहिल्यांदा दिवस असतानाच तिला झालेल्या अपघातात मूल तर दगावतचं पण तिची 'आई' होण्याची शक्यताही संपते. मुलासाठी तडफडणारी गीता हे दुःख पचवू शकत नाही. या दुःखातून गीताला सावरण्याचा एकच उपाय म्हणजे मूल दत्तक घेणं. पण तिथं गीताला वाईट अनुभव येतात आणि दत्तक घेण्याची कल्पना बारगळते. अशातच एक दिवस बसमधून जात असताना बसमध्ये बारा मुलांसह चढलेल्या जोडप्याचा छोटा मुलगा बसमध्येच राहून जातो. हा मुलगा गीता घरी घेऊन येते आणि स्वतःचा मुलगा म्हणून वाढवायचं ठरवते. गीतानं घरी आणलेला हा मुलगा कुणाचा तरी मुलगा असतो. कुणाचा तरी भाऊ असतो. साहजिकच मुलाला शोधण्याचा प्रयत्न सुरू होतो; पण गीता या मुलाला सोडायला तयार नसते. ती मुलाला घेऊन पळून जाते. त्यामुळं तिच्याविरुद्धची बाजू पक्की होते आणि तिच्यावरचा आरोप बळकट होतो. शेवटी गीताला पकडण्यात येतं खटला भरण्यात येतो. पण शेवटी जो काय गुन्हा गीताच्या हातून घडला तो केवळ मातृत्वाच्या असीम ओढीमुळंच या युक्तीवादाच्या आधारावर गीताची बाइज्जत सुटका केली जाते.

चित्रपट पाहिल्यानंतर काही प्रश्न मनात उभे राहतात– गीता ही शिकली सवरलेली आहे, तेव्हा अशाप्रकारे मूल नेणं–हे मूल पळवण्यासारखंच आहे आणि मूल पळवणं हा गुन्हा आहे, हे तिला माहीत नसावं का ? आई होण्याच्या एकमेव कल्पनेचं भूत तिच्या डोक्यात थैमान घालत असताना ती स्वतःची सद्सद्विवेकबुद्धी, सारासार विचारशक्ती घालवून बसलेली असेल आणि त्या अवस्थेत तिच्या हातून हे कृत्य घडलं असेल, असं समजावं तर हे कृत्य घडवण्याइतपत बायकोची मानसिक अवस्था ढासळलेली आहे, हे गीताच्या नवऱ्याच्या लक्षात आलेलं नसावं ? त्यामुळं गीताला सावरण्यासाठी त्यानं प्रयत्न

# राजहंस प्रकाशन सूची

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत रुपये |
|---|---|---|---|
| १ | टॉलस्टॉय–एक माणूस (आवृत्ती संपली) | सुमती देवस्थळे | ५५/ |
| २ | योद्धा शेतकरी | विजय परुळकर | ३६/ |
| ३ | आंबेडकर भारत | बाबुराव बागुल | २०/ |
| ४ | लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी | पु. ल. इनामदार | २०/ |
| ५ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा (आ. सं.) | अशोक परळीकर | १२/ |
| ६ | सांगत्ये ऐका | हंसा वाडकर | १४/ |
| ७ | शतपावली | रवींद्र पिंगे | १६/ |
| ८ | डॉ. आयडा स्कडर | सौ. वीणा गवाणकर | २२/ |
| ९ | एक होता कार्व्हर | सौ. वीणा गवाणकर | ३०/ |
| १० | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | २५/ |
| ११ | बलसागर | श्री. ग. माजगावकर | ३०/ |
| १२ | निर्माणपर्व | श्री. ग. माजगावकर | ४०/ |
| १३ | टच् | अशोक प्रभाकर डांगे | १०/ |
| १४ | सबला | माधव शिरवळकर | १२/ |
| १५ | रूपवती भार्या शत्रु: ! | अॅड. माधव कानिटकर | २५/ |
| १६ | R डॉक्युमेंट | अशोक जैन | १०/ |
| १७ | काही दिवस श्यामचे–काही राधाचे | फिरोझ रानडे | २५/ |
| १८ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | १४०/ |
| १९ | मला निसटलंच पाहिजे ! | श्रीकांत लागू | २०/ |
| २० | पूर्णिया | अनिल अवचट | १२/ |
| २१ | लेक वालेसा | डॉ. श्रीकांत मुंदरगी | २२/ |
| २२ | आपली मुलं | शोभा भागवत | २०/ |
| २३ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | २२/ |
| २४ | विज्ञानेश्वरी | डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर | २०/ |
| २५ | तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय | डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर | २०/ |
| २६ | तीर्थरूप आक्का | शारदाबाई आपटे | ५/ |
| २७ | गुजरातेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | १५/ |
| २८ | अब्राहम लिंकन–फाळणी टाळणारा महापुरुष | वि. ग. कानिटकर | १५०/ |
| २९ | निलगिरीची शेती | विनायक पाटील | १५/ |
| ३० | सहा साहसे | दा. सी. देसाई | १६/ |
| ३१ | मानसकन्या | प्रा. मनोहर राईलकर | २०/ |
| ३२ | पूर्णत्वाचे प्रवासी | प्रा. शरद कुलकर्णी | ५०/ |
| ३३ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | १२/ |
| ३४ | कुंपण आणि आकाश | मंगला गोडबोले | २०/ |
| ३५ | चार्ल्स डार्विन<br>व्यक्ती, कृती आणि उत्क्रांती | भा. रा. बापट | ३२/ |

**। राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ । पुणे ३० ।**

करणं आवश्यक नव्हत का? गीताचा नवरा आणि त्याचा वकीलमित्र यांनी हा गुन्हा केला आहे, हे गीताला पटवून द्यायच का तिच्या वेडापुढं मान तुकवायची आणि परिस्थिती हाताबाहेर जाईपर्यंत वाट बघायची? वगैरे. आता या आणि तत्सम प्रश्नांची उत्तर शोधायची म्हटली तर 'लोरी' अपयशी ठरेल. कारण यात गीताला सावरण्यासाठी किंवा तिच्या गुन्ह्याची जाणीव करून देण्याचे प्रयत्न आहेत; पण ते फारच वरवरचे. त्या त्या मुद्द्यांना फक्त पुसटता स्पर्श करून जाणारे. कारण पुढचा भाग समोर असल्यानं या प्रश्नांच्या फारसं खोलात जाणं शक्य नसल्यानं आटोपलेले. त्यामुळंच असे प्रयत्न चित्रपटात असूनही प्रश्नाची समाधानकारक उत्तरं मात्र मिळू शकत नाहीत. चित्रपटाच्या विषयाची माडणी होत रहाते ती फक्त भावनिक पातळीवरच. मुळातच हा विषय इतका संवेदनाक्षम आहे आणि त्याच निरनिराळया माध्यमातून इतकं हॅमरिंग झालं आहे की, त्या विषयीच्या सवेदना बोथट न होता, अधिकच तीव्र झाल्या आहेत. त्यामुळ मूळचेच प्रसंग आणखी थोडे भडकपणे दाखवले की, प्रेक्षकवर्गाच्या काळजाला हात घालण काहीच कठीण नाही. निदान सागर-सरहद्दी विजय तलवारसारख्या द्वयीला तर नाहीच नाही. त्यामुळंच मातृत्वाचीच हौस असलेल्या गीताची मातृत्वाची सधी गमावून बसणं, हीच टोचती जाणीव घेऊन जगण, मूल सापडल्यावर आनंदानं वेडं व्हायचं बाकी रहाण आणि मोठ्या सायासानं मिळालेलं मूल हातातून निसटू नये म्हणून जीवाचा आटापिटा करणं किंवा मातृत्वाचा संघर्ष अधिक तीव्रपणे उभा रहावा म्हणून 'कुत्रा—माजरसुद्धा आपली पिल्लं देत नाहीत' असं ठणकावून सागत गरीबीतही स्वतःचं पोर दत्तक म्हणून द्यायचं नाकारणारी स्त्री किंवा बारा मुल असूनही एक मुलगा हरवल्याबद्दल हाय खाणारी स्त्री अशी पात्रं उभी करण यात प्रेक्षकवर्ग भावनिकदृष्टया इतका गुतून जातो की, या सर्व घटनामधील 'जर तर' चा विचारच करण्याची संधीच त्याच्या हातात रहात नाही. या घटनांमधील संघर्ष सागर सरहद्दीनी इतक्या प्रखरपणे फुलवत ठेवलाय की, प्रश्न निर्माण होण्याआधीच प्रेक्षकावर या घटनाचा इतका परिणाम होतो की, त्यानंतर जरी प्रश्न-शका निर्माण झाल्या तरी त्या गौण ठरतात.

पण भावनेला हात घालण्याच्या नादात सागर सरहद्दी मर्यादा सोडून पुढं जातात ते अनाथाश्रमाच्या प्रसंगात. आधळया, पांगळया मुक्या, बहिऱ्या याप्रमाणे मुलाची केलेली प्रतवारी त्याप्रमाणे कमीजास्त होत गेलेली किंमत आणि याचो हॉटेलच्या मेन्यूकार्डप्रमाणे कार्ड तयार करून 'मेन्यूकार्ड' म्हणूनच संबोधणारा संचालक. खरं म्हणजे मुळात असं काही दाखवण हे गुन्ह्यापेक्षा कमी नाही त्यामुळं असं काही दाखवणं टाळता आल असत तर बरं झालं असतं. ते नाही तर निदानपक्षी एखाद्या अनाथाश्रमातला असा प्रसग दाखवल्यानतर इतर अनाथाश्रमातले काही चागले प्रसंग दाखवले गेले असते तर या प्रसगाची तीव्रता तरी कमी झाली असती. पण या एकाच अनुभवावर गीता दत्तक मुलाचा विचार सोडून देते. वास्तविक अशा प्रकारच्या चित्रणाचा जनसामान्यावर निश्चित पणे विपरीत परिणाम होऊ शकतो. अशा प्रकारच काही हाती घेणाऱ्या संस्थानी याविरुद्ध आवाज उठवणं आवश्यकच आहे, पण त्याआधीही सेन्सॉरमध्ये या प्रसगाकडे डोळेझाक व्हावी, याचंही आश्चर्य वाटतं अशा प्रकारचं काम करणाऱ्या संस्थांमध्ये अशा प्रकारचे गैरव्यवहार घडतही असतील, पण त्यासाठी इतक्या क्रूर पद्धतीनं चित्रित केलेला प्रसग घुसडण्याची काहीच गरज नव्हती.

'भावना' प्रमाणेच हाही सबकुछ शबाना सिनेमा, अभिनयातील सफाईच तिनं आतापर्यंत अनेक वेळा दर्शन घडवलं आहे. 'लोरी' ही अपवाद नाही फक्त भीती वाटते, या वेगानं ती एकाच प्रकारची कामं करत राहली तर या गुणी अभिनेत्रीचं काय होईल? फारूख शेख, नसिरूद्दीन शाह. स्वरूप संपत शबानाला चांगली साथ देतात, □

---

## पंजाबमधून हिंडताना...

पृष्ठ १ वरून

दिल्ली, कानपूरच्या दंगली झाल्यानतरही संत भिंद्रानवाले बाहेर का आले नाहीत या प्रश्नाला तो तरुण उत्तर देऊ शकला नाही; पण दुसरा मात्र म्हणाला की, 'त्यांची बाहेर येण्याची ती वेळ नव्हती. त्यांच्या जिवाला सरकारपासून धोका आहे मात्र काही तरुण सत भिंद्रानवालेंच्या जिवत असण्याच्या अफवेवर विश्वास ठेवत नाहीत. पण अशाची सख्या फारच कमी आहे.'

अमृतसरमधील काही हिंदू नेतेमंडळी शिखाविरुद्ध कडवट बोलताना आढळली. जर निवडणुका घेतल्याच तर बहुतेक हिंदू कॉंग्रेसलाच मतदान करतील असेही निदान बोलताना काही लोक आढळले.

अकाली दलाचे प्रसिद्धी प्रमुख गुरमितसिंग चिमा म्हणाले की, अजूनही काही कुटुंबे पजाबात स्थायिक होण्यासाठी येत आहेत. शिरोमणी गुरुद्वारा प्रबधक कमिटी 'शहीद फंड' व 'रिलीफ फंड' यामधून आपद्ग्रस्ताना मदत करते. तर अनेक माणसे आता अकाली दलाच्या कचेरीकडे आपली बेपत्ता माणसे शोधण्यासाठी धाव घेत आहेत.

अकाली दलाच्या कचेरीतच एक लखनौवरून आलेले कुटुब भेटले. श्रीमती गांधींच्या हत्येनंतर त्या कुटुबाला स्थानिक गुडानी त्रास द्यायला सुरुवात केली होती. ते म्हणाले, 'लखनौला अमिनाबादमध्ये आम्ही तयार कपडे विकून पोट भरीत होतो गावोगाव जाऊन कपडे विकत होतो. श्रीमती गांधींच्या हत्येनंतर काही दिवसातच बाजारातील आमचा माल हिसकावून घेण्यात आला. काही विचारणं, बोलणही गुन्हा होतं. एकदा रिक्षा केला. बिल तीन रुपये झाले. मी पाचची नोट दिली. नतर पैसे परत मागितले तर रिक्षाचालक म्हणाला, 'सरळ बघून पुढे चालू लाग. नमकहराम कुठले!' आणि तसेच एकदा बसमध्ये उभा होतो. समोरच्या एकाचा धक्का लागला. मी बाजूला झालो. त्यानं पुन्हा धक्का मारला. मी त्याला 'का रे भाऊ!' असं म्हणताच तो म्हणाला, 'सरदार तो गद्दार होते है। उनको ऐसाही करना चाहिए।' असं झाल्यानतर आम्ही इकडं येण्याचा निर्णय घेतला.'

आता सरकारनं संरक्षण दिलं, सवलती दिल्या तर परत लखनौला जाणार काय? या प्रश्नावर त्या गृहस्थांनी हात जाडले आणि म्हणाले, 'सरकारच सरक्षण दिल्लीमध्येच दिसल. लखनौला आम्हाला दूधपोळी मिळत असेल आणि इथे फक्त कोरडी चटणीभाकरी मिळत असेल तरी आम्ही इथेच राहाणं पसंत करू.'

एकदरीत पजाबमधील शिखाच्या मनावरील जखमा ठणकताहेत. सरकारने हा प्रश्न चिघळवत ठेवला यात दुमत नाहीय आणि आता मलमपट्टीने त्वरीत जखम भरून येईल असे मानणे चुकीचे ठरेल. जरी काही काळाने जखम भरून आली तरी व्रण मात्र राहील. याबद्दल काहीही शंका ठेवता येणार नाही अशी आजच्या पजाबची स्थिती सागते.

—पांडुरंग गायकवाड

विज्ञान

# मिठापासून ऊर्जा : एक नवा पर्याय

डॉ. सुभाषचंद्र सारंग


विसाव्या शतकामध्ये मानवाने झपाट्याने तांत्रिक विकास साधला आहे; पण त्याची किंमत कोणत्या ना कोणत्या स्वरूपात मानवसमाजाला मोजावी लागणार आहे. या शतकाच्या अखेरीस ज्या अनेक समस्यांना मानवसमाजाला तोंड द्यावे लागणार आहे, त्यापैकी उर्जा संकट हे अत्यंत चिंताजनक संकट आहे. द. कोळसा आणि खनिजतेल या उर्जासाधनांचे पृथ्वीवरील ज्ञात साठे केव्हा संपुष्टात येणार त्याबद्दलचे भविष्य अनेक शास्त्रज्ञांनी वर्तविले आहे. कुणाचाही अंदाज तीस ते चाळीस वर्षापलीकडे जात नाही. अशा परिस्थितीत उर्जेची नवनवी पर्यायी साधने विकसित केली नाही तर मानवी प्रगतीची अवस्था पंख छाटलेल्या पक्षाप्रमाणे होईल.

गुरुत्वाकर्षणामुळे नदीच्या अंगी निर्माण होणाऱ्या उर्जेचा वापर जलविद्युत्‌शक्ती निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला जात आहे; परंतु उर्जेच्या या साधनाच्या मर्यादा आता स्पष्ट होऊ लागल्या आहेत. त्यामुळे पृथ्वीवरील सर्व खंडांना वेढून उरणाऱ्या महासगरांकडे उर्जानिर्मितीच्या दृष्टीने मानवाची नजर वळली नाही तरच नवल. सागरी लाटा, भरती–ओहोटी आणि सागरी-प्रवाह यांचा उर्जानिर्मितीसाठी उपयोग करून घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्याचबरोबर नदी ज्या ठिकाणी समुद्राला मिळते तेथे नदीचे गोडे पाणी आणि समुद्राचे खारट पाणी परस्परात मिसळते. या क्षारतेमधील भिन्नतेचा उर्जा निर्माण करण्यासाठी वापर करता येईल अशी शक्यता निर्माण झाली आहे. ऊर्जेचे हे साधन पारंपारिक व प्रचलित साधनापेक्षा वेगळे आहेच; पण त्याचबरोबर ते पुन्हा पुन्हा वापरण्याजोगे आहे. एकदा वापरून ते नष्ट होणार नाही.

नदीच्या मुखापाशी नदीचे पाणी समुद्राच्या पाण्यात मिसळण्याच्या क्रियेमुळे म्हणजेच भिन्न क्षारतेमुळे सामान्यपणे २४ वातावरण दाबाइतका रसाकर्षण दाबातील फरक निर्माण होतो. हा दाब २४० मीटर्स उंचीच्या धरणाच्या तळाशी असणाऱ्या पाण्याच्या दाबाइतका असतो. एका सेकंदाला एक घनमीटर नदीचे पाणी समुद्राला मिळत असेल तर त्यामुळे २·४ मेगॅवॅट इतकी ऊर्जा निर्माण होत असते. हे झाले सर्वसामान्य क्षारतेच्या समुद्राना मिळणाऱ्या नद्यांच्या बाबतीत. मृत-समुद्र आणि सॉल्ट लेक या अतिक्षारतेच्या समुद्रांना मिळणाऱ्या नद्यांमुळे याच्या किती तरी पटीने जास्त ऊर्जा निर्माण होऊ शकेल. मृतसमुद्राची क्षारता सर्वात जास्त आहे. जॉर्डन नदी मृतसमुद्राला मिळते तेथे ५०० वातावरण दाबाइतका रसाकर्षण दाबातील फरक निर्माण होतो. सॉल्ट लेक (सं. संस्थाने)-च्या बाबातीत हे प्रमाण ३७० वातावरण दाबाइतके आहे. म्हणजेच दर सेकंदाला एक घ. मीटर गोडेपाणी वरील समुद्राला मिळाल्याने ३५ ते ५० मेगॅवॅट ऊर्जानिर्मिती होऊ शकते. जगात सर्व समुद्रांना मिळणाऱ्या नद्यांच्या पाण्याचे प्रमाण अंदाजे दर सेकंदास एक कोटी घनमीटर्सपेक्षा जास्त आहे. त्यामुळे २.६ टेरावॅट्‌स् इतकी प्रचंड ऊर्जा निर्माण होऊ शकेल व त्यामुळे जगातील आजच्या ऊर्जेच्या दहा टक्के गरज भाग शकेल.

ओसाड वाळवंटी प्रदेशांच्या किनाऱ्यावर खाजणे व खाऱ्या पाण्याची सरोवरे आढळतात. काही ठिकाणी मिठाचे थर असलेले पट्टे निर्माण झाले आहेत. अशा मिठाच्या पट्ट्यामध्ये किंवा खाऱ्या पाण्याच्या सरोवरामध्ये त्यापेक्षा कमी क्षारतेचे समुद्राचे पाणी मिसळण्याची व्यवस्था केल्याने भिन्न क्षारतेच्या पाण्यामुळे ऊर्जा निर्माण करता येईल.

सागरतळाशी किंवा त्या खाली भूगर्भामध्ये मिठाचे प्रचंड आकाराचे घुमट आढळतात. जगातील सागरी क्षेत्रातील खनिज तेलाचे साठे सामान्यपणे अशा लवण-घुमटामध्येच असतात; पण त्याचबरोबर कित्येक लवण-घुमटामध्ये तेल साठे नसण्याची शक्यता असते. लवण-घुमटामधील मिठाचा उपयोग करून ते मीठ समुद्रात मिसळण्याची प्रक्रिया नियंत्रित पद्धतीने घडवून आणली तर लवण-घुमटात असलेल्या खनिजतेल साठ्यातून जेवढी ऊर्जा मिळेल त्याच्यापेक्षा अनेक पटीनी जास्त ऊर्जा केवळ मिठातून मिळू शकेल. म्हणजेच लवण घुमटातील तेलसाठ्यापेक्षा मिठामध्येच ऊर्जेचे प्रमाण जास्त असते. शिवाय तेलसाठे नसलेल्या लवण-घुमटांचा ऊर्जानिर्मितीसाठी वापर होणार ते वेगळेच. क्षारतेमधील भिन्नतेमुळे उपलब्ध होणारी ऊर्जा हा एकापरीने सौर ऊर्जेचा प्रकार आहे.



कारण नदीचे पाणी समुद्राला मिळाल्याने समुद्राची क्षारता कमी होते; पण सूर्याच्या उष्णतेने समुद्राच्या पाण्याचे बाष्पीभवन होऊन क्षारतेतील फरक कायम राखला जातो. म्हणूनच ऊर्जेचा पुनर्वापर शक्य आहे. लवण-घुमटातील मीठ मात्र एकदा ऊर्जा निर्मितीसाठी वापरल्यावर त्याचा पुन्हा त्यासाठी वापर करता येणार नाही.

## ऊर्जा निर्मितीचा फायदा

समुद्राच्या पाण्यापासून मीठ व गोडे पाणी मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उष्णतेचा म्हणजेच ऊर्जेचा वापर करावा लागतो. याचाच अर्थ असा की, ही क्रिया उलट दिशेने अथवा व्यतिक्रमाने (रिव्हर्सिबल) केल्यास, मीठ व गोडे पाणी यांच्या मिश्रणामळे ऊर्जा निर्माण झाली पाहिजे. हे केवळ तात्त्विक सत्य राहिलेले नाही तर त्यासाठी प्रेशर रिटार्डेड ऑस्मॉसिस, रिव्हर्स इलेक्ट्रोडायलिसिस, रिव्हर्स व्हेपर कॉंप्रेशन, डी सॅलिनेशन इत्यादी नवी तंत्रे व तद्नुषंगिक नवनवी संयंत्रे निर्माण केली जात आहेत. गोडेपाणी व खारेपाणी परस्परामध्ये मिसळत असताना निर्माण होणाऱ्या थोड्याशा उष्णतेचासुद्धा वापर करता येईल काय ? या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत.

खारे पाणी आणि गोडे पाणी अर्धपार्यपटलाने विभक्त करून दोन्ही बाजूच्या पाण्यामुळे निर्माण होणाऱ्या दाबातील फरकाचा ऊर्जानिर्मितीसाठी उपयोग करण्याच्या पद्धतीला ' प्रेशर रिटार्डेड ऑस्मॉसिस ' असे म्हणतात. या संयंत्रामुळे ५० टक्के ऊर्जानिर्मिती क्षमतेचा वापर करता येईल. कॅलिफोर्निया विद्यापीठातील जेराल्ड विक आणि डॉन आयझॅक या संशोधकांनी नदीच्या मुखापाशी दोन समांतर धरणे बांधून त्यामध्ये आघातशोषक जलाशय निर्माण केल्यास अशा जलाशयातून समुद्रामध्ये अर्धपार्यपटलातून हळूहळू गोडे पाणी सोडता येते व त्यापासून ऊर्जानिर्मिती करता येते हे दाखवून दिले आहे. दोन भिन्न क्षारतेचे पाणी आयन विनिमय पटलाद्वारे विभक्त करून त्यामध्ये विद्युत्‌द्रव सोडल्यास विद्युत्‌निर्मिती करता येते. या तंत्राला रिव्हर्स इलेक्ट्रो-डायलिसिस असे म्हणतात. यासाठी आयन विनिमय पटलाचे तंत्र विकसित करणे महत्वाचे आहे. खारे पाणी आणि गोडे पाणी यांच्या वाफेच्या दाबातील फरकाचा वापर करूनसुद्धा ऊर्जा निर्मिती करण्यासाठी संयंत्र विकसित करण्यात आले आहे. या पद्धतीला रिव्हर्स व्हेपर कॉंप्रेशन मेथड असे म्हणतात. या पद्धतीमध्ये मोठ्या क्षमतेच्या विद्युत्‌जनित्रांची गरज भासते; परंतु त्यामध्ये क्षमतेचा अपव्यय फारसा होत नाही. अशा अनेक अत्याधुनिक तंत्रांचा अवलंब करून क्षारतेमधील भिन्नतेचा ऊर्जा निर्मितीसाठी वापर करता येणे शक्य आहे.

ऊर्जेच्या या नव्या साधनाचा पर्यावरण संतुलनावर होणारा परिणाम सुरुवातीसच विचारात घेणे आवश्यक आहे. द. कोळसा आणि खनिज तेलाचे प्रत्यक्ष ज्वलन होत असल्याने प्रदूषणाचे प्रश्न निर्माण होतात. जलविद्युत्‌केंद्रातून बाहेर पडणारे पाणी जास्त तपमानाचे असल्याने त्याचा नद्या व समुद्रातील जीवसृष्टीवर परिणाम होतो. अशा प्रकारच्या समस्या ऊर्जेच्या या नव्या तंत्रामुळे निर्माण होणार नाहीत. कारण नदीचे पाणी समुद्राला मिळण्याच्या नैसर्गिक आविष्काराचाच वापर या तंत्रामध्ये केला जाणार आहे. शिवाय नद्यांच्या मुखापाशी ऊर्जानिर्मिती प्रकल्प झाल्याने तयार होणाऱ्या ऊर्जेचा किफायतशीर उपयोग करून घेणे सोयीचे होणार आहे; कारण खाड्यांच्या परिसरामध्ये मनुष्यवस्ती मोठ्या प्रमाणात असते व तेथे औद्योगिक केंद्रे विकसित करणे सोयीचे ठरेल. मात्र नद्यांच्या मुखापाशी बांधलेल्या धरणामुळे मोठ्या प्रमाणावर गाळ साठून नद्यांच्या मुखापाशी उथळ भाग निर्माण होतील, यासाठी नदीपासून समुद्रापर्यंत वाढत्या क्षारतेचे लहानलहान जलाशय निर्माण करावे लागतील. नद्यांच्या मुखातून चालणारी वाहतूक विस्कळीत होणार नाही, या दृष्टीने उपाययोजना करावी लागेल. खाडीमध्ये जीवसृष्टीवर अनिष्ट परिणाम होऊ नये म्हणून काळजी घ्यावी लागेल. लवणघुमटातील मिठाचा ऊर्जानिर्मितीसाठी वापर केला तर त्यामुळे समुद्रात मिसळणारे जादा मीठ सागरी प्रवाहामुळे सर्वत्र पसरेल व त्याचा परिणाम कमी होईल रिव्हर्स इलेक्ट्रोडायलिसीसमुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषकांची निर्मिती होणार नाही अशी काळजी घेता येणे शक्य आहे, मात्र उष्णता, तसेच हायड्रोजन व क्लोरीन यासारखी प्रदूषके थोड्या प्रमाणात निर्माण होतीलच.

वरील सर्व घटकांचा विचार करता इतर ऊर्जाप्रकारांच्या तुलनेने या प्रकारच्या ऊर्जानिर्मितीमध्ये जमेच्या बाजू जास्त आहेत. कमीत कमी प्रदूषण, पर्यावरण संतुलनामध्ये मर्यादित हस्तक्षेप आणि मोठ्या प्रमाणावर ऊर्जानिर्मितीची शक्यता यामुळे मीठ आणि क्षारतेमधील भिन्नता यांच्यापासून ऊर्जानिर्मिती करणे हाच सध्यातरी ऊर्जासंकटावर योग्य पर्याय आहे. भारतासारख्या देशाला असंख्य खाड्या उपलब्ध असल्याने ही नवी ऊर्जा निश्चितच फायद्याची ठरेल—असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये ☐



# राजहंसची दोन नवीन प्रकाशने

मराठी माणसाला "नाटक" हा आणखी एक अवयव विधात्याने बहाल केला आहे. असे अनेक कलावंत आहेत की आपली वहिवाटीची वाट सोडून नाटकाच्या बिकट वाटेकडे वळले आहेत. म्हणूनच आपली मराठी रंगभूमी एक वेगळाच घाट घेऊन मानाने मिरवीत आहे. रंगभूमीच्या या हृद्य आठवणी अगत्याने सांगण्याचा हेतु इतकाच की, आजच्या पिढीला आपल्या पूर्वसुरींची ओळख व्हावी, आठवण रहावी नि त्यांच्याबद्दल सदैव कृतज्ञता वाटावी.

साप्ताहिक माणूस मधील गाजलेल्या लेखमालेचा संग्रह

## नाटयपंढरी

गो. रा. जोशी

किंमत वीस रुपये

## ऊर्जा प्रश्न

### आशा उद्याच्या

प्रि. खं. कुलकर्णी

किंमत पंचवीस रुपये

श्री. कुलकर्णी यांनी या पुस्तकात ऊर्जेच्या प्रश्नासंबंधी माहिती, आपल्या देशाच्या संदर्भात दिली आहे आणि तिच्या वापरासंबंधी सर्वांची जबाबदारी काय आहे याविषयी चागले विचार मांडले आहेत. निरंतर मिळणाऱ्या ऊर्जेच्या उपयोगासाठी माणसाचे काय प्रयत्न चालू आहेत आणि भावी काळात त्यांची दिशा काय राहील याचेही चागले दर्शन मिळते. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही सर्व शास्त्रीय माहिती व आकडेवारी, किचकट न करता, सुलभ भाषेत सांगितली आहे. विद्यार्थ्यांना आणि सर्वसामान्य वाचकांना, ऊर्जेची आजची समस्या, त्याची कारणे आणि त्यावरील उपाय याविषयी सोपी परंतु मूलभूत माहिती या पुस्तकाद्वारे होईल, असे वाटते.

वि. ग. भिडे
कुलगुरु
पुणे विद्यापीठ

## राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०
फोन : ४४३४५९

C/o श्री. वा. र. गोडे ४१, भवानी शंकर रोड, चितळे पथ कॉर्नर
जोशी वाडी, दादर (प.) मुंबई ४०० ०२८ फोन : ४२२५४५५